. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
. क्र.
IRBK-0116455

१६४५५

माझी ज्येष्ठ भगिनी

श्री. उषाताई देशमुख

हिला सप्रेम अर्पण

IRBK-0116455

# १

क्र.
दि.

त्या राजाचे नाव होते प्रतापादित्य. नाव सूर्याचे पण कीर्ती चंद्राची. इतका उदार आणि प्रेमळ राजा कधी कुणी पाहिला नसेल ! विद्वान लोकांचा तो फार चाहता होता आणि प्रजेला न्याय देण्याच्या बाबतीत तितकाच दक्ष. त्यामुळे त्याच्या राज्यातली सारी प्रजा संपन्न आणि निरोगी होती. शेतातली कणसे भरघोस पिकत. नदीनाले नेहमीच खळाळून उठत. राज्यातील अधिकारी आणि सेवक वर्ग आपापल्या कामात दक्ष असे, चोरांना शिक्षा होई आणि सुजनांना वाहवा मिळे.

आपले राज्य सुखी व सुसंपन्न व्हावे हीच राजाची एकमेव इच्छा होती. त्या इच्छेसाठी तो किती धडपड करी. तो म्हणे, "राज्याला खरी भीती परचक्रापासून नसते. ज्या राज्यात रोगराई नाही, खायलाप्यायला कमी नाही, असंतुष्टता नाही, निरक्षरता नाही, अधिकाऱ्यात लाचलुचपत नाही, अन्यायाची भीती नाही ते राज्य परचक्रापासूनही सुरक्षितच राहते. राजाने प्रजेचे हित हेच कर्तव्य मानले पाहिजे. त्याने भीती बाळगावी अन्यायाची. त्याने स्वारी करावी ती रोगराईवर. त्याने दंड करावा तर तो दुर्जनांना आणि त्याचे खरे ऐश्वर्य कोणते असेल तर विद्वान माणसे !"

खरोखरच प्रतापादित्याची राजधानी म्हणजे विद्वानांचे माहेरघर होते. तडीतापशांचे विश्रांतिस्थान, सुजनांचा एकमेव

आधार. सकाळच्या प्रहरी देवळादेवळातून पंडितांचे वेदघोष, याज्ञिकांची मंत्रपठणे आणि संगीताची रागदारी चालू असे. उत्सवप्रसंगी घरोघरी मंगल-तोरणे लावली जात आणि अंगणात केशरकस्तुरीचा सडा घालून त्यावर सुबक रंगावली रेखलेली असे. घराघरातून संतोष आणि संपन्नता हातात हात घालून नांदत असे.

प्रजेचे हे सुख डोळा भरून पाहावे या इच्छेने राजा प्रभातीच्या प्रहरी वाड्याच्या गच्चीवर उभा राही तर कधी संध्याकाळच्या वेळी नावेतून नदीच्या काठाकाठाने हिंडे. कधी कधी रात्रीसुद्धा वेषांतर करून तो गुप्तपणे राजरस्त्यातून फिरत असे. सकाळी संध्यावंदनाच्या वेळी काय किंवा संध्याकाळी ईशप्रार्थनेच्या वेळी काय राजाची प्रार्थना एकच. 'अवंतिका देश सुखी असो. अवंतिकेची प्रजा संपन्न व निरोगी असो.' रात्री निजतेवेळीही तो साऱ्या दिवसाचा जणु हिशेब-झाडा घेत असे. हेरांकडून आलेल्या वार्ता, न्यायसभेतल्या गोष्टी, प्रधान वा सहचारी यांचा सल्ला, पंडितांचा उपदेश आणि वेषांतरात स्वतः पाहिलेल्या हालचाली, या साऱ्या डोळ्यासमोर ठेवी आणि एखादा धनिक शेट ज्याप्रमाणे रात्रीच्या एकांतात आपल्या पैं-पैशाचा हिशेब करतो आणि ताळमेळ जमवतो त्याप्रमाणे रात्री आपल्या शयनमंचकावर—पराच्या गादीवर निजतानाही राजा प्रजेच्या सुखदु:खांचा विचार करी. अशावेळी मनातल्या मनात प्रश्न करी, "अवंतिके, तू सुखी आहेस ना !"

अशाच एका रात्री आपल्या महालात शय्येवर पडलेल्या प्रतापादित्याच्या तोंडातून अभावितपणे उद्गार बाहेर पडले, 'अवंतिके, तू सुखी आहेसना !' "नाही. राजा, मी सुखी नाही!"

ते उद्गार ऐकून विस्मयचकित दृष्टीने राजाने आजूबाजूला पाहिले तो काय ! त्याच्याच शय्येजवळ मंचकाच्या एका खांबाला धरून एक तरुण रमणी उभी !

ती स्त्री अतिशय सुंदर होती. तिच्या अंगावरील वस्त्रे-भूषणे श्रीमंतीची साक्ष पटविणारी होती. तिची अंगकांतिदेखील किती सतेज !

पण हे काय ? हिची मुद्रा अशी मलूल का ? हिची दृष्टि अशी कावरीबावरी का ? हिचा स्वर असा सद्गद् का ? हिला कसली भीति आणि कसले दुःख ? हे मधूनमधून उसासे का आणि स्वरातून असा गहिवर का ?

राजाने पुनः आजूबाजूला पाहिले. महालातला दीप अत्यंत मंदपणे तेवत होता. पण मग हा असा विलक्षण दिव्य प्रकाश कुठला ? सारा महाल कसल्या तरी सुवासाने आणि तेजाने भारून गेल्यासारखा का ? राजाने पाहिले. तो महालाला आतल्याबाजूने कडी. बाहेर भालदारचोपदारांचा पहारा असताना साऱ्यांना चुकवून ही स्त्री आत आली कशी ?

विस्मयाच्या स्वरात राजाने पृच्छा केली, "देवी, तुम्ही आहात तरी कोण ?"

आपली खिन्न दृष्टि क्षणभर राजाकडे लावीत मंद हास्य करीत ती स्त्री म्हणाली, "राजन्, तू मला ओळखलं नाहीस का? अरे, मी तुझी लाडकी अवंतिका ! पुत्राप्रमाणे जिचे लालन तू आजवर करीत आलास, जिच्या कल्याणाची अहर्निश चिंता बाळगत आलास, जिचे क्षेमकुशल दर रात्री तू विचारीत होतास तीच मी अवंतिका."

राजाने पाहिले आणि पुनः विस्मयचकित होऊन

विचारले, "पण देवी, तू आज अशी खिन्न का ?"

"काय सांगू राजन्, माझ्या दु:खाचं कारण ? ते ऐकले तर कदाचित तुला वाईट वाटेल म्हणून सांगायला मन बिचकतं."

"सांग. देवी, खुशाल सांग. ज्याअर्थी तू स्वत: होऊन आज माझ्याकडे आलीस त्याअर्थी तुझं दु:खही तितकंच मोठं अन् असह्य असलं पाहिजे. नको, अशी दु:खी नजरेने माझ्याकडे पाहून मला व्याकुळ करू नकोस ? माझ्याकडून तुझा काही अपराध घडला आहे का ? तुझ्या पुत्रांना माझ्याकडून काही दु:ख व्हावं अशी कोणती वागणूक झाली आहे का ? सांग."

"नाही, राजन्, आज घटकेला म्हणशील तर मी फार सुखी आहे. मला काही कमी नाही. कशाची चिंता नाही. पण चिंता नाही असं तरी कसं म्हणू ? चिंता आहे ती भविष्याची."

"देवी, भविष्यकाळाच्या पोटात काय होईल याची चिंता कशाला बाळगायची ? अन् ती बाळगून होणार तरी काय ?"

"असे बोलून कसं चालेल, राजन् ? भविष्याची काळजी व्यक्तिमात्राने ठेवलीच पाहिजे. लहान मुंगी देखील उद्याचा विचार करते. मग माणसांनी तो नको का करायला ? राजन् आज मी अत्यंत सुखी आहे. तुझे पराक्रमी बाहु माझे रक्षण करायला समर्थ आहेत. तुझी विवेकबुद्धी माझ्या सुखासाठी धडपड करीत आहे. पण उद्या माझे रक्षण कोण करणार ? तुझे पिता आणि पितामह यांच्या वेळेपासून माझे ऐश्वर्य वाढत गेले, स्वास्थ्य आले, संपन्नताही मिळाली. तू सुद्धा माझं कोडकौतुक पुरविलेस पण उद्या इतक्या काळजीने माझ्याकडे कोण पाहील याचीच मला चिंता आहे. हेच माझे दु:ख आहे."

ते शब्द त्या क्षणाला राजाचे मन चिरत गेले. कधी नव्हे ती जाणीव आज त्याच्या अंत:करणाला जाऊन भिडली. हृदयाच्या कोनाकोपऱ्यात लपलेले दु:ख आज उघडे झाले. ज्या अवंतिकेच्या रक्षणासाठी तो तिळातिळाने झिजला तीच अवंतिका उद्या अनाथ होणार ही जाणीव राजाला आज प्रथमच झाली.

"राजन् !" अवंतिका पुढे म्हणाली. "माझ्या दु:खाची खरी कल्पना तुला यायची नाही आणि मलाही ती समजावून सांगता यायची नाही. पण ते सारं भविष्य माझ्या डोळ्यापुढे चित्राप्रमाणे उभे राहते आणि मग भीतीने माझी गाळण उडते. ते पाहा, राजन् ते पाहा–"

–म्हणता म्हणता अवंतिकेने राजाच्या बाहुला स्पर्श केला आणि ती पुन: दु:खाने किंचाळली.

"ते पाहा ! राजन् ! ते पाहा –"

राजाने त्या दिशेला नजर वळविली. प्रथम त्याला काही दिसेना. सारीकडे शून्य आणि अंधार. पण त्या अंधारातच त्याला गोंगाट ऐकू येऊ लागला. घोड्यांचे खिंकाळणे, सैनिकांचा जयनाद, नगाऱ्याचा आवाज आणि वातावरणात कुठून तरी 'चलो' असा इशारा !– आणि हे काय, घोड्यांच्या टापांचा आवाज वाढला. जवळजवळ ऐकू येऊ लागला. लवकरच एक विशाल तट त्याला दिसला. ते सारे घोडेस्वार तेथे थांबले. पायदळ पुढे झाले. अरे बापरे ! केवढे अफाट हे सैन्य ! कुणाला गिळण्यासाठी हा क्षुब्ध महासागर असा पुढे येत होता ?–आणि हे काय, हे पायदळाचे सैनिक वरवर चढू लागले. घोडेस्वार तटावर बाणांचा वर्षाव करू लागले आणि कुठूनसे एकदमच प्रगट झालेले हे हत्ती तटाच्या दरवाजाला धडका देऊ लागले.

त्या एकेक धडका म्हणजे विजेची घनगर्जनाच ! त्याच्या पाठोपाठ पुन: नगाऱ्याचा तुमुलध्वनि आणि जयनाद ! अखेर तटाला खिंडार पडले ! सैनिक आत प्रवेश करू लागले. पण हे काय, हा तट परिचित दिसतो. हा तर अवंतिका राजधानीचा तट !

हा काय प्रकार आहे म्हणून राजा कावऱ्याबावऱ्या नजरेने इकडेतिकडे पाहतो तो त्याला वेगळेच दृश्य दिसू लागले. जिकडेतिकडे रस्त्यात पळापळ आणि ओरडआरड. घरे पेटलेली दिसू लागली. सैनिक रस्त्यात कुणाला मारीत आहेत तर कुठे घरात लूटमार करीत आहेत. 'पळा ! पळा ! शत्रु आले' म्हणून एकाबाजूने भयचकित गोंगाट तर दुसऱ्याबाजूने शस्त्रांचा खणखणाट आणि 'अरे बापरे, मेलो' 'माते चंडिके !' 'अग आई, आता काय करू' असे आश्चर्यजनक चीत्कार.

"आणखी पाहा ? राजन्, हे पाहा !"

असा पुन: एकदा मृदु मंजुळ ध्वनि पाठीमागून आला आणि त्या स्वराबरोबरच ते जाळे तुटले. नवे दृश्य दिसू लागले.

पण हे दृश्य तर पहिल्याहून भयानक. उध्वस्त झालेली घरे, स्मशानासारखे आ वासून उभे असलेले रस्ते. गावात घर म्हणून शिल्लक नाही. दिवा म्हणून कुठे पेटत नाही. जिकडेतिकडे घुबडांचे आणि भालूंचे घूत्कार. रस्त्यात कुठेच गजबज नाही. सारीकडे स्मशान शांतता !

ते दृश्य राजाला पाहवेना. राजाने डोळे मिटून घेतले.

दुसऱ्याच क्षणी त्याने डोळे उघडून आजूबाजूला पाहिले तो काय, त्या मृदमंजुळ स्वराची मालकीण अंतर्धान पावलेली ! आली कुठून, गेली कुठे, काही कळले नाही. राजाने डोळे चोळले व पुनः इकडेतिकडे पाहिले पण काही नाही. हे स्वप्न की भास

हे राजाला कळेना. झाल्यागेल्या विलक्षण गोष्टीचा विचार करीत राजा पुन: शयनमंचकावर पहुडला

पण राजाला लवकर निद्रा आली नाही.

अवंतिका खरोखरच आली होती की नाही कोण जाणे पण तिचे ते आगमन, तो तिचा दु:खाकुल चेहरा आणि तिने दाखविलेली ती दृश्ये मात्र राजाच्या मन:पटलापुढून काहीकेल्या दूर होईनात.

'अवंतिके, तू सुखी आहेस ना !' असा प्रश्न नित्याप्रमाणे राजाच्या ओठावर आला पण लगेच तो लुप्तप्राय झाला.

सकाळची वेळ होती. राजा प्रतापादित्य आपले नित्याचे राजकाज संपवून चित्रशाळेत बसला होता. याठिकाणी तो नेहमी आपल्या गुप्त हेरांच्या भेटी घेई. देशोदेशीच्या राजांच्या गुप्त वार्ता ऐकत असे.

ती चित्रशाळा चांगली सजविलेली. निरनिराळ्या पौराणिक प्रसंगांची कुशल चितार्‍यांनी रंगविलेली चित्रे तेथे होती. नुसतीच रंगीत नव्हती तर भावपूर्ण ! चित्रातला प्रत्येक प्रसंग बोलका होता. कुठे वीर तर कोठे वात्सल्य, कुठे शांत तर कुठे रौद्र अशा रसांचा ओलावा होता. पाहणार्‍याच्या मनात ते ते भाव दाटून यावेत अशी कुशलता होती. एकाहून एक उदार, धीर आणि निश्चयी अशी प्रजावत्सल राजांची ती चित्रे प्रतापादित्याला नेहमीच मार्गदर्शक वाटत. ती कधी त्याच्या मनाला धीर देत तर कधी स्फूर्ती देत. हरिश्चंद्र, पुरुरवा, दुष्यंत, राम आणि युधिष्ठिर यासारख्या अशा धीर गंभीर, प्रजावत्सल व पराक्रमी

राजांच्या जीवनातली ती दृश्ये जितकी रमणीय तितकीच रोमहर्षक नव्हती काय ?

प्रतापादित्य त्या चित्रांकडे पाहत बसला. आज त्याच्या मनात सकाळपासून वेगळेच विचार येत होते आणि आता तो पाहत होता ती ही चित्रे त्याच विचारांना आणखी चाळवीत होती. 'एवढा तरी पुत्र जगू दे' म्हणून गंगेची विनवणी करणारा राजा शंतनु', 'हे तुमचेच पुत्र आहेत' म्हणून महर्षी वाल्मीकीने ओळख करून देताच आपल्या पराक्रमी पुत्रांकडे अनिमिष लोचनांनी टक लावून पाहात राहणारा भगवान रामचंद्र, सिंहाच्या जबड्यात हात घालून त्याचे दात मोजणारा भरत आणि त्याच्या खेळाकडे पाहत पुत्रवात्सल्याने गदगदून गेलेला सम्राट दुष्यंत... ही सारी चित्रे काय सुचवीत होती ! मुलाबाळांचे सुख हेच मानवी जीवनातले मोठे सुख, हेच नव्हती का तीं सांगत ! आपल्या पुत्राचा पराक्रम पाहून राजा दुष्यंताला किती विलक्षण वात्सल्याचे भरते आले होते ! आपला एक तरी पुत्र वाचावा म्हणून गंगेला काकुळतीने विनवीत असलेला राजा शंतनु किती कासावीस दिसत होता ? आपल्या वंशाला एक तरी कुलदीप मिळावा म्हणून त्याची केवढी तगमग होत होती ! आपल्या पराक्रमी पुत्रांवर पितृपरंपरेने चालत आलेल्या रघुकुलाच्या राज्यश्रीचा भार सोपविताना राजा रामचंद्राला किती कृतार्थता वाटली असेल ! हा अभिमान, हा आनंद, ही कृतार्थता आपल्या वाट्याला अद्याप का बरे येत नाही ? आपण पराक्रमाने मिळविलेली आणि परिश्रमाने जतन केलेली ही राज्यश्री परक्याच्या घरात जाणार काय ?

अशा विचाराने राजा अस्वस्थ असतानाच राजाचा

विश्वासू सेवक शूरसेन आत आला.

शूरसेन नावाप्रमाणेच शूर होता. अवघड कामे अंगावर घ्यावी आणि उत्साहाने ती पार पाडावी यात स्वारीला मोठा आनंद वाटे. राजाच्या विश्वासू गुप्त हेरांचा तो प्रमुख नायक होता. एवढ्या तरुण वयात अफाट साहस व अचाट मर्दुमकी दाखवून त्याने राजाचा विश्वास संपादन केला होता. कितीतरी धाडसाची कामे स्वीकारली होती आणि यशस्वी करून दाखविली होती. राजा नेहमी म्हणे, "शूरसेन म्हणजे माझे डोळे !"

शूरसेन नेहमी मोठा आनंदी. पण आज त्याची वृत्ती तितकी उल्हसित दिसत नव्हती. त्याची चर्या अस्वस्थ होती, जे सांगायचे ते सांगू की नको अशा विचाराने त्याचे मन जणु बावरल्यागत झाले होते.

राजाने त्याची ही स्थिती ताडली आणि म्हटले, "काय, शूरसेना, काशिराजाच्या अंतर्महालापर्यंत आज जाऊन आलेली दिसते तुझी स्वारी, होय ना !"

शूरसेनाने उत्तरादाखल मान तेवढी हालविली.

राजाने विचारले, "काय वार्ता आहे ?"

"काही विशेष सांगण्यासारखी नाही" आपली खिन्न मुद्रा लपवीत शूरसेन म्हणाला.

"अरे ! विशेष काही नाही—म्हणजे थोडीतरी सांगण्यासारखी आहे, होय ना ?" राजाने मुद्दामच हसून प्रश्न केला.

"विशेष सांगण्यासारखी नाही" नजरेला नजर न भिडविता शूरसेनाने पुन: मान खाली घातली.

"म्हणजे आज काही वाईट वार्ता आणलेली दिसते, खरे आहे ना !"

शूरसेनाने निवळ मान हालविली.

"कां ? आमची कुणी निंदा करीत नाही ना ?"

शूरसेनाने नुसती गालातल्या गालात जीभ फिरविली.

"मग कुणी आपल्या राज्य कारभारावर टीका का करीत आहे ?"

आता कुठे शूरसेनाला वाचा आली. तो हलक्या स्वरातच चटकन म्हणाला, "छे: महाराज !"

"आपल्या शत्रूची काही विशेष मसलत चालली आहे का ?"

"नाही महाराज !"

राजा गोंधळला. शूरसेनाच्या चर्येकडे सूक्ष्मपणे पाहत आणि तो आपल्यापासून काय लपवीत आहे याचा जणु ठाव घेत त्याने विचारले.

"काशिराजाचे सैन्य आपल्यावर चालून येणार आहे काय ?"

"तसेही नाही महाराज ! पण. . ."

आणि बोलता बोलता पुन: शूरसेन अडखळला.

"पण काय ? तो काहीतरी आमच्याबद्दल बोलला, हे तर खरे ना ?"

शूरसेनाने मान हलविली.

त्याच्याकडे पाहत काहीशा प्रेमळ स्वरात राजा म्हणाला, "अरे, असा अडखळल्यासारखा काय करतोस शूरसेना ? तू तर आमचे नेत्र. तुला कधी चांगले दिसेल तर कधी वाईट ही दिसेल. जे दिसेल ते सांगायचे, जे ऐकले ते निवेदन करायचे हे तर तुझे काम. त्यात एवढं वाईट का वाटून घेतोस ? सांगितल्याप्रमाणे

तुझी स्वारी यावेळी थेट काशिराजाच्या अंतःपुरापर्यंत गेली होती, होय ना!" बोलता बोलता राजा पुन: त्याच्याकडे पाहून हसला. पण त्या हसण्याने शूरसेनाची कळी विशेष खुलली नाही. उत्तरादाखल हात जोडून तो म्हणाला, 'होय, महाराज.'

"मग काय म्हणत होते काशिराज?"

एकाएकी त्या प्रश्नाने शूरसेनाच्या मनाचा बांध फुटला आणि एकदम त्याच्या डोळ्यात पाणी आले. कंठ दाटून राजाच्या पायाशी गुडघे टेकत तो म्हणाला, "महाराज ते किती वाईट वाईट बोलले. कशाला ते या सेवकाच्या तोंडून वदविता? ते सांगेन तर माझी जीभ झडून जाईल."

आपल्या विश्वासू सेवकाचे ते आपल्यावरील प्रेम पाहून राजा प्रतापादित्य गहिवरला.

आपल्या आसनावरून उठून त्याने त्याच्या पाठीवर थोपटून म्हटले, "वेडा का आहेस तू शूरसेना! अरे, असे वाईट सांगितल्याबद्दल का मी तुला रागावेन? मग माझी खरी परीक्षा तुला झालीच नाही म्हणायची."

"महाराज," दाटल्या कंठाने शूरसेन म्हणाला, "आपली थोरवी ती किती, हृदयाची प्रेमळता किती, आम्हा सेवकाविषयीची आपली तळमळ तरी केवढी! अशा आपल्याबद्दल त्या काशिराजाने असं उद्‌गार काढावे आणि आम्हाला ते ऐकणे भाग पडावे! छे! त्यापेक्षा अंतःपुरात गेलो नसतो तर–"

"जाऊ दे ते काशिराज काय म्हणाले ते आधी सविस्तर सांग."

"काशिराजाचे प्रधान त्यांना विचारीत होते की आता अवंतीवर हल्ला केव्हा करायचा? तेव्हा काशिराज हसले आणि

म्हणाले—"

"समजलं," राजा म्हणाला, "हल्ला करण्याची ही वेळ नाही असेच ना!"

"नाही. एवढंच तो म्हणाला नाही. त्याचे म्हणणे असे की ही यातायात उगीच आज कशाला? आज ना उद्या ते राज्य आपलेच; जाते कुठे! निपुत्रिकाचे राज्य म्हणजे कीड लागलेला वृक्ष, आज ना उद्या उन्मळून पडणारच."

"एवढेच ना! मग त्यात तुला वाईट वाटायला काय झाले? खोटे का बोलला तो?"

"पण असे त्याने का म्हणावे?"

"अरे, लोक असे बोलणारच. जे दिसते तसे ते बोलतात." असे म्हणून राजा हसला.

शूरसेन मात्र हसला नाही. त्याच्या डोळ्याच्या कडा पाण्याने ओलावलेल्या होत्या. राजाच्या ते लक्षात आल्याशिवाय राहिले नाही. शूर, साहसी व स्वामिनिष्ठ सेवकाचे आपल्याविषयीचे हे प्रेम पाहून राजाचेही अंतःकरण भरून आले.

स्वतः माणूस जमिनीवर पडले तर त्याचे त्याला काही वाटत नाही पण तसे पडताना कुणी पाहिले तर ते मात्र त्याला लागते.

तीच अवस्था राजा प्रतापादित्याची झाली. आपले निपुत्रिकपणाचे दुःख आजवर त्याच्या मनात खोल लपलेले होते. पण आज शत्रूचे बोल ऐकून ती जखम उघडी झाली.

देवी अवंतिका तरी हेच नव्हती का म्हणाली?

—आणि हा विचार मनात येताच राजा अधिकच उदास झाला.

दुपारची वेळ होती. माथ्यावर ऊन तळपत होते. पण राजरस्त्यावरील त्या दाट आंबराईतली विश्रांति मोठी सुखाची वाटत होती. गुप्त वेषांतर करून आपल्या राज्यात फिरायला निघालेला प्रजावत्सल राजा त्या आंबराईत थोडावेळ विश्रांति घेण्याच्या हेतूने शिरला. आंबराईत प्रवेश केल्याबरोबर एक मंद व शीतल वायूची झुळुक राजाच्या अंगाला चाटून गेली. जणु ती म्हणत होती, 'ये प्रजावत्सल राजर्षे, असा आत ये !'

मोठमोठ्या नगरांना सांधणाऱ्या राजरस्त्यावर पथिकासाठी दाट छाया असावी आणि म्हणून त्यांच्या नेत्राची व हृदयाची एकाच वेळी तृप्ती व्हावी ही प्रतापादित्याची आवडती कल्पना. या त्याच्या कल्पनेप्रमाणे राज्यातल्या प्रमुख रस्त्यावर दुतर्फा फळाफुलांची झाडे लावलेली होती जागोजाग धर्मशाळा, गावोगावी देवमंदिरे, नदीकाठी फरसबंदी दगडांचे घाट, पर्वतावर एखाद्या शिवालयाच्या लगत उभ्या केलेल्या दीपमाळा असे हे अवंतिदेशाचे वैभव वाटसरूंनाही सुखवीत होते. नदीचे जल कुणीही प्यावे तशीच या झाडांची छाया कुणीही उपभोगावी. फुले कुणीही तोडावीत, फळे कुणीही चाखावीत. कुणालाच याबाबतीत प्रतिबंध करू नये असा राजाचा अधिकाऱ्यांना सांगावा होता. त्यामुळेच वसंतऋतूत प्रवास करणारे वाटसरु या दाट आमरायातून विश्रांतीसाठी बसत, तेव्हा माथ्यावरील ते पक्व फळांच्या रूपाने दिसणारे आम्रतरूंचे रसदार वसंत

वैभव त्यांच्या सर्वेंद्रियांचे संतर्पण करीत असे ती रसाळ फळे चाखावीत, तृप्त होईतो त्यांचा रसास्वाद घ्यावा, जिभेवर त्यांचा स्वाद घोळवावा. मग त्या स्वादाने रसाळ झालेली रसना साहजिकच अवंतिराजाची स्तुतिस्तोत्रे गाऊ लागे. हे दृश्य राजाने स्वत: कितीदा तरी पाहिले होते; अनुभवले होते.

पण आज आमराईत पाहावे तो एकाही झाडाला फळ नाही !

राजाने पुन: एकवार निरीक्षण करून पाहिले त्याला आश्चर्य वाटले. हे असे झाले कसे ? हा निसर्गाचा कोप की ग्रामाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष ? तेवढ्यात जवळून आवाज आला.

"काय राव, काय पाहत आहात ?"

राजाने वळून पाहिले. जवळच्याच एका दाट झाडाच्या बुंध्याशी आपल्या पगडीची चुंबळ ठेवून त्यावर मस्तक टेकून निजलेला एक प्रवासी काहीसा हसत त्याच्याकडे पाहताना त्याला दिसला. त्याच्या कपाळावर त्रिपुण्ड्र, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा, उजव्या स्कंधावर विसावलेले शुभ्र जानवे, गुडघ्यापावेतो पंचा आणि अंगावर एक तसलेच छोटेसे उपवस्त्र. पण बांधा भव्य, मूर्ति सतेज. डोळ्यात विद्वत्तेची चमक आणि कपाळावरचे जाळे जणु अनुभवांनी विणलेले ! कुणीतरी दूरदेशाहून आलेला प्रवासी ब्राह्मण असावा, हे राजाने जाणले. हसतहसत त्याला हात जोडून राजाने वंदन केले आणि मग त्याच्याजवळ येऊन बसत तो म्हणाला,

"विशेष काही नाही. भूदेवा ! फळे पाहत होतो."

"फळे ?" तो भूदेव हसत म्हणाला, "अरे, निष्फळाच्या देशात कुठली रे फळे मिळायला ? पाहत नाहीस का या

झाडांना कशी कीड लागली आहे ती ?"

"पण महाराज – दोन वर्षापूर्वी हीच झाडे फळांनी लदबदलेली होती अन् आजच अशी का ?"

"अरे, हळुहळू लागलेली कीड ती ! एकदम दृष्टीस पडत नाही. पण आपला अमल केव्हातरी गाजवतेच !"

"पण हा निसर्गाचा कोप एकाएकीच का ?"

"अरे, इथंच नाही ! या राज्यात जिकडे जातो तिथे हेच पाहत आहे ना ! कुणाची घरची झाडे वांझ तर कुणाची गाय वांझ. अरे हा जाणुनबुजून निपुत्रिक राजाचा देश. या देशात सारेच वांझ असणार !"

राजाने काहीसे चमकून ब्राह्मणाकडे पाहिले.

"महाराज, आपणाला हे कसे कळले ?"

"अरे, मी नुसताच भूदेव नाही. थोडेसे ज्योतिष जाणतो. सामुद्रिक ज्ञानही आहे. त्यामुळे ओळखलं."

'मग महाराज – आपण राजसभेत का गेला नाहीत ? मी ऐकतो की येथला राजा विद्येचा चाहता आहे, गुणांचे चीज करणारा आहे.'

'नाही कोण म्हणतो ? पण बाबा, निपुत्रिकाच्या हातचं दान कुणी घ्यावं. आताच पाहिलीस ना या आम्रवृक्षांची अवस्था. अगदी तसलीच अवस्था आमचीही होणार ! अरे, फार कशाला, जवळचीच गोष्ट सांगतो – अगदी स्वतः पाहिलेली गोष्ट. आमच्या गांवच्या एका विद्वानाला तुमच्या या राजाने गाई दान दिल्या. पण काय सांगू ? साऱ्या वांझ निघाल्या. इतकेच नाही तर ते दान घेतल्यापासून त्याच्या घरातली फळझाडे सुद्धा वांझ निघाली. जाऊ दे ते. तू का असा दुःखी. चांगला राजबिंडा

दिसतोस ? तुला रे का दुःख ? पाहू या तुझा हात ?'

राजाने हात पुढे केला. ज्योतिष्याने तो आपल्या हातात घेतला व बराच वेळ त्या हातावरील रेषांकडे तो निरखून पाहत राहिला. त्याच्या कपाळावर निराशेचे जाळे उठले आणि डोळ्यात कणव. थोड्याशा सहानुभूतीच्या स्वरात त्याने विचारले, "बाबारे तुझे दुःख हेच दिसतय ! खरं ना ? अद्याप तुला मूलबाळ नाही म्हणूनच ना असा कष्टी दिसतोस ? "

राजाने नुसतीच मान हलविली.

" इथलाच का राहणारा तू ?"

राजाने पुनः एकदा मानेनेच उत्तर दिले.

" अस्सं !" म्हणून मान हलवीत ज्योतिषी स्तब्ध बसला.

राजाला राहवले नाही. त्याने हळूच धीर करून विचारले.

" महाराज, यापुढे तरी पुत्रसुख नशिबात आहे का? "

" ते काय सांगावे. पुष्कळदा स्थळकाळाचे माहात्म्य असते ते. तुला एक गोष्ट सांगतो. तुझ्या कल्याणाची गोष्ट ! शक्य असेल तर अवश्य कर."

" कोणती गोष्ट महाराज. सांगा ! मी ती अवश्य करीन."

इकडेतिकडे पाहात आणि मग हलक्या स्वरात त्याच्या कानाशी लागल्याप्रमाणे तो ब्राह्मण म्हणाला, "तुझ्या हिताची गोष्ट सांगतो. या निपुत्रिकाच्या राज्यात तू राहू नकोस. इथं आहेस तोपर्यंत तुझा भाग्योदय नाही. ऊठ अन् शक्य तर आजच्या आज या निपुत्रिकाच्या देशातून बाहेर पड. इथं तुझं भलं होणार नाही. काय कळलं ना ?"

कळलं ! पुरं कळलं ! आणि ते त्यामुळे राजाचा चेहरा अधिकच कष्टी झाला. विश्रांतीचे निमित्त करून त्याने डोळे मिटले.

त्याच दिवशीची संध्याकाळ. राजाचा घोडा राजधानीच्या दिशेने परत चालला होता. अस्तंगत सूर्याची लालसर किरणे नदीच्या पात्रात चित्रविचित्र रंगाचा खेळ मांडून बसली होती. पण तो खेळही हळुहळू संपण्याच्या बेतात आला होता. जणु त्या किरणांना घरी जायची ओढ लागली होती. गाईगुरं तर जणु धांवत घराकडे निघाली होती. साऱ्यांना कशी आपल्या घराची ओढ. हा वर चाललेला पक्ष्यांचा थवा तरी घराच्या ओढीनेच असा उडत चालला नव्हता काय ? पण घराची कसली ?— आपल्या चिमण्या पाखरांची ओढ त्यांना लागली होती. ज्या घरात चिमण्या जीवांचा किलबिलाट नाही, हंसणे खिदळणे नाही, जेथे लहान मुलांचे कोवळे स्मित पाहायला मिळत नाही, ज्या घरांतली जमीन लहान मुलांच्या रांगण्याने वा दुडदुड धावण्याने हर्षित होत नाही की जेथे कुणी लहानसा जीव अंगाला येऊन आपल्या कोवळ्या हाताचा विळखा घालत नाही ते घर कसले ? त्या घराला 'घरपणा' नाही हेच खरे.

ज्या झाडांना फळे नाहीत किंवा फुले नाहीत त्यांना काय झाडं म्हणायची !

ज्या वेलींना फुले नाहीत त्या वेली कसल्या ! ज्या नद्यांना पाणी नाही, ज्या गाईंना वासरू नाही, ज्या स्त्रियांना मूल नाही त्यांचा जन्म असून नसून सारखाच नव्हे काय ? गृहिणीवाचून घराला शोभा नाही असे म्हणतात. छे, खोटे आहे ते ! त्या गृहिणीच्या कडेवर जर चिमणे बाळ नसेल तर तिला तरी काय शोभा ! ही गुरे, या गाईम्हशी किती धन्य की त्यांना कुणीतरी चिमणा जीव हाका मारीत आहे. या पक्षिणी किती सुखी की कुणातरी चिमण्याच्या मुखांत दाणा टाकायला त्यांना

मिळत आहे ? या गाई आपल्या घरी जातील आणि आपल्या दुधाच्या धारांनी वासराला अभिषेक घालतील.

असल्या विचारात मग्न झालेला राजा हळुहळू राजधानीच्या वाटेने चालला होता. तोच त्याच्या कानावर रडण्याचा आवाज आला. राजा चमकला. त्याने कानोसा घेतला. इकडेतिकडे पाहिले. तेव्हा त्याच्या लक्षात आले की जवळच दिसणाऱ्या एका खोपटातून तो रडण्याचा आवाज येत होता. आवाजावरून स्त्रीचे ते रडणे असावे अशी राजाला शंका आली.

प्रजेचे दु:ख आणि त्यातून एका स्त्रीचे अतिशय कळवळून रडणे राजाला कधीच सहन होत नसे. त्या प्रजावत्सल राजाला आपली प्रजा लेकरासारखी वाटे. विशेषत: आपल्या राज्यात स्त्रियांना तर दु:खाचा वारा स्पर्शू नये याची तो फार काळजी घेई. तो नेहमी म्हणे, "बायका या घराच्याच नव्हत तर राज्याच्या संरक्षक देवता होत. त्यांना काडीइतकेहि दु:ख नसावे. मग त्या माता असोत, पत्नी असोत किंवा कन्या असोत"

पाहता पाहता राजा त्या झोपडीच्या दाराशी आला. तेथे बरीच गर्दी जमलेली होती साऱ्यांचे चेहरे कसे उदास आणि अश्रुपूर्ण होते आणि त्या गर्दीमध्ये केविलवाणा आक्रोश करणारी ती वृद्ध स्त्री ! कुणीतरी मोठ्या कुळातली असावी, पण दु:खामुळे तिचा चेहरा कसा उदास, डोळे सुजलेले – केवढ्या मोठमोठ्याने आक्रोश करीत होती ती. हृदयाला पीळ पाडणारा आक्रोश !

"गेला हो गेला ! माझा बाळ मला सोडून गेला ! माझी म्हातारीची एक काठी होती तीही देवाला पाहवली नाही. देवाला कसली – राजाला पाहवली नाही हेच खरे !"

बोलता बोलता तिच्या डोळ्यात कसली तरी विलक्षण चमक आली तिच्या शरीरात कसली तरी विलक्षण चेतना स्पर्श करून गेली. हात वर करून त्या भोवतालच्या जमावाला उद्देशून ती म्हणाली–

"अहो, ऐकता काय ? उठा. चालते व्हा. आताच्या आता चालू लागा. खरं सांगते. तुमच्या कल्याणाची गोष्ट सांगते रे बाळांनो, इथं राहू नका. या निपुत्रिकाच्या देशात तुमचं कधी भलं होणार नाही. या राजाला – खरं सांगतं या निपुत्रिक राजाला कसला तरी शाप आहे ! त्या शापापायी माझी सारी मुलं गेली. तुमचं तसं नको ना व्हायला ! मग मी म्हणते तसं करा. या निपुत्रिकाचा देश सोडून आताच्या आता चालते व्हा!"

पुन: वेडाचा झटका आल्याप्रमाणे ती उठली आणि आपल्या मृत पुत्राच्या शरीरावर हात फिरवीत म्हणाली, "चल, माझ्या लाडक्या. चल ! आतातरी चल. आपण या निपुत्रिकाच्या देशातून निघून जाऊ. तुला कितीदा सांगितलं, विनवून सांगितलं. पण तू माझं ऐकलं नाहीस. अन् आता एकटाच कुठं रे चालता झालास ? काय म्हणतोस, मी एकटा नाही जायचा. नको रे बाबा सख्या, एकटा नको जाऊ, मीही येते तुझ्याबरोबर."

त्या करुण क्रंदनाने साऱ्यांचे डोळे भरून आले. त्या दु:खी जीवाचे सांत्वन कोण व कसे करणार ! राजालासुद्धा काही सुचेना. तिचे दु:ख अनिवार तर खरेच. त्या हृदयांतला वणवा शब्दाच्या टीचभर सहानुभूतीने विझणार होता काय ? आणि तसंच पाहिलं तर ती म्हणत होती त्यात खोटे काय होते ? तिचे दु:ख त्याच्या काय अनुभवाचे ? त्याला पुत्र नव्हता, कबूल! पण पुत्र व्हावा आणि तो हरवावा असली क्रूर वंचना तर

काळाने त्याची केली नव्हती ना! खरंच, असला जीवघेणा खेळ काळाने कुणाशीही खेळू नये हेच खरे!

असा तो विचार करीत आहे तोच त्या वेडीला पुन: कसली तरी लहर आली. त्यातच तिची नजर राजाकडे गेली. धावत धावत त्या गर्दीतून वाट काढत ती राजापाशी आली आणि एकवार त्याच्या घोड्याकडे आणि एकवार त्याच्याकडे न्याहळून पाहल्यासारखे करीत ती म्हणाली, 'काय हो पाहुणे, इकडे कुठं आला? तुम्ही कुणातरी दूर देशचे दिसता, होय ना! माझं ऐका. या देशात कशाला आलात! बाकी एक सांगून ठेवते. येथे कायमचं राहण्याचा विचार केला असला तर तो डोक्यातून अजिबात काढून टाका. तुम्ही पुत्रवंत आहात ना! मग माझं ऐका. निदान पुत्रांच्या कल्याणासाठी तरी आल्यापावली परत जा. माझ्या अनुभवाची गोष्ट सांगते. अहो, माझा निर्वंश झाला तसाच तुमचाही निर्वंश होईल! अहो, काय सांगू तुम्हाला, यापुढे या राजाच्या राज्यांत झाडे फळ देणार नाहीत, गाईंची वासरे टिकणार नाहीत की विहिरीला पाणी राहणार नाही. म्हणून सांगते, तुम्ही आल्यापावली परत जा".

ते ऐकले आणि राजाच्या नेत्रातून एकाएकी अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्याच्या मनाच्या जखमा त्या शब्दांनी जणु ओरबाडल्या गेल्या. त्याचे हृदय फुटल्यासारखे झाले. त्याच्या डोळ्यापुढे अंधार पसरला.

# २

दिवेलागणीची वेळ होती. जिकडेतिकडे दिवे दिसू लागले. घरोघरी दिवे, अंगणात दिवे, देवळात दीपमाळा. आकाशात रत्नांचे दीप उजळले गेले आणि तळ्यात त्यांची प्रतिबिंबे झगमग करीत होती.

पण राजाच्या मनात मात्र भयाण काळोख माजला होता. त्या वेड्या स्त्रीच्या तोंडातून अजाणता निघालेले ते शब्द पण त्यांनी राजाच्या मनातल्या गुप्त व्रणावर केवढा घाव घातला !

घोडा नित्याप्रमाणे राजधानीच्या दिशेने धावत चालला होता. पण राजाचे मन दुसरीकडेच भरटकत होते. तेवढ्यात दोन वाटा फुटल्या. एक वाट राजधानीकडे तर दुसरी जंगलाकडे जात होती. राजाने घोडा वळविला तो जंगलाच्या दिशेने.

घोड्याने एकवार 'फुर्र' केले आणि ऐटीने मान मागे वळवली. जणु धन्याला तो विचारू इच्छित होता, "या भलत्या-वेळी इकडे कुठे ?"

राजाने त्याचा हेतू ओळखल्याप्रमाणे त्याच्या पाठीवर थोपटल्यासारखे केले आणि लगाम आवळून म्हटले, 'चल बेटा, पुढे चल."

-आणि मग घोड्याने पुन: एकदा 'फुर्र' केले जणु त्याला म्हणायचे होते, 'जशी महाराजांची आज्ञा.'

नंतर तो घोडा जंगलाची वाट काढत भरधाव निघाला.

रस्त्याच्या दोन्ही कडेला गर्द जंगल लागले. हळुहळू रस्ता विरळ होत चालला. जणु काट्याकुट्यातून सरपटणारा एखादा सापच! पण तशा त्या सर्पाकृती दिसणाऱ्या रस्त्यावरून तशीच सर्पाकृती वळणे घेत तो घोडा चालला. जणु आपल्या शिरावर केवढी मोठी जड जोखीम वाहून नेत आहोत याचे भान त्याला होते. मधूनमधून रस्ता डोंगराळ भागातून जाऊ लागला म्हणजे एखाद्या सरसर वाहत खाली येणाऱ्या छोट्याशा नदीप्रमाणेच तो झरझर उड्या मारीत चपलतेने चालू लागे. डोंगराच्या मुळक्यांना कापत जाणारी नदीही इतकी वेगवान नसेल. जंगलातील झाडे आपल्या प्रभावाने नमविणारा वाराही इतका अचपळ नसेल. झाडाझुडपातून, काट्याकुट्यातून, नदीनाल्यातून, चढउतारावरून सारखा भरधाव धावत होता तो.

सारे रान निजले होते. पशुपक्षी आपापल्या ठिकाणी झोप घेत होते. रातकिड्यांची किर्रकिर्र काय ती चालली होती. रात्रीच्या अंधाराबरोबर हळुहळू वाढतही होती. राजाच्या मनातल्या अंधारासारखाच. वारा मस्तीत अंगाशी झगडत होता. जणु विचारीत होता, "राजा, या भलत्यावेळी तू इकडे कुठं ? रात्रीचा हा भयंकर धिंगाणा–हे भयंकर तांडवनृत्य पाहायला का इथं आला आहेस ? नको ! राजा, पुढे येऊ नकोस. हे माझे राज्य आहे तू पराक्रमी असलास तरी काय झाले? माझाही पराक्रम काही कमी नाही. माझा हा धिंगाणा, ही मस्ती तुला नाही सोसायची." त्याला काय माहीत की राजाच्या मनातही असेच विचारांचे प्रचंड थैमान माजले होते.

पाणी कापताना आवाज व्हावा तसा मध्येच काट्याझुडपातून जाताना खर्र ऽऽ असा आवाज होई जणु ती काटेरी

झुडपे राजाच्या पायाशी लगटून त्याला विनवू पाहत होती. "नको, राजा! पुढे येऊ नकोस. असा रक्तबंबाळ होऊ नकोस." पण राजा काय त्यांना जुमानतो? त्याचे मन जगातल्या काट्या-कुट्यांनी काय कमी ओरबाडून निघाले होते?

चालताचालता घोडा एका तळ्यापाशी आला त्यासरशी राजाने त्याचा लगाम आवरला. घोडा थांबला आणि त्याचवेळी चतुर्थीचा चंद्र आकाशात डौलाने झळकला.

तळे अगदी स्तब्ध आणि शांत. जलाने तुडुंब भरलेले ते तळे जणु एखाद्या संपन्न पण अबोल श्रीमंताप्रमाणे आपली शोभा दाखवीत होते रात्रीच्या प्रहरी निवांतपणे कुणी तपस्वी जणु डोळे मिटून तपश्चर्येला बसला होता आणि त्याच्या तपश्चर्येत विघ्न येऊ नये म्हणून की काय आसपासचे वृक्ष आणि वेली निःशब्द होती. वारासुद्धा इथे किती हळु वाहत होता.

राजाने तळ्याकडे पाहिले आणि त्याच्या मनात एक विचार डोकावून गेला. त्या विचारासरशी त्याने घोड्यावरून खाली उडी टाकली. अंगावरचे कपडे काढले आणि तो पाण्यात उतरला

पाणी किती थंडगार होते. तान्हेल्यांना तृप्त करणारे आणि संतप्तांना निववणारे ते पाणी राजाच्या शरीराला क्षण-भर किती संतोषदायक वाटले.

एक छोटीशी लहर पाण्याच्या पृष्ठभागावर उठली आणि तिने हलकेच दुसरीला उठविले.

"ताई उठ! घरात कोण पाहुणा आला आहे तो पाहिलास का?"

"पाहिला! डोळे भरून पाहिला!"

"राजबिंडा दिसतो आहे, नाही का ग ?"

"अग, कशी तू वेंधळी ? ओळखलं नाहीस."

"नाही बाई ! कोण ग–"

"अग, अग या देशाचा राजा !"

"मग इथं कशाला आला ?"

"का, कुणी येऊ नये होय ? अग, तो आला आहे आपल्याला भेटायला. आपल्या तळाची खोली पाहायला !"

ती छोटीशी लहर हसली आणि अंतर्धान पावली.

इतका वेळ वृक्षांना आलेली झोप जणु आता चाळवली गेली वारा त्यांच्या कानाशी काहीतरी कुजबूज करून गेला. आश्चर्य वाटल्याप्रमाणे त्यांची तोंडे उघडली. पर्णांची चाळवाचाळव झाली. परस्परांना विचारू लागली, 'काय झालं वडदादा ?' 'काय झालं आम्रराज ?' 'काय झालं निंबदादा ?'

निंबदादा दिसायला भले पण आंतून मोठे कडू. आपल्या नेहमीच्या कटु स्वरांत ते म्हणाले—व्हायच काय ? राजा आला आहे मरायला !

'मरायला ?' वडदादा किंचाळले. संतप्तांना छाया देणे हात्र ज्यांचा धर्म त्या वडदादांना हे ऐकून वाईट वाटले असावे. पण ते तरी काय करणार ? आपल्या लांब जटावर हात फिरवीत ते स्वस्थ बसले.

एवढ्या वेळात राजा पाण्यात उतरला होता. हळुहळू पुढे चालला होता. या तळ्याच्या खोल तळाशी तो आपले दुःखाचे गाठोडे बुडवायला आला होता ना !

होता होता कमरेपर्यंत पाणी आले.

तेवढ्यात आवाज आला, 'नाथ थांबा !'

कुणाचा हा आवाज ? राजा दचकला. राजमहालाच्या अंतर्गृहात स्वस्थ झोप घेणाऱ्या, मृदुमृदुल मंचकावर आराम करीत असणाऱ्या त्याच्या आवडत्या राणीचा हा आवाज नव्हता काय !

त्याने मागे वळून पाहिले. मग तो स्वत:च्या मनाशीच हंसला. इथं या जंगलांत अन् अशाभलत्या वेळी राणी कुठली यायला ! छे: भासच तो.

आणि राजा पुढे झाला.

पुन: आवाज आला, 'महाराज, थांबा !'

वृद्ध प्रधानजीचा केविलवाणा चेहरा राजाच्या डोळ्या-पुढे क्षणभर उभा राहिला.

पण क्षणभरच--

राजा पुढे चालला. पाणी गळ्यापर्यंत आले.

आणि तेवढ्यात हजारो किंकाळ्या एकदम उठल्या. राजा क्षणमात्र बावरला. कुणाच्या होत्या त्या किंकाळ्या ? कुणाची होती ती दु:खे. . .'धावा, महाराज, धावा' 'महाराज, या अनाथाला मदत करा' 'महाराज, आम्हाला शत्रूपासून वाचवा,' 'महाराज, हे दुष्ट आमच्या पदराशी झोंबत आहेत हो !'

राजाने आजूबाजूला पाहिले. पण छे, तेथे कुणीच नव्हते.

पुन: एकदा राजाने स्वत:ला सावरले. तो मनाशी म्हणाला, 'क्लेशाने तळमळणाऱ्या अनंत आत्म्यांनो, मला क्षमा करा. तुमचे क्लेश शक्य तोवर मी दूर केले. पण माझ्या हृदयाचे क्लेश कोण दूर करणार ? मला जाऊ द्या.'

आणि डोळे मिटून राजाने एक पाऊल पुढे टाकले.

राजाच्या डोळ्यापुढे क्षणभर अंधार पसरला. पण वेदना !

छेः–वेदना नाहीत, त्रास नाही, दुःख नाही. मरणकाळी यातना होतात असे जे म्हणतात त्या यातनांचा लवलेशही नाही.

राजाने डोळे उघडले आणि––

पाहतो तो काय ? जिकडेतिकडे रेतीचा रुपेरी समुद्र. पण पाणी कुठेच नाही.

राजा आश्चर्यचकित झाला. त्याने डोळे झाकले आणि पुनः उघडले. सभोवार पाहिले तो काय–तेच दृश्य ! तीच उंच उंच घनदाट झाडे, डोक्यावरचे ते शीतल चांदणे, ते विस्तृत रुपेरी छताप्रमाणे वाटणारे ते आकाश–आणि तळ्याच्या काठाशी उभा असलेला तो घोडा . . .

मग हे स्वप्न की भास !

हे तळे त्याने कितीदा पाहिलेले. याचे पाणी स्वतः चाखलेले, याचा तळ स्वतः अनुभवलेला–आणि आजच हे एकदम शुष्क कां झाले ? पाणी एकाएकी कसे आटले ?

आणि याचवेळी कुठून तरी हसण्याचा आवाज आला. राजाने दचकून समोर पाहिले तो जवळच दहावीस पावलाच्या अंतरावर वृक्षाच्या छायेत काठाशी पायऱ्यावर बसलेली एक अंधुक आकृति त्याला दिसली.

राजा पुढे गेला आणि त्याने पाहिले.

तो एक तरुण योगी होता. त्याने ध्यानस्थ बसल्याप्रमाणे मांडी घातली होती. त्याच्या अंगावर एक कौपीन आणि शिरावर

जटा. कांति सोन्यासारखी पिवळी आणि तेज:पुंज.

राजाला पाहताच तो योगी हसला आणि म्हणाला, "राजा, अशा भलत्याच वेळी इकडे कुठं ?"

राजा उमजला. हा सारा प्रताप या योगिराजाचा ! लागलीच गुडघे टेकून त्याने योगिराजाला वंदन केले आणि म्हटले, "महाराज, हे काय केलेत ?"

"कुठं काय झालं ? जे झालं ती ईश्वराची इच्छा".

"ईश्वराची की आपली ?"

"ईश्वराचीच ! ज्याने तुला मला जन्माला आणले, मोठे केले त्याची इच्छा. तळ्यात बुडून प्राण द्यावा म्हणून तर ईश्वराने तुला जन्माला घातले नाही ना !"

"पण महाराज–मग ईश्वराने हे दु:ख माझ्या वाट्याला घातले त्याचं काय ?"

"राजा, दु:खाची गोष्ट कशाला करतोस ? दु:ख कुणाला नाही. या जगात सुख आणि दु:ख दोन्ही मिळतात. सुखाच्या वेळी आनंदाने नाचावे आणि दु:खाच्या वेळी मात्र ईश्वराच्या नावाने खडे फोडावे हे निदान तुझ्यासारख्या मोठ्या माणसाला शोभत नाही. त्यातही तुला आपल्या दु:खाचा अंतच करावासा वाटत असला तर तुला कोण अडवणार ? जा. ते तळे तुझी वाट पाहत आहे !"

राजाने पाहिले तो काय ? पुन: एकदा ते तळे आपल्या अनंत जलविस्ताराने तुडुंब भरलेले दिसले.

तो योग्याच्या चरणावर मस्तक ठेवून म्हणाला, महाराज, असे रागावू नका ? तुम्हीच मला जगवलंत. माझा पुनर्जन्म

घडवून आणलात. तसेच मला पुनः जीवन द्या. माझ्या जीवनातले दुःख नाहीसे करा."

"राजा, ईश्वराच्या घरचे नेमानेम माणसाला चुकविता येत नाहीत."

"खरे आहे. पण ते आम्हा सामान्य माणसांना. तुम्ही साधु-संत काय वाटेल ते करू शकता. जे ईश्वराला अशक्य तेही तुम्ही शक्य करून दाखविता. कृपा करा आणि माझे दुःख दूर होईल असा काही उपाय मला सांगा."

योगी काही वेळ स्तब्ध राहिला.

राजाच्या ते लक्षात आले. त्याने विचारले, "महाराज, आपण असे गप्प कां? या हतभाग्याच्या दुःखाने आपल्या हृदयाला अद्याप पाझर फुटला नाही कां? आपल्यासारख्या साधुपुरुषांच्या दर्शनाने माणसांची जन्मोजन्मीची पापे सुद्धा जळून नष्ट होतात असे मी ऐकले आहे. माझं पाप इतकं का खडतर आहे, की आपल्यासारख्यांच्या दर्शनानंतरही ते नाहीसं होऊ नये."

तरीही योगिराज स्तब्धच!

राजाने त्याचे पाय धरले आणि म्हटले, "महाराज, आपण माझ्यावर रागावला तर नाही ना! आपण साधुसंत दयाळू असता. आपल्यासारख्यांच्या दर्शनाने माणसांना काय वाटेल ते प्राप्त होते. या अभागी माणसावर दया करा. माझे दुर्दैव धुऊन निघेल असे करा. लोक माझ्या दुर्दैवाला हसतात नि हिणवतात. पण माझं दुर्दैव मिटविण्याचा उपाय कुणी सांगत नाही. लोक म्हणतात जे कुणाला करता येत नाही ते सत्पुरुषांना करता येते. करा एवढी दया. मला पुत्रसुख मिळू द्या. तसे होत नसेल तर आपल्या पायापाशी मुक्ति तरी द्या!"

राजाचे ते भाषण ऐकून योगी म्हणाला, "राजा मी मघा-पासून याचाच विचार करीत आहे. पण काय सांगू ? तुझ्या नशिबी पुत्रसुख नाही. तुला पुत्र झाला तरी त्यापासून तुला सुख नाही."

राजाने ते ऐकले आणि आशेने त्याचे हृदय भरून आले. काय होते ते शब्द. 'तुला पुत्र झाला तरी' असेच ना योगिराज त्याला म्हणाले होते. होय–असेच ! अगदी हेच शब्द !

आशेचा एक नवा किरण राजाच्या डोळ्यात चमकू लागला. तो आर्जवाने म्हणाला,

"महाराज, मला पुत्रसुख मिळणार नाही ना ! नसू द्या. पण पुत्रमुख तरी पाहायला मिळेल ना ! तेवढे तरी मिळू द्या. तुमच्या तोंडून निघालेले तेवढे शब्द खरे होतील असे करा. पुत्रसुख नको पण पुत्रमुख तरी पाहू द्या."

योगिराज म्हणाले, "राजा, मी काय म्हणतो ते नीट लक्षात घे. तुला पुत्रसुख नाही. उलट त्यापासून दुःख मात्र आहे. अरे, पुत्र आपली काळजी मिटवितो तशी कधीकधी ती वाढवितोही. तो जितका सुखाला तितकाच दुःखालाही कधीकधी कारण होतो. राजा, अरे, तुला पुत्र झाला आणि तो वाईट निघाला किंवा असून तो दृष्टीआड झाला तर तो तुझ्या दुःखालाच उलट कारणीभूत नाही का होणार ? लोक आज तुला निपुत्रिक म्हणून हिणवतात पण उद्या तुला पुत्र होऊन तो वाईट निघाला तर तुझी जी दुष्कीर्ति होईल त्यापेक्षा तुझी आजची स्थिति कितीतरी चांगली. तरी हा विचार तू मनातून काढून टाक. पळत्याच्या पाठीमागे लागण्यात काही अर्थ नसतो. आजच दुःख मिटविण्याचा तू विचार करीत आहेस–पण उद्याचं तुझं सारं दुःख तुझ्या कपाळावर मला

ठळक दिसत आहे. म्हणून म्हणतो, माझं ऐक अन् हा विचार मनातून काढून टाक."

पण राजाला तो विचार पटला नाही. आणि पटणे शक्यही नव्हते पुत्रसुखाच्या मोहात तो गुंतून पडला होता. त्या योग्याच्या बोलण्यात त्याला उलट आशेचा एक नवा किरण दिसू लागला होता. 'तुला पुत्र झाला तरी' हेच तपस्व्याचे शब्द त्याच्या कानात आणि मनात घोळत होते. त्याची आजवरची मेलेली आशा आता जिवंत झाली होती. टवटवीत झाली होती. वठलेल्या खोडाला पालवी फुटावी तसे त्याचे मन आशेने फुलून आले होते. या साधुपुरुषाच्या आशीर्वादाने का होईना, आपला खरोखरच पुत्रलाभ होईल असे त्याला वाटू लागले होते.

विनवणीच्या स्वरात तो तपस्व्याला म्हणाला, "महाराज, मला पुत्रमुख पाहायला मिळेल असंच ना आता तुम्ही म्हणाला ? साधुसत्पुरुषांची वाणी कधी खोटी ठरत नाही. तुमच्या या अमृताच्या वाणीने माझे जळलेले अंतःकरण टवटवीत झाले आहे. त्याला आता निराश करू नका. पुत्राच्या लाभाने माझे दुःख उलट वाढेल असं तुम्ही म्हणता. ते खुशाल वाढो, ते मला चालेल. आजच्या या दुःखाच्या परिस्थितीइतके काही ते दुःख खचित कटु वाटणार नाही. कृपा करा आणि माझ्या नशिबाची रेषा आपल्या हाताने उजळ करा. माझ्या जळलेल्या आशेला थोडी तरी पालवी फुटू द्या. माझ्या या आसावलेल्या डोळ्यांना एकदा पुत्रमुख पाहू द्या. माझ्या पितरांना सुखाने पाणी पिता येईल असे करा. एवढी दया माझ्यावर करा. मी तुमच्या पाया पडतो."

असे म्हणत राजाने खरोखरीच त्या तपस्व्याच्या पायावर लोटांगण घातले आणि तो रडू लागला.

त्या तपस्वी महापुरुषाला राजाचे ते दुःख पाहवले नाही. त्याने त्याला उठविले, धीर दिला आणि म्हटले, "राजा, ठीक आहे. तू म्हणतोस तर तुला पुत्रलाभ होईल–"

"होईल ! बोला महाराज–– बोला ! हे अमृताचे शब्द मला नीट ऐकू द्या. अहाहा ! सत्पुरुषांची हृदये म्हणजे दयेचा मेघ. तो माझ्यावर वर्षू द्या !"

"होय ! राजा तुला पुत्रलाभ होईल. पण पुनः एकदा मी सांगतो ते नीट लक्षात ठेव. होणारासारखी बुद्धि होते म्हणतात ती टळायची नाही. पण तो धडा तुझा तूच गिरवावा हेच बरे. हे फळ देतो ते घे. यातले अर्धे तुला घे आणि, अर्धे तुझ्या बायकोला दे. तुला लवकरच पुत्रलाभ होईल."

राजाने आनंदित मनाने ते फळ घेतले, आणि पुनः एकदा त्या तपस्व्याच्या चरणाला प्रणाम केला.

उठून पाहतो तो काय, तपस्वी अंतर्धान पावलेला. तो आला कसा आणि गेला कुठे ते कळले नाही. राजाला आश्चर्य वाटले. क्षणभर वीज चमकावी आणि अंतर्धान पावावी तसेच नव्हते का हे झाले ?

पण कसे कां असेना–कृपेचा मेघ वर्षला होता. प्रसादाचा तरू बहरला होता. आसावलेली जमीन जलसिंचनाने विसावली होती. राजाचे मन आनंदाने बहरून आले.

तपस्व्याचे ते शब्द त्याच्या मनात सारखे घोळत होते, 'होय, राजा ! तुला पुत्र होईल.'

राजाने सभोवार पाहिले.

झाडे डोलत होती, वारा वाहत होता, आणि आकाशातला नक्षत्रांचा राजा झपाझप पावले टाकीत निघाला होता.

# ३

राजा अरण्यात गेला तेव्हा इकडे राजमहालात अस्वस्थता आणि गोंधळ माजला होता. दिवे–लागणीची वेळ टळली. अंगणात दिवे लागले. राजमहाल उजळला. सनया वाजल्या आणि बंद झाल्या. तरी राजा येईना. राणीला चिंता वाटू लागली. महाराज राजकारणात निमग्न असले म्हणजे प्रहर न प्रहर राजसभेत खलबते चालायची. पण आज सारेच सामसूम. प्रहर लोटला तशी राणी अस्वस्थ झाली. तिने बाहेर निरोप पाठविला. पण तिला कळले की महाराज इथे नाहीत. दिवसाच्या प्रहरी बाहेर गेले ते अद्याप कसे आले नाहीत. राणीने प्रधानजींना विचारायला पाठविले. निरोपासरशी प्रधानजी धावतच राजवाड्यात आले. पाहतात तो काय, महाराजांचा ठावठिकाणा नाही.

साऱ्यांचीच तोंडे मलूल झाली. राणी अस्वस्थ झाली. प्रधानजींच्या तोंडचे पाणी पळाले. दासदासी कावऱ्याबावऱ्या झाल्या. देवडीवरच्या पहारेकऱ्यांच्या मुद्रा चिंतातुर दिसू लागल्या. लागलीच सारीकडे माणसे पाठविण्यात आली. मशाली पेटल्या. अश्वशाळेतून अश्व आणले. घोडेस्वार सज्ज झाले––

आणि तेवढ्यात आवाज आला, 'महाराज आले, महाराज आले!'

साऱ्यांच्या मुद्रा पुनः प्रसन्न झाल्या. प्रधानजींनी सुटकेचा

श्वास टाकला. सैनिकांचे चेहरे आनंदी झाले. दासी धावतच ती वार्ता सांगायला महालाकडे गेल्या. राणीसाहेबांना बातमी कळली. जीव थाऱ्यावर आला.

प्रधानजी महाराजांना म्हणाले, "महाराज, अशा रात्री आम्हा साऱ्यांना टाकून कुठे गेला होता? आम्हाला तर सांगायचं! आम्हीही बरोबर आलो असतो. काही कमीजास्त झाले असते तर—".

"काही नाही! जे झालं ते चांगलंच झालं!" राजा आनंदाने हसतहसत म्हणाला

राजाची आनंदी चर्या पाहून प्रधानजीही आनंदले. 'ईश्वराची कृपा की आपण परत आम्हाला सुखरूप भेटलात. पण गेला होता कुठे आणि चांगलं झालं म्हणता ते काय?'

"सांगतो! सारं काही स्वस्थपणाने सांगतो."

इतक्यात दासी आली आणि नम्रपणे अभिवादन करून म्हणाली, "राणीसाहेब आठवण करीत आहेत."

"हो, हो, आलोच."

मग राजा राणीच्या महालात गेला.

राजाला पाहिले आणि राणीचे मुख प्रसन्न झाले. सहास्य मुद्रेने तिने राजाला अभिवादन केले आणि म्हणाली, "महाराजांचा जयजयकार असो!"

तिला उठवीत राजाने म्हटले, "राणीसाहेबांचे कुशल आहे ना!"

"आपले कुशल असले तर आमचेही कुशल. इतका प्रहर रात्र सोडून गेलात तेव्हा जीव कसा थाऱ्यावर नव्हता. वाटलं, आमच्या हातून काही चूक तर नाही ना घडली? महाराज

आमच्यावर रागावले तर नाहीत ना ?"

"नाही राणी, रुसलो होतो पण तुझ्यावर नाही–दैवावर ! रागावलो होतो पण तुझ्यावर नाहीतर विधात्यावर !"

राणीला त्या बोलण्यातले मर्म विशेष उमजले नाही. पण ती म्हणाली; "पण आता तर गेला ना तो राग !"

"होय गेला !"

"तुम्ही गेला अन् इथं जिवाला किती घोर लागला होता." राणी रुसल्या स्वरात म्हणाली. "कितीदा सांगितलं की जायचं तर सांगून जावं–निदान बरोबर कुणाला तरी घेऊन जावं पण कुठलं ऐकायला. बरं तर बरं, सुखरूप आलात. आई जगदंबेने आपल्याला परत आणलं. सारखं देवाला म्हणत होते, 'देवा, महाराजांना परत आण–नाहीतर मला तरी त्यांच्याकडे घेऊन जा. त्यांचे दर्शन झालं नाही तर मी जगणार नाही. अन् इकडे आपण मात्र पुरते निष्ठुर झाला होता, होय ना ?"

"सांगितलं ना देवी–निष्ठुर तुझ्यावर नव्हतो झालो."

"मग का आम्हाला सोडून गेलात ? असं कोणतं महत्वाचं काम होतं की अगदी कुणाला नकळत जायचं झालं ? मला राहो एकदाचं–पण प्रधानजींना देखील नाही कळवलंत. किती जीवाला घोर लागतो माणसाच्या !"

"पण देवी–हा घोर आता सरला म्हणून समज. लवकरच सूर्योदय होईल आणि अंधाराचा लवलेश सुद्धा राहणार नाही."

"कसला तरी आनंद झालेला दिसतोय स्वारीला होय ना!"

"हो, झाला आहे खरा पण तूच ओळख ना !"

"मला काय कळणार त्यातलं ! काही तरी तुमच्या राज-कारभारासंबंधीच असेल, होय ना !"

"छे, चुकलीस !"

"मग काय एखादा चांगला दृष्टांत झाला की काय ?"

"आता थोडी मार्गावर आलीस ?"

"सांगू, एखाद्या तपस्व्याला भेटायचं झालं असेल! स्वारीला तपस्व्यांचे दर्शन झाले की पुत्रसुखाचा आनंद होतो,– होय ना ?"

राजा नुसताच हसला.

"खरं आहे ना माझं म्हणणं !"

"होय, थोडेसे बरोबर आहे. पण या वेळचा आनंद माझा एकटयाचा नाही. तुलाही आनंद वाटावा अशीच ती गोष्ट आहे."

"मलाही आनंद वाटावा ? अशी गोष्ट, ?"

"इतके दिवस व्रत नि उद्यापनं करीत होतीस ते विसरलीस वाटतं !"

राणीने लाजून मान खाली घातली. मग हळूच उदासपणे ती म्हणाली, "उगीच कशाला ती वेडी आशा." असं म्हटलं खरं पण मनात कुठे तरी काटा रुतल्यासारखे वाटले आणि जीभ क्षणभर चाचरली.

"वेडी कुठली ! पण पुत्र व्हावा हे तर मनात आहे ना !" राजाने विचारले.

"पण नुसतं मनात असून काय उपयोग ?"

"मनात असलं, म्हणजे आज ना उद्या ते घडून येतंच. देवी, तुला पुत्र हवा आहे ना ! पुत्राचं मुख पाहावं अशी लालसा माझ्याप्रमाणेच तुझ्याही मनात धरणं देऊन बसली आहे ना ! मग ती सफळ झालीच पाहिजे."

"पण ती कशी नि केव्हा ?"

"तेच तर सांगायचं आहे. आज रात्री मी गेलो तेव्हा असाच निराश होऊन गेलो होतो. वाटलं होतं, हे निपुत्रिकाचं जिणं काय कामाचं. मनात आलं, संपवावं हे जोवन आणि त्याप्रमाणे तळ्यात बुडी देखील घेतली होती—"

राणीने एकदम राजाच्या ओठावर हात ठेवून म्हटले "अगबाई, काही तरी काय बोलायचं"

"जे झाले तेच सांगतो."

"नको नको, असे अभद्र काहीतरी नका बोलू. मी जाईन अशाने उठून."

मंचकावरून उठून चाललेल्या राणीचा हात धरून राजाने तिला जवळ बसविले आणि म्हटले, "घाबरू नकोस, पुढे काय झाले ते तर ऐक"

राणीने हळूच मान वर केली "आता सारखं भलतंच काही बोलायचं असेल तर नाही हं ऐकायची"

"छे भलतंच नाही, चांगलंच सांगतो. ऐक, मी तळ्यात उतरलो. कमरेपर्यंत पाण्यात गेलो आणि--"

"आणि काय ?"

"मला शब्द ऐकू आले, 'नाथ, थांबा.' क्षणभर वाटलं तुझाच हा आवाज."

"आला ना ऐकायला माझा शब्द ?--इथं केव्हापासून जगदंबेपुढे विनवीत होते. तिचीच ती सारी कृपा"

"पुढे तर ऐक."

"पुढे काय ?"

"गळ्यापर्यंत पाण्यात गेलो. डोळे मिटले अन् घेतली बुडी. वाटलं, पुरती जीवन्मुक्ति मिळेल. पण काय ? डोळे उघडून

पाहतो तो तळ्यात थेंबभर सुद्धा पाणी नाही."

"अगबाई, चमत्कारच म्हणायचा !"

"होय चमत्कारच ! एका महापुरुषाने नुसते पुनर्जीवनच दिले नाही तर पुत्रलाभाचा आशीर्वादही दिला."

"काय म्हणता ? पुत्रलाभ होईल ?" राणीच्या स्वरात आनंदाबरोबरच आश्चर्यही मिसळले होते.

"होय पुत्रलाभ ! पण–"

राजा थांबला, पुढची गोष्ट बोलावी की न बोलावी या संभ्रमात तो पडला असावा. त्याच्या त्या संभ्रमित चर्येकडे पाहत राणीने विचारले "पण–काय ?"

"नकोच ते."

"सांगावं ना ! कसलंही दु:ख असलं तरी ते सोसायची तयारी आहे."

"तो महापुरुष म्हणाला, पुत्रलाभ होईल पण त्यापासून दु:खच संभवेल. का खिन्न झालात ना ?"

"छे खिन्नता कसली ? जे प्रारब्धात असेल ते होईल !"

"म्हणजे पुत्रलाभ हवा तर !" राणीने मान डोलावली आणि म्हटले, "आपण काय मागितले ?"

"तुला जे हवे तेच"

"स्पष्ट सांगावे ना गडे !" राणीच्या मुद्रेवर किती अधीरता होती ! तिकडे पाहात राजा म्हणाला––

"पुत्रसुख न मिळाले तरी चालेल पण पुत्रमुख पाहायला हवे. होय ना ! हे बघ फळ हा त्या महापुरुषाचा प्रसाद आपण उभयतांनी सेवन करायचा."

इतक्यात कोंबडा आरवला. त्या पाठोपाठ सनई वाजू

लागली. देवमंदिरातला चौघडा त्या पाठोपाठ निनादू लागला. स्नानासाठी निघालेल्यांचा थवा 'हरहर गंगे' करीत निघाला. देवमंदिरातल्या घंटिका वाजू लागल्या.

राजा महालातून उठला आणि बाहेर पडला.

राजा बाहेर पडला आणि लवंगलता आत आली. राणीची ही मैत्रीण होती. नाव लवंगलता ! बोलायला तिखट आणि दिसायला हडकुळी; लोक तिला थट्टेने 'लवंगी मिरची' म्हणत. तिला वचकून असत. अशा माणसापासून नाहीतरी लोक चार हात दूरच राहतात आणि मग अशा माणसांना वाटतं की लोक आपल्याला भितात तिचा नवरासुद्धा तिच्याशी जरा नरमूनच वागायचा आणि ती मात्र दिवसभर त्याच्याशी घुसफुस करीत असायची. पण लवंगलतेचा एक गुण लक्षात घेण्याजोगा होता. तिच्या मनात असलं तर गोडगोड बोलायची आणि कुणाच्याही मनातलं गुपित काढून घ्यायची. म्हणून तर राणीचा तिच्यावर फार लोभ होता !

राजा काल महालात नसल्याची बातमी रात्रीच सारीकडे पसरली होती. मग लवंगलतेला ती कशी नाही कळणार—आणि कळल्यावर तिला गप्प कसे राहवणार ?

सकाळ उजाडली आणि लवंगलता महालात आली. राणीच्या मैत्रिणीला कोण मज्जाव करणार ? आली ती 'महादेवी' म्हणून हाक मारीतच आत शिरली.

"काय महादेवी, कुशल आहे ना !"

"कोण ? लवंगलता–असं परक्यासारखं काय बोलतेस ! ये–इथे बैस."

"हे काय ? तुमचे डोळे असे का सुजलेले ? हो खरंच. महाराजांचा काल कुठे पत्ता नव्हता म्हणून ऐकलं. म्हणून डोळे लाल झाले वाटतं. पण ते सुखरूप परत आलेत. होय ना !"

"होय, काल रात्रीच परत आले."

"पण मी म्हणते. महाराजांनी तरी एवढं काय मनाला लावून घ्यायचं ? नाही एखाद्याला पुत्र होत म्हणून काय तेवढ्यासाठी दुःख करून घ्यायचं.'

"निपुत्रिकाचं दुःख काही वेगळंच असत. इतरांना ते नाही कळणार !" महाराणी आपल्या नेहमीच्या संथ स्वरात म्हणाल्या.

"जळलं माझं तोंड ते !" लवंगलतेने स्वतःच्या थोबाडीत एक चापट हाणून घेतली आणि म्हटलं, "देव तरी कसा विचित्र, नको तेथे पुत्र देतो, नकोसे व्हावे इतके देतो आणि—"

महाराणींनी तिच्या तोंडावर हात ठेवला आणि म्हटले.

"असं अभद्र बोलू नये, लवंग."

"खरं तेच सांगते देवी, कधीकधी वाटतं, कुणाला हवे असतील तर पुत्र वाटून टाकावे."

"बरीच बोलत आहेस ग तू ! अग देवाचे देणे ते; असं उघड्यावर टाकण्यासाठी का असतं."

काही वेळाने हसतहसत त्या म्हणाल्या, "सेनापतीचा काय सल्ला आहे ? नकोशी का झाली आहेत मुलं !"

"नाही, बाई ! त्यांच्या मनातलं काही मला माहित नाही. पण पुत्रासाठी झुरणाऱ्या स्त्रीचं दुःख पाहिलं म्हणजे वाटतं, आपलं एखादं मूल स्वसंतोषानं तिच्या ओटीत टाकावे

आणि म्हणावे, घे हा पुत्र. तुझाच समज आणि संभाळ त्याला."

लवंगलतेच्या बोलण्याचा अर्थ महाराणीच्या लक्षात आला नाही. त्या आपल्या निराळ्याच आनंदात गर्क होत्या. उत्तरादाखल काहीतरी बोलायचे म्हणून त्या हसून म्हणाल्या, "छान उपाय सुचवलाम बाई ! एखाद्या निपुत्रिकेला पटत असला तर तिने जरूर करावा."

"पण महादेवींना रुचतो का हा उपाय ?"

"न रुचायला काय झालं ! देणारी देत असली तर घेणारीने का घेऊ नये !"

लवंगलतेच्या मुद्रेवर संतोषाची छटा पसरली. जणु सावधपणाने एकएक पाऊल ती टाकत होती आणि तिला हवे तसे ते पडतही होते.

"बाकी मूल संभाळायचं म्हणजे सुद्धा कोण कष्ट ?" लवंगलता स्वत:शीच उद्गारल्यासारखी म्हणाली.

"खरं आहे ते ! दुसऱ्याचं मूल आपलं म्हणून कितीहि सांभाळलं तरी ते आपलं होतच असं नाही."

महादेवींना म्हणायचे आहे तरी काय–हेच लवंगलतेला कळेना.

बऱ्याच दिवसापासून लवंगलतेच्या मनात एक कल्पना घोळत होती. ती महाराजांना कुणीतरी कळवायला हवी होती आणि त्यासाठी महाराणीचे मन पारखून पाहायला हवे होते. प्रौढत्वाकडे झुकलेल्या आणि पुत्र संभवाच्या बाबतीत दिवसेंदिवस निराश होणाऱ्या महाराणींना कदाचित आपली कल्पना रुचेल असे तिला वाटले होते. मनातील त्याच कल्पनेचा धागा उचलून ती आपल्याला हवा तसा त्या योजनेला आकार देऊ पाहत होती.

पण इथे तर प्रयत्न करूनही महादेवीच्या मनाचा थांग लागत नव्हता.

क्षणभर काय बोलावे हेच लवंगलतेला सुचेना. पण हळूच गेलेला धीर सावरीत ती म्हणाली, "मी तर महाकालेश्वराला साकडं घातलं काल-की कसंही कर आणि महादेवींना पुत्रसुख मिळू दे."

कसल्यातरी आनंदाने महादेवींचे नेत्र चमकून उठले. लवंगलतेच्या कंठाला त्यांनी एकदम मिठी मारली आणि त्या म्हणाल्या, "लवंग, तुझ्या तोंडात साखर पडो !"

"अगबाई ! काही शुभवार्ता आहे तर !"

"महाराजांना पुत्रलाभ होईल असा एका योग्याचा आशीर्वाद आहे."

महाराणीने "म्हणतेस तरी काय ? महाराजांना पुत्रलाभ होईल !" महाराणीने मान डोलवली.

लवंगलतेने स्वतःच कडकडून महाराणींना मिठी मारली आणि म्हटले, "महादेवी ! किती धन्य वाटलं हो मला !"

"होय, मला माहित आहे ही वार्ता ऐकून तुझ्यासारखेच किती तरी लोक धन्यता मानतील. प्रजावत्सल महाराजांच्या लौकिकाला साजेशी कृतार्थता त्यांना लाभेल."

मग अनेक प्रकारांनी आपला आनंद दर्शवीत लवंगलता परतली. पण त्याचवेळी तिची मुद्रा उतरून गेली होती.

तिच्या मनातील योजना आतल्याआत ढासळू पाहत होती.

# ४

क्षिप्रानदीच्या वाळवंटावरील मुलांचा खेळ चांगलाच रंगात आला होता.

वाळवंटातील घाटाच्या चौथऱ्यावरील एका शेवटच्या उंच पायरीवर खेळातला राजा एखाद्या सिंहासनावर बसावे तसा डौलाने वीरासन घालून बसला होता. इतर मुलांच्या मानाने त्याचे शरीर गोटीदार आणि भव्य वाटे. वर्ण गोरापान. डोळे अतिशय सतेज आणि मुखश्रीवर आणि एकंदर अंगोपांगांच्या राजश्रियेचा डौल दिसत होता.

'राजा आणि प्रजा' हा खेळ चालू होता. भालदार चोपदार दोन्ही बाजूला उभे होते. कुणी वाकून मुजरा करीत होते तर कुणी न्यायाची दाद मागत होते. राजाही प्रजेचे बोलणे ऐकून घेत होता. भांडणे तोडत होता. शिक्षा सांगत होता, कुणाला कैद तर कुणाला दंड.

इतक्यात एक विचित्र खटला न्यायासनापुढे आला.

'हा राजकुमार मला मघापासून अभद्र शिव्या देत आहे. आईबापावरून शिव्या. मी त्या ऐकून घेणार नाही.' असे म्हणत एका मुलाने राजकुमार चंद्रादित्यालाच हात धरून न्यायासनापुढे खेचले. त्याचा चेहरा काहीसा क्षुब्ध आणि खवळलेला तर राजपुत्राच्या चर्येवर होती उर्मटपणाची छटा.

राजपुत्राला धरून आणण्याच्या या कृत्यामुळे खेळातील

मुले कावरीबावरी झाली असावी. हे भांडण काहीसे विपरीत होते. मुलांमध्येच दोन तट पडण्याचा संभव उत्पन्न झाला. राजपुत्राने ज्याला शिव्या दिल्या तो शीलभद्र आणि त्याचे सोबती जणु प्रतिकारार्थ दंड थोपटून उभे होते तर राजपुत्रा-विरुद्ध गाऱ्हाणे आल्यामुळे त्याच्या बाजूची मुले काहीशी संतापली होती.

"या राजपुत्राने मला शिव्या दिल्या," संतापाने ज्याचे डोळे फुलले होते असा शीलभद्र म्हणाला.

खेळातल्या राजाने पृच्छा केली, "मी काय करावं असं तुला वाटतं, शीलभद्र."

"याला योग्य शिक्षा व्हावी."

"ठीक आहे. अपराध्याला सिंहासनापुढे उभे करा."

"हा उभा आहे!"

चंद्रादित्याकडे पाहून सिंहासनस्थ राजाने म्हटले.

"चंद्रादित्य, तू शिव्या दिल्यास हे खरं आहे?"

"होय. दिल्या-आणखी सुद्धा देईन."

"शिव्या देणं हे चांगलं कृत्य आहे असं तुला वाटतं का?"

चंद्रादित्य यावर बोलला नाही.

इतर मुलांकडे वळून राजाने म्हटले, "महाजनहो, अपराधी बोलत नाही त्या अर्थी त्याला अपराध मान्य आहे."

"नाही, नाही! मला हे काहीच मान्य नाही. तू खेळातला राजा असशील पण मी खरा राजपुत्र आहे. मीच वस्तुतः राजा व्हायला हवं. मला तुझा अधिकार मुळीच मान्य नाही."

खेळातला राजा या उद्‌गाराने गडबडला नाही. उलट सौम्यपणे चंद्रादित्याकडे वळून म्हणाला, "चंद्रादित्य, तुला असं

बोलणं शोभत नाही"

"मी राजपुत्र आहे." त्या स्वरात पराकोटीचे औद्धत्य होते

"होय. तू राजपुत्र आहेस म्हणूनच तुला हे शोभत नाही. जेव्हा तू आमच्याबरोबरीने खेळात भाग घेतलास तेव्हाच तुला हे खेळाचे सारे नियम लागू झाले आहेत एखादा नियम तुला कडक वाटला तर तसं तू सांगू शकतोस. पण परस्परात भांडण होणं हे आपल्या खेळाच्या विरुद्ध आहे. त्यात तू तर राजाचा अधिकार अमान्य करीत आहेस."

मित्रांकडे वळून तो म्हणाला, "राजपुत्राला माझा अधिकार मान्य नाही तुम्हाला तरी तो मान्य आहे काय ?"

साऱ्यांनी एकमुखाने गर्जना केली. "आम्हाला तूच राजा हवा आहेस."

खेळातला राजा उठून उभा राहिला होता तो पुन: आपल्या सिंहासनावर विराजमान झाला. मग त्याने सभासदांना उद्देशून विचारले, "महाजनहो, या कलहाचा विचार करण्यापूर्वी एका गोष्टीचा निर्णय आपण घेतला पाहिजे".

"कसला निर्णय ?" महाजनांनी विचारले.

"शिव्या देणं हा तुम्ही अपराध मानता ना ?"

सभासदांनी एकमुखाने उत्तर दिले, "होय."

"अशा अपराधाला शिक्षा व्हायला हवी की नाही ?"

"शिक्षा व्हायला हवी."

"अपराधी स्वत:ला राजपुत्र म्हणवतो यादृष्टीने त्याच्या शिक्षेचा वेगळा विचार करायचा आहे काय ?"

"नाही."

"योग्य बोललात ! महाजनहो, मी तुमचा निर्णय आनंदानं

स्वीकारतो. तुमचा निर्णय अतिशय पोक्त आणि समंजसपणाचा आहे. न्यायबुद्धीला हितकारक तसा प्रजेच्या कल्याणाला उपकारक. मी तुमचा निर्णय दप्तरी मंजूर करून ठेवतो."

शीलभद्राकडे वळून तो म्हणाला, "राजकुमाराला स्वहस्ते शिक्षा द्यावी असं तुला वाटतं काय ?"

शीलभद्राने नुसतीच मान हलवली.

"तर मग शीलभद्र, तू आम्हासमक्ष या चंद्रादित्याच्या गालात एक जोराची थप्पड मारावीस."

"नको !" शीलभद्र म्हणाला, "मी ते करणार नाही. मला वाटतं, राजपुत्राला या वेळेपुरती क्षमा व्हावी."

"तो असा अपराध पुन: करणार नाही असा तू या न्याय-सभेला निर्वाळा देऊ शकतोस काय ?"

शीलभद्र बुचकळ्यात पडला असावा. त्याने केवळ चंद्रादित्याच्या मुद्रेकडे पाहिले.

"सभासद हो, राजपुत्राला शिक्षा व्हावी असं सभेचं मत आहे. शीलभद्र तर स्वत: शिक्षा करायला सज्ज नाही. अशा स्थितीत काय करावं ते तुम्ही सुचवावं."

"राजेसाहेबांना जे योग्य वाटेल ते त्यानी करावं."

सिंहासनस्थ राजाने चंद्रादित्याकडे वळून म्हटले, "चंद्रादित्य, पुन: असा अपराध तू करणार नाहीस अशी ग्वाही तू या सभेला देऊ शकतोस काय ?"

राजपुत्राने हेटाळणीच्या स्वरात म्हटले, "विक्रम, मी मघाच सांगितलं की मला तुझा अधिकार मान्य नाही"

सिंहासनस्थ राजाची मुद्रा काहीशी उग्र दिसली.

तो म्हणाला, "चंद्रादित्य, दयेच्या दृष्टीनेही तुझ्या अपराधाकडे पाहावे अशी तुझी पात्रता नाही. मघापासून मी पाहत आहे, तू आपल्या खेळगड्यांनाही मानू इच्छीत नाहीस. इतकेच नव्हे तर वाटेल तशा अभद्र शिव्या देण्यासही तुला लज्जा वाटत नाही तू राजपुत्र म्हणवतोस त्याअर्थी तुझा अपराध आणखीच निंदास्पद ठरतो खरं पाहता राजपुत्राने आपल्या शीलाचा आदर्श खेळगड्यापुढे ठेवायला हवा. पण तू मात्र आपल्याच दोषांना उलट गुणस्वरूप देऊ पाहत आहेस."

मग तो महाजनाकडे वळून म्हणाला, "महाजनहो, या न्यायसभेने ठरविलेला निर्णय अमलात आणणं हे राजा या नात्याने माझं कर्तव्य आहे. शिक्षा व्हायला हवी आहे आणि ती करायला कुणी पुढे होत नाही तेव्हा माझं कर्तव्य मला स्वत:लाच पार पाडणं भाग दिसते."

असे म्हणून खेळातला राजा उठला आणि त्याने चंद्रादित्याच्या गालावर एक चपराक मारली.

मग चंद्रादित्य तेथे थांबला नाही.

रागारागाने खेळातून बाहेर पडलेला चंद्रादित्य नेहमीप्रमाणे सेनापतीच्या वाड्याकडे वळला नाही की लवंगलता मावशीला भेटला नाही तसे पाहिले तर लवंगलतेने त्याची बाजू घेऊन विक्रमाला सुनावलेही असते पण आज त्याला ते नको होते. त्याने सरळ राजवाडा गाठला आणि आपल्या मातेच्या महालात प्रवेश केला.

त्याची धुसफुसती चर्या पाहून राजमातेने विचारले, "काय रे, एवढी धुसफुस कसली ? मावशी काही बोलली का ?"

"मावशीचा पोरगा भलताच उद्धट आहे."

"त्याने कोणता उद्धटपणा केला ?"

"सरळसरळ माझ्या थोबाडीत मारली त्याने. मी एक राजपुत्र. माझा त्याने असा अपमान करावा काय ?"

"मानापमानाच्या या तुझ्या कल्पना काहीशा विचित्रच दिसतात ?"

"मी राजपुत्र आहे हे मी कधीच विसरू शकत नाही"

बारा वर्षाच्या आपल्या पुत्राकडे राजमातेने आपादमस्तक पाहिले आणि म्हटले, "नुसतं राजपुत्र म्हणवून घेण्यानं अधिकार मिळत नसतो तो मिळवावा लागतो."

"ते जाऊ दे पण त्या विक्रमाने माझ्या थोबाडीत मारली त्याचा तर मी काहीच अपराध केला नव्हता."

"पण दुसऱ्या कुणाचा तरी अपराध केला होतास ना !"

राजपुत्र स्तब्ध बसला.

"कुणाचा कसला अपराध केलास आणि मधल्यामध्ये विक्रमाने शिक्षा केली असं का तुला म्हणायचं आहे ?"

मला काय म्हणायचं आहे ते सारंच तुला सांगण्यात काही लाभ दिसत नाही."

राजपुत्राचा तो उर्मट स्वर राजमातेला आवडला नाही. पण काहीशा सौम्य स्वरात ती म्हणाली. "तुझं म्हणणं खरं आहे बाबा. दोन्ही बाजू नीट कळल्याशिवाय उगीच कुणाचा पक्ष घेऊन बोलणं मला आवडत नाही. ते काम तुझ्या मावशीनंच करावं. मला एवढं कळतं की मावशीच्या पोराने तुझा काही अपराध केलेला दिसत नाही."

चंद्रादित्य अधिकच भडकला आणि म्हणाला, "तुला त्याचा दोष कधीच दिसत नाही. जेव्हा पहावं तेव्हा माझाच

दोष दिसतो."

"दिसतो– नव्हे आहेच ! कुमार, आता याच प्रकरणी एक सोडून दोन अपराध केले आहेस."

"दोन अपराध ?"

"होय. पहिला अपराध म्हणजे स्वत: केलेली गोष्ट लपविण्याचा. तू जरी सांगितलं नाहीस तरी तुमच्या भांडणाची वार्ता माझ्या कानापर्यंत आली आहे. ती तू मात्र लपवीत आहेस."

चंद्रादित्य बोलला नाही.

"आणि दुसरा अपराध असा की तू तुझ्या सोबत्याला अभद्र शिवी दिलीस ! त्यानं बिचाऱ्यानं तुझी गय केली ही गोष्ट वेगळी पण त्यामुळे तुझा अपराध कमी ठरत नाही गंमत अशी की आपल्याकडून घडलेल्या अपराधाची तुला काडीमात्र क्षिति नाही. तुझ्यासारख्या थोरांच्या मुलाच्या तोंडी अशा अभद्र शिव्या येतात तरी कशा ? कसली भलती संगत लागली आहे तुला ?

मग राजपुत्र चंद्रादित्य तेथे थांबला नाही.

तो तेथून आपल्या पित्याकडे गेला आणि यावेळी मात्र झालेली हकीगत त्याने बरीचशी तिखटमीठ लावून त्यांना सांगितली.

प्रतापादित्य हसून म्हणाले. "कुमार, खेळात भाग घ्यायचा म्हणजे त्याचेही काही नियम असतात आणि ते पाळावे लागतात."

"पण खेळातही कधी अन्याय होतोच ना !"

"म्हणजे तुला न्याय हवा आहे तर !"

राजपुत्राने मान डोलावली.

"म्हणजे तुझ्या त्या खेळातल्या राजाला मी जाऊन भेटावं असं म्हणतोस ?"

"होय."

"अवश्य जाईन. खेळातल्या राजाने का होईना अन्याय केला असला तर त्याचीही चौकशी व्हायला हवी. विशेषत: त्यानं प्रतापादित्याच्या पुत्राच्या तरी थोबाडीत मारायला नको होती."

पित्याच्या या उद्गाराने राजपुत्र खुलला. तो म्हणाला, "मी तरी तेच म्हणतो."

"पण या गोष्टीची दुसरीही बाजू लक्षात घ्यायला हवी. म्हणजे प्रतापादित्याच्या पोरानंही आपला मान सांभाळून घेण्याची दक्षता ठेवायला हवी."

राजपुत्र काहीसा गडबडला. पित्याच्या या भाषणाचा अर्थ त्याला कळला नसावा.

"कुमार, राजपुत्र या नात्यानं आपल्या सोबत्यात मिरवणं तुला योग्य होणार नाही. यापुढे तू अशा सोबत्यात मिळणं मिसळणं सोडून दे. ते तुझ्या अधिकाराला शोभेसं नाही."

"मग मी काय करावं ?"

"कां बरं ? एकटयानं करण्यासारख्या गोष्टी थोडया का आहेत ?"

"पण तात, एकटयानं कितीवेळ राहायचं त्याचाही कंटाळा येतो."

"म्हणजे, सोबत्यात मिसळावंसं वाटतं. त्यांच्याशी खेळावंसं वाटतं ?"

"होय."

"पण खेळाचे नियम मात्र ध्यानात घ्यावेसे वाटत नाहीत. होय ना ! पण कुमार, ज्याला दुसऱ्याचे नियम पाळावेसे वाटत नाहीत त्याने केलेले नियम दुसरेही पाळत नाहीत ही गोष्ट

लक्षात असू दे. खेळातलं राज्य मिळवणं सुद्धा अवघड आहे."

"मी त्यांना म्हटलं की मलाच राजा करा. पण माझं कुणी ऐकत नाहीत."

"मग ज्याचं कुणी ऐकत नाहीत त्याला राजा तरी कसं होता येईल ? खेळातल्या राजाची ही गोष्ट तर खऱ्याखुऱ्या राजाची काय सांगावी ! कुमार, तुम्ही लहान आहात. हे वय तुमचं खेळाचं आहे यात शंका नाही. पण खेळ खेळताखेळता काहीजण राज्य मिळवतात आणि तेवढं खेळातलं राज्य सुद्धा तुमच्या नशिबी नाही याचा विचार तुम्ही कधी केला आहे काय ? दैवाने तुम्हाला राजपुत्र केलं आहे पण राजा व्हायला एवढी गोष्ट पुरेशी ठरत नाही. आपल्या सोबत्यांना नीट घेऊन राहा, त्यांचे मन आकर्षित करा. त्यांना तुम्ही हवेहवेसे वाटले पाहिजे याबद्दलची दक्षता घ्या."

पित्याच्या बोलण्यातील भावार्थ राजपुत्राला कितपत समजला कोण जाणे ! त्याने उत्तरादाखल मान खाली घातली.

तेवढ्यात दुसऱ्या कामाची वर्दी आली. ती संधी साधून राजपुत्र महालाबाहेर पडला.

"राजाधिराजांचा जयजयकार असो !"

त्या शब्दांच्या दिशेने राजा प्रतापादित्याने पाहिले. देवळाच्या डाव्या बाजूच्या ओसरीवर मुलांचा खेळ चालला होता.

जयजयकार करणाऱ्या मुलांचा आविर्भाव जितका हुबेहूब तितकाच खेळातल्या त्या राजाचा डौलही पाहण्यासारखा होता.

धीटपणे पावले टाकीत तो खेळातील राजा सिंहासनाजवळ आला आणि ओसरीतील पायऱ्यांपैकी शेवटच्या 'उंच पायरीवर जाऊन बसला. नंतर हास्यवदन करीत त्याने विचारले, "काय प्रधानजी, राज्याची हालहवाल कशी काय आहे ?"

"महाराजांच्या कृपेने सारे काही नीट आहे." मान लववून प्रधानजी म्हणाले.

तेवढ्यात दोन मुले नम्रपणे मुजरा करीत पुढे आली.

"काय प्रतीहारी, काय म्हणणं आहे ?"

"महाराज, एक बैलाचं भांडण आहे."

"बैलाचं भांडण ?" प्रधानजींनी हसत विचारले.

"तसे नाही महाराज !" धाकटा बलभद्र लाजून म्हणाला. "भांडण बैलाबद्दलचं आहे."

"अरे बैलाबद्दलचं भांडण बैलातच चालणार !" प्रधानजी पुनः हसून म्हणाले.

खेळातला राजा मात्र हसला नाही. त्याने गंभीर स्वरात म्हटले, "प्रधानजी, काय प्रकार आहे त्याची नीट चौकशी करायला हवी"

तेवढ्यात बैलाचा कासरा धरून शीलभद्र पुढे झाला आणि म्हणाला, "या बैलाचा धनी कोण, याबद्दल या दोघांचा तंटा चालला आहे."

आणि मग आपल्या बरोबरच्या दोन गृहस्थांकडे वळून तो म्हणाला, "असे पुढे या आणि महाराजांना तुमचं म्हणणं सांगा."

"शीलभद्र, आधी त्यांना विचार; आम्ही दिलेला न्याय त्यांना मान्य होईल ना ?"

९६४५५

तेवढ्यात त्या दोघांपैकी एक गृहस्थ पुढे झाला, 'होय. आम्हाला न्याय पाहिजे."

"तुम्हा दोघांनाही मान्य असेल तर आम्ही आपलं भांडण मिटवू आणि योग्य तो न्यायही देऊ."

"आम्हाला मान्य आहे." ते दोघेही तत्परतेने म्हणाले.

"आता सांगा. तुमचं म्हणणं काय आहे ? "

नंतर पहिल्या प्रथम बोलणाऱ्या गृहस्थाकडे वळून राजाने विचारले, "काय हो राव, तुम्ही खेड्यातले दिसता; इथं नगरात कसे काय येणं झालं ?"

"बाजाराला आलो होतो. आजच हा बैल बाजारातून घेतला आणि घराकडे निघालो. जाताजाता बैलाला पाणी पाजावं म्हणून नदीवर आलो. थोडी विश्रांति घेऊन गावाकडे निघावं असा विचार केला, थोडी डुलकी लागली. डोळे उघडून पाहतो तो हे राजश्री बैलाचा कासरा गाडीला बांधला होता तो सोडत होते."

"अस्सं. काय हो राजश्री, आपलं काय म्हणणं आहे ?"

"मी हा बैल विकायलाच आणला होता. आमची बोली चालली होती. तेवढ्यात याने कासरा धरला आणि निघाला घराकडं. अहो, पक्का चोर आहे हा. याच्या नादी काय लागता?"

"बैल तुमचा आहे याला प्रमाण काय ?" पहिल्या गृहस्थाकडे वळून खेळातला राजा म्हणाला, "काय हो राजश्री, तुम्ही या बैलाला काही खाऊ घातलं होतं ?"

हातातले कडे मागे सारीत तो गुबगुबीत चेहऱ्याचा आणि श्रीमंत वाटणारा गृहस्थ हसला आणि म्हणाला, 'तिळाची पेंड खाऊ घातली होती म्या."

"आणि तुम्ही हो राव ?"

"महाराजा, मी गरीब माणूस. पेंड खाऊ घालण्याचं सामर्थ्य देवानं दिलं नाही. हिरवा चारा मात्र भरपूर दिला होता."

"शीलभद्र !"

"आज्ञा महाराज."

"या बैलाला मी सांगतो ती ओषधी द्या."

शीलभद्राने सांगितल्याप्रमाणे केले. औषधी पाजताच बैलाने तत्काळ मलविसर्जन केले.

"महाजन हो, बैलाच्या शेणात तिळाच्या पेंडीचा काही अंश दिसतो का पाहा."

"नाही महाराज," खेळातले ते सारे पंच मान हालवून म्हणाले, 'यात हिरव्या चाऱ्याचा अंश मात्र भरपूर दिसतो."

"होय ना ! तर मग हिरवा चारा ज्याने खाऊ घातला तो या वृषभाचा धनी ठरतो, होय ना !"

त्या साऱ्या सभासदांनी 'होय' म्हणून माना हलवल्या.

तेव्हा त्या दोघा गृहस्थांकडे पाहत खेळातल्या राजा म्हणाला, "हा न्याय तुम्हाला मान्य आहे ना ?"

पण श्रीमंत राजश्रींना तो न्याय मान्य नसावा. त्यांच्या हालचालीत काहीशी चुळबुळ दिसली.

तेवढ्यात आवाज आला --

"न्याय अगदी योग्य आहे. राजा प्रतापादित्याला सुद्धा तो मान्य आहे."

आवाजाच्या दिशेने खेळातल्या राजाने चमकून पाहिले.

महाराज प्रतापादित्य हसतहसत पुढे येत होते.

खेळातला राजा उठून उभा राहिला आणि म्हणाला, "महाराजाधिराज प्रतापादित्यांचा विजय असो ! महाराजांनी आमचा प्रणिपात स्वीकारावा."

प्रतापादित्य पुढे येऊन पायरीवर बसले आणि खेळातल्या राजाचा हात धरून म्हणाले, "बसा. बसा तुम्ही, आज खेळातले का होईना, तुम्ही राजे आहात !"

आणि त्या उभयतांकडे वळून म्हणाले, "तुम्हाला योग्य न्याय मिळाला आहे. अगदी राजसभेचा न्याय."

खेळातला राजा धीटपणे पुढे होऊन म्हणाला, "महाराजांनी धृष्टतेबद्दल क्षमा करावी."

"क्षमेचं प्रयोजन नाही. आम्ही तुमचा न्याय ऐकून संतुष्ट आहोत."

तेवढ्यात दोन मुले पुढे आली. त्यांच्याबरोबर दोन स्त्रिया उभ्या होत्या. खेळातल्या राजाला अभिवादन करीत मुले म्हणाली, "आणखी हे एक प्रकरण न्यायासनापुढे आले आहे, राजेसाहेब !"

खेळातील राजा म्हणाला "आज न्यायदानास सुट्टी. शिष्टांचे आगमन झालं म्हणून आजचं हे प्रकरण आम्ही येथेच थांबवीत आहो."

"नको नको. तुमच्या न्यायदानात आमच्यामुळे अंतर यायला नको. तुमचं काम चालू द्या."

एवढ्यात हाक आली, "विक्रम ! . . ."

आवाजाच्या पाठोपाठ सेनापति विष्वक्सेन येऊन उभे राहिले.

विक्रम सेनापतींजवळ गेला आणि हळूच म्हणाला, "तात, राजाधिराज आले आहेत."

महाराजांना पाहून सेनापतींची मुद्रा आश्चर्यचकित झालेली दिसली. पादवंदना करीत ते म्हणाले, "महाराजांची स्वारी अशी आकस्मिक कुणीकडे? आम्हांला काहीच कशी वार्ता नाही?"

"या खेळाने लक्ष वेधले म्हणून थोडासा थांबलो होतो. हा तुमचा मुलगा फार चतुर आणि बुद्धिमान दिसतो."

विक्रमाकडे पाहून सेनापति म्हणाले, "विक्रम, महाराजांना अभिवादन कर."

विक्रमाने पुन: नम्रपणे मान लववून वंदना केली. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत महाराज म्हणाले, "चालू दे तुझा न्याय. आम्ही तो पाहायला उत्सुक आहोत."

"तर मग महाराजांनी इथे पायरीवर बसावं."

राजे प्रतापादित्य बसले. सेनापतिही बसले.

प्रतापादित्य विक्रमाकडे वळून म्हणाले, "बसा, राजे विक्रमादित्य, असे आमच्याजवळ आपल्या सिंहासनावर येऊन बसा."

"जशी महाराजांची आज्ञा."

असे म्हणता म्हणता विक्रमाने आपल्या वडिलांकडे पाहिले. कौतुकाचा भाव त्यांच्या नजरेवाटे ओसंडत होता. अनुज्ञेदाखल त्यांनी मान हालवली तेव्हा विक्रम सिंहासनारूढ झाला.

समोर उभ्या असलेल्या स्त्रियांकडे पाहत मग त्याने न्यायदानास सुरवात केली.

"हं, काय ग बायांनो, कसलं भांडण आहे ते सांगा या महाराजांच्या पुढं."

एक प्रौढ स्त्री पुढे होऊन म्हणाली, "महाराज मी धुणं धुवायला वाळवंटावर आले. बाळाला जवळच ठेवलं आणि धुणं धुवायला घेतलं तेवढयात ही बाई आली आणि म्हणाली, 'या तुझ्या मुलाला मी खेळवू काय ?' मी होकार देताच तिने मूल उचललं आणि झपाझप पळायला सुरवात केली, म्हणून मीही धावले. पण ही काही केल्या बाळास परत देईना."

"काहीतरीच काय सांगतेस, सटवे ! माझंच मूल चोरून वर सावाचा आव आणते आहे, सटवी."

विक्रमाने तिच्याकडे पाहत तीव्र स्वराने म्हटले, "आवाज वाढवायची आवश्यकता नाही. तुम्ही न्यायसभेत आहा हे विसरू नका. मूल तुमचं आहे एवढंच ना तुमचं म्हणणं ?"

"होय एवढंच." काहीशा खालच्या आवाजात ती स्त्री गुरगुरली

"तुमचं भांडण तोडायला आम्ही तयार आहोत. पण मिळेल तो न्याय तुम्ही मान्य कराल ना ?"

"न्याय दिला तर तो कुणाला नको आहे ?" ती स्त्री काहीशा ठसक्याने म्हणाली.

"तर मग असं करा. दोघीही या मुलाला दोन्हीबाजूनी धरा आणि जोरजोराने ओढा. मूल किंचाळलं तरी थांबायचं नाही."

पहिल्या स्त्रीने काहीशा आश्चर्याने विक्रमाकडे पाहिले आणि म्हटले, "म्हणता तरी काय ? मूल किंचाळलं तरी . . ."

"होय. न्याय हवा असेल तर ते व्हायलाच हवं."

ती स्त्री एकदा दीनवाण्या नजरेने त्याच्याकडे पाहत राहिली आणि मग अगतिक झाल्याप्रमाणे तिने ते मूल उचलले.

पण मूल जोराजोराने रडू लागले तसे तिने मुलाला सोडले आणि एका कोपऱ्यात स्वतःच अश्रू गाळत उभी राहिली.

"हे काय बाई, अशा रडता का ? अशाने बाळावरचा तुमचा अधिकार कसा सिद्ध होणार ? त्या बाईकडे पाहा. त्या हातातलं मूल सोडायला तयार नाहीत."

"अहो, पण बाळ रडतंय ना ! त्या चांडाळणीला कसं पाहावतं तेच मला कळत नाही"

"अपशब्द बोलायची जरूरी नाही." ती दुसरी स्त्री म्हणाली आणि मग विक्रमाकडे वळून गर्वित नजरेने तिने म्हटले–

"आता कळलं ना मूल कुणाचं आहे ते अहो, मूल किंचाळलं तरी हातचं सोडायची नाही !"

ती पहिली स्त्री एकदम ओरडून उठली, "अग, अग चांडाळणी, बाळाचा गळा का दाबतेस ?"

"महाराज" मग ती दीनवाण्या स्वरात विक्रमाकडे वळून म्हणाली, "लेकराचे हाल पाहवत नाहीत हो"

–आणि मग ते लेकरू एकाएकी रडू लागले.

त्या दुसऱ्या स्त्रीकडे वळून विक्रमाने म्हटले, "बाई, मुलाचं रडणं चटकन थांबवा."

ती स्त्री कांहीशी गोंधळली. तिने मुलाला जवळ घेतले. आंजारले गोंजरले पण मुलाचा ओरडा चालूच.

त्या पहिल्या स्त्रीकडे पाहून विक्रमाने विचारले, "बाई, तुम्ही तरी या मुलाला गप्प करा."

ती स्त्री जणू त्या गोष्टीची वाटच पाहात होती तिने झटदिशी मुलाला उचलले आणि पदराच्या आड घेतले.

क्षणभरातच मुलाचे रडणे थांबले कांही वेळाने मुलाची तृप्ति झालेली पाहून तिने त्याला पदराबाहेर काढले आणि विक्रमाजवळ सोपविले.

"नको ! आमच्याकडे द्यायची आवश्यकता नाही. तुमचं बाळ आहे याची खात्री पटली आम्हाला ! आई बाळाला जाणते तसं बाळही आईला जाणते."

आणि दुसऱ्या स्त्रीकडे पाहात तो म्हणाला, "मुलाला त्रास देते ती आई कसली !"

तेवढ्यात समोरच्या दिशेने दोन तीन मुले हाक मारीत आली आणि म्हणाली, "अरे विक्रम, केव्हाचा खेळतो आहेस. तिकडे आई किती रागावली आहे बघ."

आता कुठे सेनापतींना आपल्याला दिलेल्या घरच्या हुकमाची आठवण झाली. ते म्हणाले. "बेटा विक्रम! वेळ बराच झाला. तुझी आई मघापासून वाट पाहात आहे."

विक्रमाच्या मुद्रेवर विषादाची छटा चमकून गेली. तो उठला आणि मुलांना म्हणाला, "आता आपला खेळ बंद."

महाराजांकडे वळून तो म्हणाला, "महाराजांची आता जायला अनुज्ञा असावी."

महाराजांनी त्याची पाठ थोपटली आणि विष्वक्सेनाकडे वळून म्हटले, "सेनापती, तुमच्या या मुलाचे चातुर्य प्रशंसनीय आहे."

विक्रमाकडे वळून ते म्हणाले, "तातांना घेऊन एकदा राजवाड्यात ये."

"महाराज, धृष्टतेबद्दल पुनः एकदा क्षमा मागतो. किती झाले तरी आम्ही खेळातले राजे !"

राजा प्रतापादित्य खळाळून हसले आणि म्हणाले,

''पण खेळातले राजे कधी कधी खऱ्या राजावर मात करून जातात.''

आपल्या हातातील काष्ठदंड जमिनीवर आपटत तो ब्राह्मण म्हणाला, ''माझं नाव वेतालभट्ट.''

काहीशा विस्मयाकुल नजरेने त्याच्याकडे विक्रम क्षणभर पाहत राहिला. त्याच्या तोंडून शब्द आले, 'काय म्हणता ! आचार्य वेतालभट्ट म्हणतात ते आपणच ?''

खणखणीत आवाजात उत्तर आले, 'होय, तोच मी !'' चौथऱ्यावर बसलेला विक्रम उठून उभा राहिला आणि ब्राम्हणाला अभिवादन करीत म्हणाला, ''बसावं आचार्य, असे आसनोपविष्ट व्हावे.''

त्याच्या त्या शालीनतेनं ब्राह्मणाचे मन उचंबळून आल्यासारखे दिसले. आसनावर बसताबसता तो म्हणाला, ''वत्सा, तुझं कल्याण असो.''

खडबडित बांध्याच्या आणि काहीशा उग्र वाटणाऱ्या चर्येच्या त्या पुरुषाचा आवाज इतका प्रेमळ असेल असे कुणाला वाटले नसते. त्याचे मस्तकावरील केस पांढरे झाले होते. सारे शरीर भस्म चर्चित होते आणि भुवयांच्या मध्यभागी शेंदराचा भव्य टिळा शोभत होता; तोही त्या चर्येच्या उग्रतेत भर टाकणारा होता. पण या साऱ्या उग्रतेतून विक्रमाला जाणवली ती फक्त त्याची नजर. कुणाचा तरी शोध घेत असल्यासारखी नजर.

आपल्या पाडसाचा ठाव शोधणाऱ्या धेनूची वत्सल नजर अशीच असेल काय ?

"आचार्य," विनीत स्वरात तो म्हणाला, "आपले नाव बऱ्याच दिवसापासून ऐकत होतो. रत्नपूरच्या पाठशाळेत आपल्या हाताखाली विद्या शिकलेले पंडित आम्हाला भेटले होते. त्यांच्या मुखाने आपली कीर्ति ऐकली आहे. आपली भेट व्हावी अशी फार इच्छा होती. आज आचार्यांनी स्वयमेव दर्शन देऊन मला कृतार्थ केलं आहे."

"मुला, तुझं बोलणं मोठं गोड आणि विनयामुळे अधिकच मधुर वाटते. मी स्वयमेव तुझ्याकडे आकर्षित झालो तो मात्र तुझ्या प्रज्ञेमुळे ! गेले दोन दिवस या क्षिप्रेच्या वाळवंटात बसून तुमचा खेळ पाहात होतो. मुलांचा मला फार लोभ. दुरूनच का होईना खेळ पाहावा म्हणून बसलो होतो. या खेळात तुझी बुद्धिमत्ता व न्यायकुशलता दिसून आली पण..." काहीवेळ थांबून आचार्यांनी विक्रमाकडे पाहिले आणि म्हटले, "मुला, तुझ्या हिताच्या काही गोष्टी सांगितल्या तर रागावू नकोस."

"आचार्यांचा उपदेश नेहमीच हितावह असणार. तो पालन करण्यात मला आनंदच वाटेल."

"ऐक मुला, तू बुद्धिमान आहेस पण बुद्धि नुसती तीव्र असून उपयोगाची नाही. स्वैरपणे आडवेतिडवे वाहणारे जल कुणाच्याच उपयोगी पडत नाही आणि म्हणून तिकडे कुणी लक्षहि देत नाही. पण तेच जल जेव्हा पात्रातून वाहू लागते तेव्हा सहस्रावधि बागांना समृद्ध करून जाते. मनुष्याचेही जीवन असेच असावं. किंबहुना जीवन म्हणजेच जल. म्हणून म्हणतो, माझी एक गोष्ट ऐक."

"सांगावी, आचार्य !"

"युवराज चंद्रादित्य तुझा मित्र दिसतो !"

"होय. पण आपल्या लहरीपणाने तो आपल्या मित्रांना नेहमी दुखवतो "

आचार्यांना जणु हे उत्तर अपेक्षितच होते. ते हसून म्हणाले, "मुला, स्वभावाला औषध नसते म्हणतात पण ते सर्वस्वी खरे नाही. मित्रांच्या सान्निध्यात स्वभावाला वळण मिळू शकते. आज ना उद्या ते मिळेल. कदाचित मिळणारही नाही. पण संकटावर मात करणारी बुद्धि देवाने तुला दिली आहे राजपुत्राच्या संकटाच्या वेळी त्याचे संरक्षण करणारी बुद्धि त्याला नेहमीच आपल्या आधीन करणारी ठरेल एवढे लक्षात ठेव चंद्रादित्याच्या लहरीपणामुळे तुमच्या मैत्रीत व्यत्यय येऊ नये असं तू वागायला हवं. तुझ्या आणि राजपुत्राच्या मैत्रीत कोणत्याही कारणाने खंड पडू देऊ नकोस ! '

आचार्यांच्या बोलण्यातील कळवळ्याचा भाव विक्रमाला जाणवल्याखेरीज राहिला नाही. पण तो काही वेळ स्तब्धच राहिला.

आचार्य पुढे म्हणाले, "मुला, राजे प्रतापादित्य सज्जन आणि न्यायबुद्धीने वागणारे आहेत. पण तेवढ्या भरवशावर राजपुत्राला दुखवू नकोस. तुला हे सांगायलाच हवं असं नाही. तुझं भाल विशाल आहे ते तुझ्या समृद्धीचे द्योतक आहे. तुझी नासिकाग्र दृष्टी निश्चय करण्यात खंबीर आहे. ही सारी मोठेपणाची लक्षणे तुझ्या अंगी आहेत. पण मुला, खरा मोठेपणा माणसं जोडण्यात आहे, तोडण्यात नाही."

जमिनीकडे झुकलेली आपली मान विक्रमाने वर केली

आणि म्हटले, "आचार्य, आपला उपदेश अमूल्य आहे. मी तो विसरणार नाही."

"त्यातच तुझं कल्याण आहे. मुला, व्यक्तीच्या लहरीवर पुष्कळदा राज्यांचे चांगले-वाईट होणं अवलंबून असते. रत्नपूरच्या राज्याचेच उदाहरण पाहा. केवढे संपन्न व समृद्ध राज्य ! पण थोरले महाराज गेले आणि तरुण युवराजाने गादीवर येताच आपल्या लहरीपणाने जिवाचाच नव्हे तर राज्याचाही विनाश ओढवून घेतला."

"त्या युवराजाचं काय झालं, आचार्य ?" विक्रमाने सभयतेने पृच्छा केली

"दुसरं काय होणार ! आपल्या लहरीपणाचं प्रायश्चित भोगत काशीराजाच्या बंदीत पडला आहे."

"पण त्याला या संकटापासून वाचविणारे कुणीच कसे मिळाले नाही ?"

"तेच तर त्याचं दुर्दैव आहे ! राजांच्या लहरीपणामुळे राज्ये संकटात सापडतात पण राज्याचे मंत्री बुद्धिमान आणि धोरणी असले तर तसल्या संकटातूनही राज्ये व राजे सुरक्षित राहू शकतात. दुर्दैवाने रत्नपूरच्या युवराजाला असा मंत्री मिळाला नाही. मुला, उद्याचं भविष्य कुणी सांगावं ? आज सुखरूप वाटणारं राज्य उद्या दुर्दैवाच्या भोवऱ्यात सापडून वाताहत होऊ शकते पण तुझ्या बाबतीत म्हणशील तर तुझे भविष्य तुझ्या या भालप्रदेशावर मला स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच म्हणतो, राजपुत्राला आपल्या मैत्रीच्या पाशात जखडून ठेव. त्याच्या लहरीपणाकडे दुर्लक्ष कर आणि त्याच्या संरक्षणाची भावना सतत मनामध्ये राहू दे. चंद्रादित्याच्या उत्कर्षातच

कदाचित् तुझा पुढचा उत्कर्ष असेल !"

"आचार्यांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे."

"मला आनंद वाटला. तुझी प्रज्ञा जशी तीव्र तसे तुझे हृदय उदार असू दे. मुला, तू खरोखर एक रत्न आहेस. पैलू न पडलेलं रत्न. गुरूला आपण होऊन ज्या प्रज्ञावंत शिष्याचा शोध करावासा वाटतो असंच एक रत्न. या प्रज्ञेला ओज पाडण्याचं काम ज्या कोणाच्या हातून घडेल तो गुरूही सुदैवीच ठरेल."

"आचार्यांनी असं बोलावं हे माझे भाग्य !"

"होय, मुला. खरं तेच सांगतो, गुरूनींही ज्याचा शोध करावा असा एक शिष्य मला इथं गवसला."

"असं का म्हणता, आचार्य ! आपल्यासारखा शिष्याबद्दल कळकळ बाळगणारा गुरु भेटणं हे शिष्याचंही सुदैवच ठरेल. मी या क्षणापासून आपल्या आधीन आहे असं समजा."

"तुला विद्या देण्यात मला स्वतःला आनंदच वाटेल. पण मी या उज्जयिनी नगरीपासून फार दूर राहतो. सीमाप्रदेशाजवळच्या जंगलात भिल्लांची वस्ती आहे, तेथे मी सध्या आश्रम करून राहिलो आहे."

"असेना का ? आपण म्हणाल तेथे मी आपल्या सेवेला सादर आहे. आचार्यांनी केवळ अनुज्ञा द्यावी."

क्षणभर अविचल मुद्रेने आचार्य त्याच्याकडे पाहत राहिले आणि म्हणाले, "ठीक आहे ! मला तुझ्या तातांकडे घेऊन चल."

## ५

तृणांकुराने आच्छादलेल्या त्या हिरव्यागार वनभूमीवर भिल्लराज कुवलय स्वच्छंदपणे पहुडला होता.

काशिराजाच्या प्रदेशातील सीमेवरील जंगलाचा हा भाग. मृगया करता करता तो या भागात शिरला होता आणि त्यामुळे त्या राजाच्या वनरक्षकाशी त्याला झुंजही द्यावी लागली होती. एखाद्या वन्य गजाने डोहात प्रवेश करून त्यातली जलराशी घुसळून काढावी त्याप्रमाणे कुवलयाने ते सारे वन दिवसा ढवळून काढले होते आणि एखाद्या मस्त हत्तिणीशी क्रीडा करावी तशा धुंदपणे त्या वनरक्षकांच्या टोळीशी तो झुंजला होता.

दिवसभर मृगयेच्या शोधात राहूनही त्याला सावज मिळाले नव्हते आणि ते न मिळवताच रिक्तहस्ताने आपल्या वस्तीकडे परत फिरणे त्याच्या वृत्तीला मानवणारे नव्हते. म्हणूनच आता हे रान सोडून जाण्याऐवजी आजची रात्र तो या रानातच घालविणार होता. त्यासाठी पुन्हा एकदा झुंज देण्याची पाळी आली तर त्याही गोष्टीला त्याची तयारी होती. किंबहुना झुंज देण्यास त्याचे पुष्ट बाहु जणू स्फुरण पावत होते.

कुवलय स्वतःला 'भिल्लराज' म्हणवीत असला तरी तसा कोणताच अधिकार अवंतीच्या राजाकडून त्याला प्राप्त झालेला नव्हता. त्याचा बाप गर्दभिल्ल अवंती राजाचा एक अधिकारी म्हणून सीमेच्या वनप्रदेशावर देखरेख करीत असे. पुढे काही

कारणाने त्याची स्वतंत्र वृत्ति बळावली आणि त्याला अधिकार-पदापासून वंचित व्हावे लागले. पित्याच्या मृत्यूनंतरचे कुवलयाचे बालपण त्याच्या मामाकडे गेले. आता तो नुकताच तारुण्यात पदार्पण करीत होता—आणि आपल्या जन्मस्थलाच्या ओढीने परत आला होता. बालपणीची आपल्या विविध खेळांची साक्षीभूत असलेली ही वनस्थली त्याच्या आवडीची होती. पित्याच्या मृत्युमुळे आपण अधिकारापासून वंचित झालो अशी त्याची समजूत होती आणि ते गेलेले अधिकार परत मिळविण्याची ईर्षाही होती. हा अधिकार मिळविण्यासाठी लागणारे बुद्धिवैभव आपल्याठिकाणी आहे असे त्याला वाटत होते.

त्याचे शरीर भव्य, हाडपेर मजबूत आणि दृष्टि रान-लांडग्याप्रमाणे क्रूर होती पण बळापेक्षा त्याला दर्प होता तो आपल्या बुद्धीचा. सावजावर तुटून पडणे व त्याचा घातपात करणे यापेक्षा त्याला जिवंतपणी स्वाधीन करून घेणे आणि आपल्या मनाप्रमाणे नाचविणे त्याला अधिक आवडे.

जन्मभूमीच्या प्रदेशात परत आल्यापासून त्याने आपल्या भोवती मित्रांचे कडे तयार केले होते. ते सारे जीवाला जीव देणारे साथी होते आणि तरीही आपले बळ अपुरे आहे याची जाणीव कुवलयाला मधून मधून अस्वस्थ केल्याखेरीज राहत नसे.

याशिवाय आणखीही एक गोष्ट त्याला तितकीच अस्वस्थ करणारी होती.

भिल्लांच्या वनप्रदेशात, डोंगरकुशीत विसावणारा तो कुलगुरू वेतालभट्टांचा आश्रम त्याच्या स्वप्नभूमीला सारखे हादरे देत होता. त्या आश्रमात क्षत्रियांच्या मुलांबरोबरच भिल्लपुत्रांनाही विद्येचे पाठ दिले जात होते. आपण काहीतरी नवे शिकत आहोत

या जाणिवेने त्या आश्रमातील भिल्लपुत्रांची अंतकरणे सदैव भारलेली असत. जणु साचलेल्या पाण्याला कुणीतरी वाट करून ते प्रवाहित करावे–नव्हे, त्यात नव्या जलाचे प्रवाह आणून त्याच्या गतीला नव्याने वेग आणावा तशी त्यांची जीवने साकारली जात होती.या गोष्टीचा त्या भिल्लपुत्रांइतकाच त्यांच्या पालकांनाही कोण संतोष !

विशेषतः आपल्याला विद्येचे पाठ देणाऱ्या एका तरुण गुरूची प्रशंसा त्यांच्या मुखातून सदैव ऐकायला मिळे. त्याचा धाकटा भाऊ सुव्रत त्या पाठशाळेत जाऊ लागला होता. तो जेव्हा जेव्हा घरी येई तेव्हा तेव्हा आपल्या या तरुण विद्यागुरूचे तो कौतुक सांगत असे आणि त्यांची बहीण कुमुद्वती ते मोठ्या आस्थेने ऐकत असे.

कळत न कळत का होईना, या तरुण विद्यागुरूविषयी कुवलयाच्या मनात विकल्पाचे जाळे निर्माण होत होते. आपल्या महत्वाकांक्षेच्या आड येणारी गोष्ट कोणती ती त्याच्या लक्षात येऊ लागली होती आणि कधी कधी तर त्याच्या मनात येई की आज ना उद्या या आपल्या प्रतिस्पर्ध्याशी जबर झुंज आपणाला द्यावी लागेल.

अर्थात् यासाठी त्याला सदैव सावध राहावे लागणार होते ! कोणत्याही संकटाशी झुंज देण्यात कुवलयाच्या साहसिक वृत्तीला नेहमीच भरते येई. अशावेळी साहसाबरोबरच त्याची सावधताही जागृत असे.

आजही तो वरवर पाहता स्वच्छंदपणे पहुडल्यासारखा दिसत असला तरी त्याचे मन भोवतालच्या परिस्थितीची चाहूल घेण्याइतके सावध होते. अंधाराला भेदून जाणाऱ्या वनराजाची

नजर जशी आपल्याभोवती सतत फिरत राहते तसे कुवलयाचे मन त्या वनस्थलीच्या आसपास संकटाची चाहूल घेण्यात मग्न होते. सीमेवरील वनरक्षकांना त्याने हारवले असले तरी ते पुन्हा आपल्यावर केव्हा तुटून पडतील याचा नेम नव्हता.

मध्यरात्रीच्या सुमारास तो जागा झाला तेव्हा कोठे तरी जवळपास कुजबूज होत असल्याची चाहूल त्याच्या कानावर आली. हलक्या स्वरात जवळच कुणीतरी बोलत होते. मध्येच ते स्तब्ध झाले आणि तेलवात सरलेल्या दीपज्योतीप्रमाणे वातावरणात पुन्हा एकदा अंधाराची सावली पसरली. कुवलयाला ते सारेच बोलणे ऐकायला मिळाले नाही पण जेवढे ऐकू आले ते सुद्धा अंधारातल्या प्रकाशकिरणासारखे त्याच्या मनात चमकून उठले.

होय ! कुणीतरी स्पष्टपणे म्हटले होते.—

'या विक्रमादित्याशी केव्हातरी झुंज घ्यावी लागेल !'

कुवलय काहीसा चमकून उठला.

त्याने ऐकलेले ते उद्‌गार त्याच्या अंत:करणात कधी काळी रेंगाळत असलेल्या विचाराचा प्रतिध्वनिच नव्हते काय ?

पहाटेच्या प्रहरी उठून तो प्रस्थानाच्या तयारीस लागला असेल तोच त्याच्या मित्रापैकी एक त्याच्याजवळ आला आणि कानात कुजबुजला.

"त्यांना लुटले नाही ना ?" कुवलयाने भृकुटि वक्र करीत विचारले.

"नाही. ते म्हणाले, आमची भेट करून द्या. पाहिजे तेवढं धन देतो."

तो गुरगुरला, "घेऊन ये त्याना इकडे."

जी माणसे पुढे आली ती सभ्य नागर कुळाची दिसली. त्यातील पगडी धारण केलेली एक उंच व्यक्ती सार्थवाह असावी. त्या व्यक्तीने विचारले, "भिल्लराज कुवलय ते आपणच ना !"

"हो." काहीशा गोंधळलेल्या स्थितीत तो म्हणाला.

"रागावू नका. आपले पिता गर्दभिल्ल आमचे मित्र होते. ते कसे मरण पावले माहीत आहे ना ! आमचे मित्र होते म्हणूनच अवंती–राजाच्या कोपानलात भस्मसात् झाले. आमची मैत्री तुमच्या त्या राजाला पाहावली नाही म्हणून मृगयेच्या मिषाने त्यांना याच रानात आणून मारले आणि बोभाटा झाला तो आमच्या राजांच्या नावाचा. आम्ही फार हळहळलो. पण काय करणार ? तुम्हाला कदाचित हे माहीत नसेल, म्हणून म्हटलं एकदा भेटावं आणि तुम्हाला सावध करावं."

"तुम्ही कोण ?" कुवलयाने विचारले.

"सांगितलं ना ! आम्ही तुमच्या पित्याचे मित्र. तुमचा शोध घेत होतो. आपण आपल्या मामाकडे होता. दोन चार महिन्यापूर्वी इथं आला म्हणून कळलं."

"पण आपलं काम काय ?"

"काम काय असणार ? तुम्ही एक वेळचे जंगलाचे राजे. काशीचे राजे सुद्धा तुम्हाला करभार द्यायचे असा तुमचा दरारा."

"तुम्ही म्हणता तो करभार आम्हाला कधीच मिळाला नाही," काहीशा रोषाच्या स्वरात कुवलय म्हणाला.

"कसा मिळणार ? आजवर तुम्ही इथं नव्हता. त्यामुळे देणे शक्य झाले नसेल. पण आता तुम्ही आलात तेव्हा तो तुम्हाला यापुढे मिळायलाच हवा."

"हो ना !" फेटा बांधलेले दुसरे गृहस्थ आतापर्यंत स्तब्ध बसले होते ते म्हणाले, "तशी राजांचीही इच्छा आहे. तुमचं शौर्य तुमच्या पित्याप्रमाणेच अपूर्व असणार यात शंकाच नाही. काशीचे राजे तुमच्या पित्याचे परम मित्र. तुमच्याशी सख्य व्हावं अशी त्यांची फार इच्छा. पण आपला आतापर्यंत शोधच लागत नव्हता."

"काशिराजांनी आपणास पाठवलं आहे काय ?"

"नाही. तसं नाही. आम्ही आमच्या मनाने आलो." पहिले गृहस्थ म्हणाले, "तुमच्या पित्यापासूनचा आमचा फार पुरातन मित्रभाव आहे."

दुसरे गृहस्थ शांतपणे म्हणाले, "आपली इच्छा असली तर काशिराजांशी आपलं सख्य पुन: जुळू शकेल."

"आमची तशी इच्छा आहे. पण तो योग कसा जुळून येणार ?"

"काशीच्या राजांना ते हवं आहे. पण तो योग जुळवून आणण्यासाठी आपणही काही पावलं टाकायला हवीत. त्यांना परोपरीने साह्य व्हायला हवं."

"कोणत्या प्रकारचं साह्य हवं आहे ते सांगा."

"अहो, साह्य एकाच प्रकारचं का असतं ? कमरेला खड्ग चढवून युद्धाला जाणं एवढंच काय ते शर्थीचं काम आहे असं आमचे महाराज मानत नाहीत. युद्धाइतकीच महत्वाची अंगं अनेक असतात." पगडी धारण केलेले गृहस्थ म्हणाले.

"आम्हाला ही असली कामं करणं विशेष आवडेल."

फेटा बांधलेले दुसरे गृहस्थ शांत सुरात म्हणाले, "काम आहे ते तुमच्या योग्यतेचं. तुम्हाला करता येण्याजोगंच आहे." नंतर हलक्या स्वरात त्यांनी विचारले, "आचार्य वेताल भट्टांचा आश्रम इथंच जवळपास आहे म्हणून ऐकतो."

"आश्रम ? हो आहे. पेटवून द्यायचा का विचार आहे ?"

"छे: छे: !" पाहुणे दाताखाली जीभ घेत म्हणाले, "विद्या-दानाचे पवित्र कार्य करणारा तो आश्रम ! तो जाळून टाकण्या-इतकं दुसरं पातक नाही. उलट त्या गुरुकुलाची कीर्ती ऐकून आमच्या महाराजांनी एक वेगळाच विचार केला आहे. आपल्या पुत्राला शिक्षणासाठी आश्रमात पाठविण्याची इच्छा आहे त्यांची."

काशीचा राजपुत्र वेताळभट्टांच्या आश्रमात शिकायला येणार ! यात आपल्याजोगते महत्वाचे कोणते कार्य ते कोणते हे कुवलयाला कळेना. पण तो ऐकत राहिला.

ते दुसरे गृहस्थ पुढे म्हणाले, "तेव्हा तेथे राजपुत्रांच्या संरक्षणाची कशी काय तजवीज आहे हे पाहायला हवं. त्यांच्या संरक्षणाचा भार कुणाच्या तरी शिरावर सोपवायला तर हवाच. तुम्ही तो घेता ?"

कुवलय काहीसा दचकला पण स्वत:ला सावरीत म्हणाला "तुमचं म्हणणं मान्य केले असते. पण त्या वेताळाला ते मान्य होणार नाही. राजपुत्राबरोबर आश्रमात कुणी सेवेकरी असणे त्यांच्या योजनेत बसत नाही. अहो, प्रत्यक्ष याच देशाचा राजपुत्र इथं शिकत आहे. पण तो सुद्धा एकटा. त्याच्याबरोबर कसला लवाजमा नाही की थाटमाट नाही."

"असं म्हणता? आश्चर्याची गोष्ट आहे! — आणि तुमच्या त्या राजपुत्राला ही गोष्ट मानवली?"

"त्याविषयी फारशी वार्ता मला माहित नाही. एवढं खरं की राजपुत्र आश्रमात राहायला मोठासा उत्सुक दिसत नाही."

"उत्सुक नसायला काय झालं?" पगडी घातलेल्या गृहस्थांनी विचारले.

"अहो, राजपुत्राचा स्वभाव थोडासा रसिक आणि विलासी आहे! गाण्या वाजविण्याची त्याला आवड आहे. पण ते आश्रमात कसं मिळणार? म्हणून स्वारी थोडीबहुत रुष्ट आहे."

"असं असेल तर त्यांच्या पित्यानी त्यांच्या इच्छेविरुद्ध आश्रमात ठेवलं म्हणायचं."

"महाराज प्रतापादित्यांच्या स्वतःच्या काही विशिष्ट कल्पना आहेत, तसं राजपुत्राने वागावं असं त्यांना वाटतं."

"एकंदरीत पितापुत्रात मतभेद आहेत तर?" संथ सुरात बोलणारे गृहस्थ म्हणाले.

"अहो, मतभेद असणारच आणि आपल्यासारख्या सामान्यांनाही त्यातच रस असणार! मतभेद आहे म्हणून तर हे जग चाललं आहे," पहिले चौकसखोर गृहस्थ म्हणाले.

"मतभेद असणे चांगले कसे?" नकळत कुवलयाने विचारले.

"अहो, मतभेद चांगला नसेलही. पण आपल्यासारख्यांना त्यातच वाव मिळतो. किंबहुना असा मतभेद प्रसंगी फुलवावा लागतो."

"ते काही आपल्याला पटत नाही. पण एवढं खरं की राजपुत्राला गाण्यावाजविण्याचा भलता नाद आहे. एक प्रकारचं

वेडच आहे म्हणा ना !"

"आपणास आज घटकेला त्याच्याशी कर्तव्य नाही. ते जाऊ दे. तुमचं आणि राजपुत्राचं कितपत सख्य आहे ?"

"सख्य ?" कुवलय चमकून म्हणाला.

"हो. तसं असतं तर आपणाला त्याचा काही ना काही लाभ होईलच."

"आपणाला राजकुमारांची भेट हवी आहे का ?" काहीशा निर्वाणीच्या सुरात कुवलयाने विचारले.

शांत सुरात बोलणारे ते गृहस्थ म्हणाले, "अहो, मिळाली तर कुणाला नको. राजकुमारांची भेट म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे. साध्य झाली तर आमचं भाग्य उजळलं म्हणायचं !"

चौकसखोर गृहस्थ आपल्या मित्राचे बोलणे ऐकून हसले आणि कुवलयाकडे पाहात उद्‌गारले, "आणि आपलंही."

ते त्यांचे उद्‌गार कुवलयाला कितपत ऐकू गेले कोण जाणे. तो निराळ्याच विचारात मग्न झाल्यासारखा दिसला.

## ६

आचार्य वेतालभट्टांच्या गुरुकुलातील ते दोन तरुण मित्र मोहाच्या वृक्षाखाली विसावा घेत होते. नदीचे पात्र जवळून वाहत होते ते त्या वृक्षपर्णांच्या निबिड संभारातूनही अर्धव्यक्त होत होते. मध्यान्हाची वेळ जवळ येत असल्यामुळे नदीच्या तीराला एकप्रकारच्या उदास विरक्तीचे स्वरूप आले होते.

एकाएकी त्या विरक्तीला भेदून जाणारे स्वर त्या तरुण मित्रांना ऐकू येऊ लागले.

कुणीतरी गाणे म्हणत असावे.

"या जलप्रवाहात उभी राहून मी घट भरत आहे घट भरला जात आहे. पण माझ्या हृदयाचा घट अद्याप रिकामा आहे. प्रेमजलाने माझ्या हृदय-घटाला भरून टाकणारा तो प्रियकर कुठे असेल ? माझ्या दृष्टीच्या कक्षेत तो कसा येईल ?"

गाण्याचे सूर ऐकता ऐकता विक्रमाने चंद्रादित्याकडे पाहिले. त्याचे देहभान हरपल्यासारखे दिसले.

गाणे म्हणणारी ती स्त्री आता नदीतीरावर उभी राहून आपला कुंभ भरत होती.

तिकडे पाहत विक्रमाने म्हटले, "या गाण्याने तुझे मन बरेच वेधलेले दिसते. पण जरा सावध राहा."

भृकुटि वक्र करीत चंद्रादित्याने म्हटले, "ते का ?"

"हे भिल्लांच्या भाषेतलं प्रेमाचं गाणं आहे."

"तुला ही भाषा अवगत आहे ?"

त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत विक्रम म्हणाला "कोणत्याही भाषेतलं गीत ऐकायला गोड असतं. त्यातून हे तर प्रेमाचं गाणं आहे."

काहीशा उत्सुकतेने चंद्रादित्याने विचारले, "या गाण्याचा अर्थ काय आहे ?"

"एक प्रियकरीण प्रेमिकाच्या शोधात आहे."

"काय म्हणते ती ?"

"तिचा प्रियकर जवळपास कुठंतरी आहे. पण तो तिच्याकडे लक्ष देत नाहीसं दिसतं."

चंद्रादित्य हसून म्हणाला, "या गाण्यातल्या प्रियकरिणीला उत्तर द्यायला हवं"

तेवढ्यात नदीतीरावरील स्त्री आपला जलकुंभ भरून मागे वळली तिचा रोख भिल्लांच्या वस्तीकडे असावा.

मस्तकावर जलकुंभ ठेवून ती पुढचे पाऊल टाकते तोच एक बाण येऊन खड्यासारखा त्या जलपात्रावर आदळला आणि मस्तकावरून वाहणाऱ्या जलधारानी तिचे वस्त्र ओले केले.

त्या स्त्रीने क्रुद्ध नजरेने आजूबाजूला न्याहाळले बाण कोणत्या दिशेने आला ते तिच्या लक्षात आले असावे कारण दरड चढून ती त्या मोहवृक्षाकडे येऊ लागली.

तिचा तो क्रुद्ध आविर्भाव पाहून चंद्रादित्य मनातल्या मनात घाबरला असावा. प्रश्नार्थक मुद्रेने त्याने विक्रमाकडे पाहिले.

मोहाच्या छायेखाली बसलेल्या त्या दोन तरुणाकडे तिने आळीपाळीने दृष्टिक्षेप टाकला आणि म्हटले, "माझा हा घट कुणी फोडला ?"

चंद्रादित्य उत्तर देईल अशी विक्रमाची अपेक्षा असावी पण तो काहीच बोलला नाही.

विक्रमाने पाहिले नवयौवनात पदार्पण करणारी एक वनकिशोरी आता त्याच्याकडे नजर वळवून उभी होती. त्या नजरेतील धृष्टता विक्रमाला जाणवली. नजरेला नजर देण्या-ऐवजी खाली पाहत तो म्हणाला,

'बाणाचं लक्ष्य चुकून तुमच्या घटाला लागलं. त्याचा खरा नेम वेगळाच होता."

"कुणीकडे का असेना, घट फुटला हे तर खरं ना ?"

"अपराध झाला खरा !"

"तो नुसता बोलून दाखविल्याने त्याची भरपाई होत नसते. त्याचे प्रायश्चित घ्यावं लागेल."

चंद्रादित्याने अस्वस्थ दृष्टीने विक्रमाकडे पाहिले. त्याच्या-कडे लक्ष न देता विक्रम तिच्याकडे वळून म्हणाला, "प्रायश्चित घ्यायलाच हवं असेल तर तेही घेऊ."

"जशास तसे हा आम्हा भिलांचा न्याय असतो."

विक्रमाने यावेळी प्रत्युत्तर दिले नाही.

"तुम्ही माझा घट फोडलात. त्याच्या बदलात मीही तुमचा घट फोडला पाहिजे. पण तुमच्याजवळ घट नाही. ठीक आहे, दुसरा काही उपाय शोधता येईल."

चंद्रादित्याकडे वळून ती म्हणाली, "तुमचे ते धनुष्य बाण जरा इकडे द्या पाहू."

तिच्या दृष्टीतील जरब तिच्या स्वरातही होती.

चंद्रादित्य काहीसा चाचरत म्हणाला, "तुम्हाला धनुर्विद्या येते ?"

"वैऱ्याचा कंठताल छेदण्याइतपत येते" शांत स्वरात ती म्हणाली. बोलता बोलता चंद्रादित्याचे धनुष्य तिने केव्हा हस्तगत केले ते त्याला कळले नाही. त्याने विचारले, "आम्ही काय करावं अशी तुमची इच्छा आहे?"

"सांगते. पण प्रथम हा बाण कुणी सोडला ते सांगा."

विक्रम पुढे होऊन म्हणाला, "तुम्ही प्रायश्चित सांगा. भोगायला मी सज्ज आहे."

विक्रमाकडे पाहत ती म्हणाली, "पण ही चेष्टा तुम्ही केलेली दिसत नाही."

"या प्रश्नाचं उत्तर देण्याची आवश्यकता नाही. प्रायश्चित सांगा."

"ठीक आहे." काहीशा कष्टी स्वरात ती म्हणाली, "माझा नाइलाज आहे. अशा गोष्टीला शिक्षा ही व्हायलाच हवी पण ती भलत्यालाच भोगावी लागली तर ती दुर्दैवाची गोष्ट ठरेल."

"तुम्ही त्याबद्दल खेद करून घेऊ नका."

"जशी तुमची इच्छा," असे म्हणत ती जवळच्याच एका वृक्षापाशी गेली आणि एक पक्व कवठाचे फळ आणून तिने विक्रमाच्या हाती दिले.

"घटाऐवजी हे फळ तुमच्या मस्तकावर ठेवणार आहे. या फळाचा छेद झाला म्हणजे माझा दंड वसूल झाला असे होईल."

असे म्हणून ती मागे वळली.

विक्रम मोहवृक्षाखाली ताठ मान करून उभा राहिला. काहीशा अंतरावर उभे राहून तिने धनुष्यावर बाण लावला आणि विक्रमाकडे पाहिले.

पाहतापाहता बाण धनुष्यावरून सुटला आणि विक्रमाच्या मस्तकावरील फळाचे दोन तुकडे झाले.

आतापर्यंत स्तंम्भित असलेल्या चंद्रादित्याला वाचा फुटली. काहीशा सद्गद स्वरात तो म्हणाला,

"माझा मित्र सुरक्षित राहिला याबद्दल मी तुमचा ऋणी आहे." त्या वनकिशोरीने चंद्रादित्याकडे एक तीव्र कटाक्ष टाकला आणि म्हटले,

"तसं पाहिलं तर तुम्ही सुरक्षित राहिला याबद्दल तुम्ही आपल्या मित्राचेच ऋणी आहात."

बोलताबोलता तिने धनुष्य विसर्जित केले आणि पाहता पाहता ती दृष्टीआड झाली.

तो कुरळ्या केसांचा आजानुबाहु तरुण पुरुष दृष्टिपथात आल्यापासून कुमुद्वतीला काही सुचेनासे झाले होते. त्याचा ध्यास घेऊन ती सतत त्याच्याभोवती फिरली होती पण त्याला मात्र त्या गोष्टीचे जणु यत्किंचितही भान नव्हते. तिचा धाकटा भाऊ सुव्रत त्याच्या संगतीत असे. त्याच्याबद्दलच्या बऱ्याच नव्या नव्या गोष्टी तिला सांगे आणि तिचे त्याच्याविषयीचे कुतूहल जागृत करी. पण ही फार पूर्वीची गोष्ट. मोहवृक्षाच्या छायेत त्याची देखणी मूर्त पाहिल्यापासून तिचे भान हरपले होते. त्याच्याबद्दलचे कुतूहल आता नव्याने आकर्षणात भर पाडत होते. त्याच्या रूपाबरोबरच त्याच्या अंतःकरणाचा प्रत्यय तिला आला नव्हता काय ? त्याचे ते साहस, मित्रासाठी जीव ओवाळून टाकण्याची तत्परता आणि समयोचितता मनाला भारून टाकणारी होती.

होय, कुमुद्वतीचे मन त्याच्यासाठी वेडे झाले होते. तिला हवा असलेला प्रियकर जणु नियतीने खुणावून पुढे उभा केला होता.

ज्या क्षणाची ती त्या दिवसापासून वाट पाहत होती तो क्षण लवकरच तिला अनुभवाला मिळणार होता तो तरुण प्रियकर तिच्या स्वाधीन होईल असा नवा विश्वास सोबत घेऊनच ती आता अशा रात्रीच्या वेळी बाहेर निघाली होती: वेताल-भट्टाच्या आश्रमाकडे चालली होती.

तिच्या अंत:करणाने जिचा ध्यास घेतला होता ती गोष्ट हस्तगत होईल असाच कौल त्या मांत्रिकाने तिला दिला नव्हता काय ?

होय ! तो तरुण प्रियकर आता सर्वस्वी तिचा होणार होता. केवळ काही क्षणाचाच अवधि मध्ये उभा होता—आणि ते तेवढे अंतरही तिला आता असह्य झाले होते.

डोंगरपठारावरील ते भयाण वाटणारे जंगल पार करून ती दरीत उतरली तेव्हा चंद्र डोंगराआड झाला होता आणि सगळी-कडे अंधारल्यागत वाटत होते.

तिची पावले मात्र नेमकी हव्या त्या दिशेने कशी अचूक पडत होती.

आश्रमाच्या ती जवळ आली, तेव्हा होमशाळेतील अग्नि काहीसा मंदप्रभ झाला होता. पण तेवढाही प्रकाश तिला नकोसा होता. तो टाळण्यासाठी ती डावीकडे वळली आणि मागल्या बाजूने ती अतिथिशाळेजवळ आली. छात्रगणासाठी तयार केलेल्या छोटया कुटीरांची रांग तिने पार केली आणि एका पिप्पलवृक्षाच्या जवळच्या छोटयाशा पर्णकुटीत शिरली.

ओटयावरील कुशासनावर एक व्यक्ति पहुडली होती.

कितीतरी दिवसापासून ही जागा तिने निरखून ठेवली होती. ती आत आली आणि आपल्या कटिवस्त्रात खोवलेली पुड तिने बाहेर काढली. त्यातील भस्म तिने प्रथम त्या शय्यागृहात जिकडेतिकडे उधळले. नंतर ती त्या निजलेल्या व्यक्तीजवळ आली आणि आपल्याजवळील शेष भस्म तिने त्याच्या अंगावर पुन: उधळल्यासारखे केले. मग तिने ऊद पेटवला आणि त्या सुगंधी धुराने सारी कुटी भरून गेली. पण तो तरुण पुरुष आपल्या शय्यासनावर पडूनच होता.

आता जेव्हा तो डोळे उघडील तेव्हा त्याच्या दृष्टीत आपल्याविषयीचे प्रेम उत्पन्न झालेले असेल. होय ! प्रेममय दृष्टीने तो आपणाकडे पाहू लागेल. त्याचे चित्त सर्वस्वी आपल्याकडे आकृष्ट होईल. सर्वांगाने आणि सर्वार्थाने तो आपल्याला वश होईल. पण त्यासाठी थोडा वेळ वाट पाहायला हवी.

अनिमिष लोचनांनी त्या व्यक्तीकडे पाहत ती मागे सरली आणि कुटीच्या बाहेर आली.

बराच काळ तशी ती बाहेर उभी राहिली. स्वत:च स्वत:ला हरवून बसल्यासारखी. भविष्यातील प्रेममय क्षणांची चाहूल घेत असल्यासारखी !

समोरच्या पिप्पलाची पाने वाऱ्याने थरारली.

आणि याच वेळेला होमशाळेच्या दिशेने एक मंद दीपज्योत सरकत सरकत तिच्याकडे येताना दिसली. किंचित सरकून ती आडोशाला उभी राहिली. दीप हातात घेतलेली व्यक्ति कुटीच्याच बाजूला येत होती.

ती जवळ आली तसे कुमुद्वतीने मान वळवून पाहिले.

तो कुरळ्या केसांचा आजानुबाहु तरुण पुरुष कुटीच्या दाराशी दीप घेऊन उभा होता.

हाय रे दैवा ! म्हणजे आपण ज्याच्यावर मंत्र सिद्ध केला तो पुरुष कुणी वेगळाच होता तर...

तिच्या मुखातून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. तिचे भान हरपले. ती धरणीवर कोसळली.

काही वेळाने भानावर येऊन पाहते तो तोच तरुण पुरुष तिला पृच्छा करीत होता, "आता बरं वाटतं ना ?"

ती सावध झाली आणि काही न बोलताच चालू लागली. पण मनातल्या मनात तिचे दैव आक्रोश करीत होते.

तिचे आजपर्यंतचे सारे पुरश्चरण वाया गेले नव्हते काय?

तशा संभ्रमित अवस्थेत तिची पावले वस्तीकडे वळली.

आणि त्याच क्षणी विक्रमाचेही मन संभ्रमित झाले होते. त्याच्या मनात सारखा प्रश्न उठत होता, तो एकच.

अशा अपरात्री कुमुद्वती कशासाठी आली ?

चंद्रादित्याच्या पर्णकुटीच्या बाहेरच ती आपणाला नेमकी कशी भेटली ? ती त्याच्या भेटीसाठी आली होती ?

पण आत पाहावे तो चंद्रादित्य गाढ झोपलेला होता. तेही त्याने पांघरलेले सोंगच होते ?

चंद्रादित्य हट्टी होता. लहरी होता. विलासीही होता. पण त्याच्या विलासाची कसलीच चेष्टा या आश्रमप्रदेशात जाणवली नव्हती. त्याचे आजपर्यंतचे वर्तन आश्रमातील छात्राला साजेसे होते. त्याच्या विलासाची लहर एखाद्यावेळी अस्पष्टपणे एखाद्या

ऐकलेल्या गाण्यावर तर कधी एखाद्या मनोहर दृश्यावर झेप घेई–पण तीही तात्पुरती. मर्यादा ओलांडून जाण्याइतकी ती उच्छृंखल झाली नव्हती. निदान आपल्याला तरी ती कधी दिसली नाही. गेल्या सातआठ वर्षांच्या कालावधीत आपण अभिन्नत्वाने एकमेकांच्या जवळ राहिलो. कोणत्याही गोष्टीने आपल्या मैत्रीत खंड पडला नाही.

पण आज मात्र चंद्रादित्याच्या धृष्टतेने प्रथमच नवे वळण घेतले होते–आणि तेही आपल्याला नकळत.

मोहवृक्षाच्या छायेत आपल्याला भेट देणारी ती धीट कुमुद्वती आपल्याबरोबरच चंद्रादित्यालाही धीट करू पाहत होती काय ? आपण आज होमशाळेत रात्री पहारा करण्याकरता जाणार हे लक्षात घेऊनच या उभयतांनी आजचा संकेत ठरविला असेल काय ? की कुमुद्वतीनेच असा एकांत साधून त्याची गाठभेट घेण्याचा प्रयत्न केला असेल ?

ते काही असो, आश्रमाच्या प्रदेशात तरी हा प्रकार घडावयास नको होता.

आणि या विचाराच्या सोबतीने एक नवाच प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. आश्रमप्रांतात उद्‌भवू पाहणारे हे प्रकरण आचार्यांच्या कानावर वेळीच घालायला नको काय ?

पण या प्रश्नाचे नीट उत्तर त्याच्या मनाकडून त्याला मिळेना.

या संभ्रमाच्या अवस्थेतच त्याचे पुढचे दोनचार दिवस गेले. आचार्यांच्या ध्यानात त्याची ही अवस्था आली की नाही कोण जाणे ! पण एकदिवस त्यांनीच त्याला एकांतात आपल्या भेटीसाठी बोलावून घेतले.

विक्रमाचे मन अधिकच कासावीस झाले. आचार्यांना हे प्रकरण कळले असेल काय ?

पण आचार्यांची मुद्रा सौम्य व हसतमुख दिसली.

"विक्रम, आता तुम्ही जितक्या लवकर राजधानीत परत जाल तितकं बरं !"

"एक पृच्छा आहे, आचार्य."

"सांग."

"आचार्यांना माझा कंटाळा आला आहे ?"

"तसे मनात सुद्धा नाही," एक स्मितपूर्वक दृष्टिक्षेप त्याच्याकडे टाकत आचार्य म्हणाले" "पण राजपुत्राला नृत्य-गीतादी कलांची विशेष ओढ दिसते. ती गोष्ट या आश्रमात साध्य होण्यासारखी नाही."

"मला राजपुत्राप्रमाणे त्या नृत्यगीतात रस वाटत नाही तेव्हा मी राजपुत्राबरोबर परतायला नको ना !"

त्या स्वरात एक प्रकारचे आर्जव होते. आपल्या अंतःकरणातील अभ्यर्थना वडिलजनांच्या हृदयापर्यंत जाऊन पोचावी असा त्यातील सूर होता. तो आचार्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. आपल्या मृदुगंभीर स्वरात ते म्हणाले. "वत्स, तुझ्यासारख्या प्रेमळ व साक्षेपी शिष्याचा सहवास मला नकोसा का आहे, पण..."

बोलता बोलता ते एकदम थांबले आणि हलक्या स्वरात त्याची पाठ थोपटत म्हणाले, "पण राजपुत्राला फार दिवस एकटं राजधानीत ठेवणं फारसं हिताचं नाही. त्याला तू क्षण-भरही आपल्या नजरेच्या टप्प्याआड जाऊ द्यायला नकोस. सध्या तो ज्या अवस्थेत आहे त्यावेळी त्याच्या मनाला सतत विवेकाचा

अंकुश हवा. चंद्रादित्याचं मन जितकं चंचल आणि मोहसुलभं तितकंच तुझं मन संयमी आणि निश्चयी आहे. त्यामुळं चंद्रादित्याला योग्य वळणावर आणण्यास तुझं सान्निध्य अत्यंत आवश्यक आहे. पण त्यासाठी तूही एका गोष्टीची दक्षता घे."

"कसली दक्षता, आचार्य ?"

"राजपुत्राप्रमाणे तुलाही आपल्या स्वभावाला थोडीशी मुरड घालायला हवी."

विक्रमाची मुद्रा आश्चर्यचकित झाली. आचार्य प्रथमच त्याच्याशी इतक्या स्पष्टपणाने बोलत होते. पण क्षणभर तेही थांबले. त्यांना काहीतरी बोलायचे होते पण ते बोलावे किंवा काय याविषयी ते किंचित संभ्रमित दिसले.

नम्रपणे त्यांना अभिवादन करीत विक्रम म्हणाला, "आचार्यांनी मला योग्य तो आदेश द्यावा. मी तो अनुग्रहच समजेन."

"वत्सा," आचार्य म्हणाले, "निग्रहाच्या तपस्येमुळे माणूस पुष्कळदा रुक्ष आणि एकांगी होतो. रससेवनाच्या प्रक्रियांवर बंधने पडल्यामुळे पुष्कळदा त्याची रसाबद्दलची ओढ नाहीशी होते आणि मग ते रसवर्ज्य रुक्ष जीवनच त्याला आदर्श वाटू लागते. जगातल्या रौद्र-बीभत्साचा धिःकार करताना ही माणस रमणीयतेचाही अनादर करू लागतात."

काही वेळ थांबून आचार्य पुढे म्हणाले, "आश्रमजीवनात काही व्रतं आवश्यक म्हणून पाळावी लागतात. जगातल्या काही रमणीय गोष्टी कटाक्षानं दृष्टीआड कराव्या लागतात. पण जगात असं करून चालणार नाही. उद्यापरवा तू राजधानीत गेल्यावर राज्यकारभारात पडशील आणि कदाचित या राज्याचं एखादं

महान् पदही भूषवशील पण त्या वेळी हे लक्षात असू दे की जगात रौद्ररूप आहे तसंच रम्यही आहे. त्या रम्यतेची अगदीच अवगणना करू नकोस."

"या रमणीय रूपांपैकी प्रमदांचं रूप मात्र भयप्रद मानावं असेच आपले धर्मग्रंथ नेहमी सांगत असतात ना !"

विक्रमाची ती शंका आचार्यांना अपेक्षित असावी. काहीशा उत्तेजित स्वरात ते म्हणाले, "मुला, तुझं हे आवडतं मत मी अनेकवेळा तुझ्या मुखानं ऐकलं आहे. त्याचा मी आजपर्यंत निषेध केला नाही. करायची आवश्यकता वाटली नाही. पण आज सांगतो. तुला वाटतं तितकं ते मत खरं नाही. ग्रंथातल्या गोष्टी प्रसंगाला धरून सांगितलेल्या असतात. स्वत:च्या अनुभवानं त्या पारखून घ्यायच्या असतात. मुला, माझा अनुभव तुला सांगतो. या जगात खरं भय प्रमदांचं नाही. प्रमादांचं आहे. आणि प्रमाद हा प्रमदेकडूनच होतो असे नाही तर प्रमत्ताकडूनही होतो."

विक्रम पहिल्या प्रथमच आज गोंधळला. वाचायला घेतलेली ग्रंथाची पाने जणु वाऱ्याने टराटर फाडून टाकली होती. काहीशा साशंक मुद्रेने त्याने विचारले,

"रमणीरूप हे विनाशकारी असतं हे वचन आपणाला मान्य नाही ?"

"नाही. स्त्री ही विनाशकारी नाही. उलट विधात्यानं निर्माण केलेली ती एक अपूर्व शक्ति आहे. संग्रामात काय किंवा संसारात काय वरदायक ठरावी अशी एक शक्ति ! ज्या कार्यकर्त्याला त्या शक्तीचा सदुपयोग करून घेता येत नाही तो दुर्दैवीच मानला पाहिजे."

अगदी याचवेळी पीतप्रभ चंद्रगोल क्षितिजावर अवतीर्ण होत होता.

त्याकडे पाहतापाहता त्या चंद्रबिंबाइतकेच गोल आणि प्रफुल्ल मुखमंडल विक्रमाच्या दृष्टीपुढे उभे राहिले.

स्मिताचा वर्षाव करणारे मुखमंडळ !

धृष्टपणाने त्याच्या नजरेला नजर देत ते जणु म्हणत होते, "भीति प्रमदापासून नसते."

आचार्यही हेच सांगत नव्हते काय ?

"भीति बाळगायची ती प्रमादांची; प्रमदांची नव्हे !"

## ७

नको तो भोग आपल्या नशिबी लागला आहे की काय या विचाराने कुमुद्वती गोंधळून गेली होती.

राजपुत्र चंद्रादित्याचे दिवसेंदिवस तिच्याकडे आकृष्ट होणारे मन तिला दिसत होते. त्याच्या नजरेतील प्रणयलालसा विलक्षण अधीर होऊ लागली होती; धृष्टपणाचा मार्ग पत्करू लागली होती. वेळीअवेळी तो तिच्या भेटी घेण्याचा प्रयत्न करी. भेट झाली नाही तर कासावीस होई. त्याच्या बोलण्यात आर्जवीपणा डोकावत असे. आपली तिच्याविषयीची ओढ व्यक्त करण्याचे सारे सूक्तासूक्त मार्ग तो अवलंबीत होता. पाणवठ्यावर आणि नदीतीरावर, जंगलात वा आश्रमात कोठेही तो तिला अवचित येऊन भेटायचा. कितीतरी वेळ हरवून बसल्यासारखा असायचा. बोलायचा तोही जणु धीर संपल्याप्रमाणे. एखाद्या अवखळ मुलाप्रमाणे हट्ट घेऊन बसायचा. तरुण राजपुत्राचा तो अधीर प्रणय ! तिच्या मनाला त्याचा भार कधीकधी असह्य होई.

पण क्वचित त्याच्याबरोबर त्याचा मित्रही येई आणि मग मात्र कुमुद्वतीच्या त्या घटिका स्वप्नाला पंख फुटल्यागत बहरून येत दक्षिणेकडून येणारा मलयपवन तिच्या गात्रांना कंपित करून जाई. तिच्या दृष्टीतील विभ्रम साऱ्या अंगोपांगातून उमटून उठे.

आपल्याजवळचे सारे संचित धन पणाला लावून ती त्याला

दृष्टीचे अर्घ्य देत असे. तिच्या हावभावात लडिवाळपणा दिसे आणि बोलण्यातली मृदुता अधिकच मधाळ स्वरूप घेऊन येई.

तिचे ते वर्तन राजपुत्राच्या कितपत लक्षात येई कोण जाणे, पण तिच्या मोठ्या भावाला मात्र ते जाणवू लागले होते.

एक दिवस राजपुत्र त्यांच्या पर्णकुटीत आला त्यावेळी ती तेथे नव्हती. बऱ्याच वेळाने ती परत आली. राजपुत्र येऊन गेल्याचे कळले तेव्हा तिला हायसे वाटले. तिच्या मुद्रेवरील हा भाव कुवलयाच्या लक्षात आला.

तीव्र स्वरात त्याने म्हटले, 'राजपुत्र मुद्दाम आपल्या भेटीला आला असताना तू बाहेर का गेलीस ?"

तिने त्याला काहीच उत्तर दिले नाही.

त्याने तिच्याकडे काहीसे क्रोधयुक्त दृष्टीने पाहिले आणि म्हटले, "तू राजपुत्राला चुकवत का असतेस ?"

"तुला त्याच्याशी काय कर्तव्य आहे ?" ती रागावून म्हणाली.

"असं का बोलतेस ? तो माझा मित्र आहे."

"तुझा मित्र !"

"होय. माझा मित्र. अशी दचकून का पाहातेस ? राजपुत्राचं माझ्याशी सख्य झाल्यामुळे तुला खेद वाटतो की काय ?"

"छे: ! खेद काय म्हणून होईल ? आश्चर्य वाटलं एवढं खरं."

कुवलय काहीसा चिडला आणि म्हणाला, "राजपुत्र माझ्याकडे येतो याचं तुला वैषम्य वाटतंसं दिसतं."

तिने संथपणे विचारलं, "राजपुत्र आला म्हणजे मी घरी असायलाच हवं का ?"

तो हसला आणि म्हणाला, "घरी येणाऱ्या अतिथीचं मोकळ्या मनानं स्वागत करण आपलं कर्तव्य आहे. तू माझी बहीण आहेस. माझ्या मित्राचं तूही योग्य स्वागत करायला नको का ?"

कुवलयाचे हे बोलणे ऐकून कुमुद्वती संभ्रमात पडली.

या कुवलयाच्या मनात आहे तरी काय ?

तिने त्याच्याकडे पाहिले आणि म्हटले, "मी काय करायला हवं आहे ?"

"तेच सांगतो. लवकरच राजपुत्र आश्रमाचा निरोप घेऊन राजधानीत परत जाणार आहे. त्यापूर्वी मी त्याला आपल्या कुटीस भेट देण्यास विनविणार आहे. त्या दिवशी थोडासा आमोदप्रमोद होईल. गाणंवाजवणंही होईल. मोहाचा मधु त्याला फार आवडतो तो मी संग्रह करून ठेवला आहे. तूही आपल्या परीनं माझ्या मित्राच्या आदरसत्कारात न्यून पडणार नाही असं कर."

"राजपुत्र एकटाच का येणार आहे ?"

तिच्या म्हणण्याचा भावार्थ न कळल्याप्रमाणे कुवलय तिच्याकडे पाहत राहिला.

"मी त्याच्या मित्राबद्दल म्हणते आहे."

"काय म्हणतेस ?"

"ते दोघे मित्र एकमेकाना कधी विसंबत नसतात. त्यामुळे एकटं बोलावण राजपुत्राला कदाचित आवडणार नाही."

"एवढंच ना ! दोघांनाही आमंत्रण देऊ. मग तर झालं !"

कुवलयाच्या या बोलण्याने कुमुद्वती मनातल्या मनात आनंदली. तो आनंद तिच्या चर्येवर उमटल्याविना राहिला नाही.

कुवलयालाही तो जाणवला असावा. तो तिच्याकडे पाहून मोठ्यानं हसला आणि कुमुद्वती काहीशी बावरली.

आपली चोळामोळा झालेली सारी स्वप्ने उशापायथ्याशी घेऊन कुमुद्वती शयनगृहात झोपी गेली . त्या स्वप्नातला सारा सुगंध लोपून गेला होता. राहिल्या होत्या त्या विलग आणि विशीर्ण झालेल्या पाकळ्या तसल्या त्या पाकळ्यापाकळ्यातून तिचे निद्रिस्त मन काही वेगळेच लागे-बांधे जोडून पाहत होते काय ?

रात्रीच्या पहिल्या प्रहरी सुरू झालेला तो आमोदप्रमोद केव्हा व कसा संपला ते सुद्धा तिला नीटसे ध्यानात आले नाही.

समारंभाच्या पहिल्या क्षणापासून तिच्या मनाचा विरस झाला होता. कुवलयाने आपले वचन पाळले नव्हते. राजपुत्र एकटाच आला होता. तिने काहीशा विस्मयाकुल दृष्टीने त्याच्याकडे पाहिले आणि म्हटले. "हे काय– आपण एकटेच ! आपले मित्र कुठे आहेत ?"

राजपुत्राला हा प्रश्न आवडला नसावा. त्याने कुवलयाकडे पाहिले. त्यांच्यात कसली तरी नेत्रपल्लवी झाली. कुमुद्वतीला तो प्रकार काहीसा विचित्र वाटला. तिचे मन खिन्न झाले. पण तिने तसे दाखविले नाही. तशाही अवस्थेत तिने आलेल्या अतिथीचे स्वागत केले.

पण अतिथी एकटाच नव्हता. त्याच्या उजव्या-डाव्या बाजूस बसलेले ते चेहरे कुमुद्वतीला नवे वाटले. कुवलयाने या बाबतीत तिला काहीच सूचना दिली नव्हती. पण पाहुण्यांचे

मनोविनोदन करण्याचा सारा घाट त्याने आपल्या मनाशी जुळवून ठेवला असावा. मोहाचे भरपूर मद्य अतिथींच्या सेवेला सादर केले जात होते. राजपुत्राच्या आग्रहावरून तिनेही त्याचे एकदोन घोट प्राशन केले. त्यात कसले द्रव्य मिसळले होते कोण जाणे पण कुमुद्वतीला तेवढ्या प्राशनाने ग्लानि आली. त्या ग्लानीच्या भरात आपल्यासमोर काय होत आहे ते तिला कळेना. तेवढ्यात गाणे वाजविणे सुरू झाले. कुवलयाने याही गोष्टीची साग्र-संगीत जुळणी घडवून आणली असावी. मृदंगाच्या साथीने प्रथम गाणे आणि त्याबरोबरच नृत्य सुरू झाले. नृत्य करणारी ती तरुण मुलगी कुवलयाने कोठून आणली होती कोण जाणे. पण तिच्या नृत्यात एक प्रकारची धुंद होती. स्वरात गोडवा होता, गीतात लाडिकपणा आणि कटाक्षात माधुर्य. .

राजपुत्रावर त्या मंजुभाषिणीच्या स्वराचा पगडा बसला असावा. त्याच्या डाव्या उजव्या बाजूला बसलेले अतिथीही त्या गाण्याला माना हालवून दाद देत होते.

त्या मंजुभाषिणीचे स्वर गोड तर खरेच ! नृत्याच्या वेळी पायातल्या पैंजणाचे मधून मधून झणत्कार होत होते तेही त्या मृदु-मंजुळ स्वरांचे अनुकारच नव्हते काय ?

आता शयनगृहात निजलेल्या कुमुद्वतीच्या मिटलेल्या पापण्यांच्या आड त्या नृत्यातील हावभाव बराच वेळ खेळत राहिले.

पण हे काय ? नाचता नाचता नर्तकी थांबली. तिने डाव्या उजव्या बाजूच्या अतिथींकडे कटाक्ष टाकला. मोहमदिरेचा जहाल घोट प्यालेला राजपुत्र धरणीवर निपचित पडला होता. ते दोघेही अतिथि राजपुत्राजवळ सरकले आणि त्यांनी निरखून पाहिले. राजकुमार पुरता बेशुद्ध झाला होता.

अतिथींनी नेत्राने खूण करताच नर्तकी बाहेर चालती झाली आणि दोन चार सेवक आत आले.

आणि हे काय? त्यांनी पाहता पाहता राजपुत्राला घट्ट बांधले आणि उचलून बाहेर नेले.

कुवलयाकडे पाहत त्यांपैकी फेटा बांधलेल्या अतिथीने एक रेशमी थैली फेकली आणि म्हटले, "यात दश सहस्र कार्षापण आहेत. मोजून घे"

कुवलयाने न बोलता एक तीव्र कटाक्ष त्यांच्याकडे फेकला.

"घाबरू नका. सीमेपलीकडं पोचताच याच्या दुप्पट धन आपल्या हाती पडेल."

असे म्हणत तो फेटा बांधलेला गृहस्थ उठला.

कुमुद्वती कासावीस झाली.

हे काय होत आहे ते तिला कळेना. तिने कुवलयाकडे पाहत एक जोराची किंकाळी फोडण्याचा प्रयत्न केला. पण छे: तिच्या तोंडून स्वर उमटले नाहीत.

पण मग पाहता पाहता ते दृश्य वितळले.

कुवलय तिच्याजवळच घोरत पडला होता.

हे स्वप्न की भास?...

दोन तीन क्षण असे गेले असतील तोच बाहेरच्या दिशेने पायांची चाहूल आली. दाराशी आवाज आला, 'कुमुद्वती मी आलो आहे.'

ओहो! केवढा आनंदाचा क्षण हा!

तिच्या निद्रित डोळ्यांच्या कडा आनंदाश्रूंनी पाणावल्या. त्या पुसतापुसता तिने समोर पाहिले.

होय, तोच तो आजानुबाहु आणि कुरळ्या केसाचा तरुण

पुरुष तिच्यापुढे उभा होता.

प्रत्युत्तरादाखल ती पुढे झाली आणि तिच्या मुखातून शब्द निघाले, "किती उशीर हा !"

त्याने विचारले, "काय झालं ?"

"राजकुमारांना कुणीतरी येथून नेलं."

त्याच्या मुद्रेवरील ते आत्मविश्वासाचे तेज अधिकच चमकून उठले.

"एवढंच ना ! आपण त्यांना शोधून काढू."

कुमुद्वती क्षणभर त्याच्याकडे तशीच विस्मयाकुल दृष्टीने पाहत राहिली.

पण छे: तसे पुरतेपणी पाहाण्याचे सुद्धा कुमुद्वतीच्या नशिबी नव्हते.

अगदी याचवेळी पर्णकुटीच्या दाराशी उभे असलेले श्वान जोरजोराने भुंकू लागले.

कुमुद्वतीने डोळे उघडून पाहिले. जिकडे तिकडे अंधार होता पण बाहेरच्या दिशेने पावलांची चाहूल स्पष्ट ऐकू येत होती.

आपली चोळामोळा झालेली स्वप्ने कशीबशी सावरीत कुमुद्वती शय्येवरून उठली.

पर्णशालेच्या दाराशी श्वानाच्या भुंकण्याचा आवाज आला. कुवलयाने बाहेर डोकावून पाहिले.

दाराशी एक तरुण मुलगा उभा होता.

"भिल्लराज कुवलय इथंच राहतात ना !"

"होय."

"आम्ही कुवलयांना भेटायला आलो आहोत." --

"मीच तो. आपल्याला काय हवं ?"

"आमची एक वस्तु चोरीला गेली आहे", पर्णकुटीच्या आत प्रवेश करीत तो तरुण म्हणाला, "तिचा शोध घेण्यास आम्ही आलो आहोत."

"इथं कुणी चोर नाहीत." कुवलय गुरगुरल्यागत बोलला.

"कदाचित नसतीलही. पण आमची चोरून नेलेली वस्तु इथं आहे एवढं निश्चित."

आतल्या बाजूस उभ्या असलेल्या कुमुद्वतीने ते शब्द ऐकले आणि तिने पुढे डोकावून पाहिले.

होय, तोच तो आजानुबाहु कुरळचा केसाचा तरुण !

त्याचे ते धृष्ट बोलणे कुवलयाला आवडले नसावे. तो रागाने चिडून उठल्यागत म्हणाला, "तुम्ही कुणासमोर बोलता आहात याची कल्पना आहे का ?"

"पूर्ण कल्पना आहे. पण माझा मात्र तुम्हाला नीटसा परिचय झालेला दिसत नाही."

"या धृष्टपणाबद्दल तुम्हाला चांगलाच जाब द्यावा लागेल."

"देऊन पहा."

कुवलयाने टाळी पिटली. त्याबरोबर चार भिल्ल तरुण पुढे आले. त्यांना उद्देशून तो म्हणाला, "याला बांधा आणि शेजारच्या कुटीत नेऊन टाका."

पण दिलेल्या आदेशाप्रमाणे ते भिल्ल पुढे झाले नाहीत.

"पाहता काय ? पुढे व्हा आणि---"

तेवढ्यात आवाज आला, "मागे सरा. विक्रम आम्हा भिल्लांचे गुरु आहेत. त्यांच्या केसाला सुद्धा धक्का लागता कामा नये."

तो कुवलयाचा धाकटा भाऊ सुव्रत होता.

इतका वेळ आत उभी असलेली कुमुद्वती लगबगीने पुढे आली आणि म्हणाली, "कुवलय, पाहतोस काय ? आलेल्या अतिथीचे स्वागत कर."

त्याचेच कधी काळी ऐकलेले शब्द कुमुद्वती आता त्याला ऐकवीत नव्हती काय ? कुवलय रागाने खवळून उठला आणि तो आळीपाळीने कुमुद्वती आणि सुव्रत यांच्याकडे पाहात राहिला.

विक्रम सुव्रताला उद्देशून म्हणाला, "सुव्रत, मागे हो, आपणास परस्परात भांडायचं नाही. केवळ राजपुत्राचा शोध घ्यायचा आहे. मी सांगतो तसं कर."

असे म्हणून तो त्याच्या कानाशी कुजबुजला. सुव्रताने मान हलविली आणि तो वेगाने बाहेर निघून गेला

तेवढ्यात कुवलयाकडे पाहात कुमुद्वती म्हणाली, "कुवलय, आल्या अतिथीचं स्वागत करण्याचा आपला धर्म विसरू नकोस."

क्रोधाचा एक कटाक्ष तिच्याकडे टाकत कुवलय म्हणाला, "पण हा अतिथि नव्हे !"

कुमुद्वती आतल्याआत खवळून उठली. पण तिने आपला राग आवरला आणि विक्रमाकडे वळून सहास्य मुद्रा करीत ती म्हणाली, "आमच्या बंधूचं म्हणणं मनावर घेऊ नका आमचं आतिथ्य स्वीकारल्याविना मी आपणास जाऊ देणार नाही."

"एवढ्या स्वागताची आवश्यकता नाही मला हवी ती वस्तु माझ्यापुढं उभी करा म्हणजे झालं !"

कुमुद्वती पुन: हसली आणि म्हणाली, "राजपुत्रासाठी आपण स्वत: याल असं वाटलंच होतं !"

"हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नव्हे."

"तुमच्या प्रश्नाचं उत्तर मी देतो." कुवलय पुढे होऊन म्हणाला, "राजपुत्र चंद्रादित्य या कुटीत नाहोत."

"पण आम्हाला तर कळलं की ते इथंच आले होते."

"आले असतील, पण आता इथं नाहीत."

"मग ते आहेत कोठे ?

कुवलय विकटपणे हसला आणि म्हणाला, "ते सांगता येणार नाही पण राजकुमारांचा मृत्युमुखाकडील प्रवास सुखरूप-पणे चालला आहे एवढं निश्चित."

"मृत्युमुखाकडील प्रवास !" कुमुद्वती किंचाळून म्हणाली, "कुवलय, हे तू काय बोलतो आहेस ? तुझी मद्याची धुंदी अद्याप उतरलेली दिसत नाही."

"मी पूर्ण शुद्धीवर आहे आणि मी सांगतो ते सत्य आहे."

"कुवलय, तर मग तू माझ्याशी कपट केलंस. राजकुमाराशी केलेलं सख्य म्हणजे एक कपटनाट्यच होतं तर !"

उत्तर देण्याऐवजी कुवलयाने नुसतेच खांदे हालविले.

"कुवलय, तू इतका नीच असशील असं मला वाटलं नव्हतं."

"मी नीच ! – आणि भिल्लाच्या कुमारींना नादी लाव-णारे मात्र पुण्यवान असंच ना !"

कुवलयाच्या तोंडचे ते शब्द कुमुद्वतीला ऐकवले नाहीत. ती म्हणाली, "कुणी कुणाला नादी लावलं हे तुला समजावून सांगण्यात अर्थ नाही."

विक्रमाने कुमुद्वतीकडे सहास्य नजरेने पाहिले आणि म्हटले, "तुम्हा बहीण भावात माझ्यामुळं कलह व्हावा हे मला बरं वाटत नाही. सुव्रतालाही मी या कारणामुळंच बाहेर पाठवलं. आता मला जाऊ दे."

आणि कुवलयाकडे वळून तो म्हणाला, "मैत्रीची खरी परीक्षा यापुढंच होणार आहे. राजकुमार तुमचे मित्र होते तसेच माझेही होते. पण माझी मैत्री त्यांना मृत्युमुखात पाठविण्यासाठी नाही. उलट कुणी सप्तपाताळात दडवून ठेवलं तरी त्यांचा शोध लावल्याविना मी राहणार नाही. तुम्ही राजकुमारांचे मित्र म्हणवता म्हणून तुम्हाला हे सांगतो."

विक्रम कुटीच्या बाहेर पडणार तोच एक भिल्ल आत आला आणि कुवलयाला उद्देशून म्हणाला, "काम झालं !"

कुवलय काहीच बोलला नाही.

"कसलं काम ?" कुमुद्वतीने विचारले.

त्या भिल्लाने कुवलयाकडे नजर टाकली आणि तो स्तब्ध बसला. विक्रम पुढे होऊन त्या भिल्लाला म्हणाला, "तू आता. ज्या वाटेनं परत आलास ती वाट मला दाखवशील काय ?"

. त्या भिल्लाने त्याला उत्तर दिले नाही.

तेवढ्यात कुमुद्वती पुढे झाली आणि म्हणाली, "जंगलाच्या साऱ्या वाटा मला परिचित आहेत. तुम्हाला हवी असलेली वाट मीच दाखवू शकेन."

"ठीक आहे. तर मग या अश्वावर आरूढ हो आणि माझ्या बरोबर चल."

कुमुद्वती त्वरेने पर्णकुटीच्या बाहेर आली आणि अश्वावर आरूढ होऊन निघाली

पहाडाचा मार्ग आता उतरणीला लागला होता. पण बरेच अंतर चालून आल्यामुळे दोन्ही अश्व थकले होते. प्रवासात एक प्रकारची मंदता जाणवू लागली होती. तेवढ्यात कुमुद्वती ओरडून म्हणाली, "ती पाहा एक शिबिका दिसत आहे !"

वृक्षांच्या दाट राईतून घाईघाईने चाललेली एक शिबिका विक्रमाने पाहिली.

"शिबिकेच्या बरोबर सशस्त्र सैनिकही आहेत," कुमुद्वती चिंतातुर स्वरात उद्गारली.

"घाबरू नकोस. जेथे शस्त्राचं बळ अपुरं पडतं तेथेच बुद्धीचं बळ उपयोगी येतं."

तसल्या त्या श्रांत अवस्थेतही त्याच्या नेत्रातील आत्मविश्वासाचे तेज लोपले नव्हते. कुमुद्वती क्षणभर त्या नेत्राकडे पाहात राहिली.

"पण आजचा महत्वाचा सामना तुझ्या भरवशावर मी देणार आहे."

गोंधळलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहत असलेली कुमुद्वती एकदम आनंदली आणि म्हणाली, "हो, मी सज्ज आहे !"

"तर मग आधी एक गोष्ट कर. येथून गाव जवळ आहे. सीमेवरचं गाव आहे. तेथे गेल्यानं आपले बरेचसे प्रश्न सुटतील पण कसंही करून ते गावाच्या वाटेनं शिबिका घेतील असं कर. पुढचं मी पाहातो."

कुमुद्वती पुढे झाली आणि विक्रम दुसऱ्या वाटेने गावाच्या दिशेला वळला.

सीमेजवळचे ते गाव बरेच मोठे होते. सीमेच्या रक्षणा-

साठी ठेवलेले राजसैनिक जसे सावध तसे नागरिकही जागरूक होते. गावाच्या मध्यभागी एक पिंपळाचा वृक्ष होता. जवळच एक देवालय होते. मोठी विहीर होती. वाटसरूंना विश्रांति घेता यावी अशीच ती सारी योजना होती. पण त्याबरोबरच देवालयाकडे तोंड करून बसलेली चावडीही होती. तेथे गावाचे प्रमुख महाजन बसत आणि राजसेवकही दृष्टीच्या टप्प्यात असत.

प्रश्न होता तो फक्त शिबिकेच्या येण्याचा.

विक्रम देवालयापाशी वाट पाहत राहिला.

तेवढ्यात शिबिका तेथे आली. कुमुद्वतीने आपले काम चोखपणे बजावले होते.

तिने साभिप्राय मुद्रेने विक्रमाकडे पाहिले.

चावडीपाशी शिबिका येताच विक्रम त्यांच्या वाटेत उभा राहिला आणि मोठ्याने ओरडून म्हणाला, "चोर ! चोर !"

चोराचे नाव ऐकताच आधीच सावध असलेले गाव आळस झटकून दिल्याप्रमाणे उठले चावडीपाशी गर्दी झाली आणि शिबिकेभोवती नकळत लोकांचा वेढा पडला.

शिबिका उचलणारे भोई दचकले. सशस्त्र सैनिकांनी खड्ग उपसण्यास सुरवात केली. पण विक्रमाने त्यांना तसे करू दिले नाही. तो चावडीच्या दिशेने महाजनांकडे वळून पुन: ओरडत म्हणाला, "महाजनहो ! या लोकांनी चोरी केली आहे. आम्हाला न्याय द्या."

"कसला न्याय ?" एका वृद्ध महाजनाने विचारले.

"कुमुद्वती ! पुढे हो आणि या महाजनांना आपलं वृत्त सांग. महाजनहो, आमच्याबरोबर प्रवास करीत असलेल्या या स्त्रीचे नूपुर या चोरांनी पळविले आहे. दुसरेही ते पळविणार

होते तेवढ्यात आम्ही आलो म्हणून ते राहिले."

"याला साक्ष कुणाची ?"

"आपण ही शिबिका शोधून पाहा. आमच्या मते या शिबिकेत असा चोरटा माल बराच आहे."

"नाही ! नाही ! आम्ही चोर नाही."

"पण तुमची शिबिका या महाजनांना दाखवा. त्याशिवाय तुम्हाला पुढं जाता येणार नाही."

"शिबिकेत तुम्ही म्हणता तसा खजिना नाही."

"पण पाहायला काय हरकत आहे" असे म्हणून महाजनांनी चार राजसेवकांना खूण केली.

सशस्त्र सैनिकांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. पण राजसेवकांपुढे त्यांचे चालले नाही.

राजसेवकांनी शिबिकेचे दार उघडले, पाहतात तो काय—

राजकुमार चंद्रादित्य शिबिकेत निद्रामग्न अवस्थेत पहुडला होता आणि त्याच्याच बाजूला एक नूपुरही पडले होते.

"हा काय प्रकार आहे ?" महाजनांनी क्षुब्ध होऊन त्या सैनिकांना विचारले, "राजकुमार चंद्रादित्य इथं कसे ?"

"ते मी सांगतो." विक्रम पुढे होऊन म्हणाला, "पण पहिल्याप्रथम या सैनिकांना पकडा. ते काशिराजाचे दूत आहेत."

विक्रम असे बोलत आहे तोच ते सशस्त्र सैनिक गर्दीतून वाट काढत पळाले आणि त्यांनी देवालयाच्या दिशेने पळ काढला.

त्यांच्या पाठोपाठ भोईही पळाले. पण सीमारक्षकांनी त्यांना जाऊ दिले नाही.

काही वेळाने राजपुत्राची शिबिका वेतालभट्टांच्या आश्रमाच्या दिशेने निघाली. विक्रम आणि कुमुद्वतीही परतीच्या वाटेला लागले.

कुमुद्वतीची चर्या आनंदाने उजळून निघाली होती. त्या चर्येकडे पाहत विक्रम म्हणाला, "कुमुद्वती, तू आज फार मोठं कार्य केलं आहेस !"

"दाराशी आलेल्या अतिथीनं विन्मुख जाऊ नये एवढीच इच्छा होती. अतिथि संतुष्ट झाले यातच सारं काही आलं."

बोलता बोलता कुमुद्वतीचा स्वर काहीसा सद्गद् झाला.

१५४८५५

## ८

तीन महिन्यापूर्वी राजपुत्र चंद्रादित्य राजधानीस परत गेला होता. पण तेव्हापासून त्याचे काहीच वर्तमान कळले नव्हते. राजपुत्राचे दिवस मोठ्या आनंदात व्यतीत होत असतील याविषयी त्याला शंका नव्हती. पण त्याच्या क्रीडा नेहमीच चंचल आणि स्वैर. जवळच्या माणसाला त्या नेहमीच अस्वस्थ करीत.

आताही राजपुत्राच्या स्मरणाने विक्रमाचे मन एकाएकी अस्वस्थ झाले.

संध्यावंदन संपवून तो आश्रमाच्या पुष्पवाटिकेकडे वळला.

तेवढ्यात कुमुद्वती आश्रमाच्या दिशेने येताना त्याला दिसली. तिच्या पावलात लगबग आणि चर्येवर कसला तरी प्रश्न.

राजकुमार चंद्रादित्याची एखादी वार्ता घेऊन तर ती येत नव्हती ना !

गेल्या तीन महिन्यात ती कितीदा तरी त्याला भेटली होती आणि प्रत्येक भेटीत राजकुमाराविषयीचा तिचा प्रश्न ठरलेला होता पण अशा प्रातःकाळी ती सहसा आश्रमात आली नव्हती.

म्हणूनच ती जवळ येताच त्याने विचारले, "हे काय, कुमुद्वती, अशा भलत्यावेळी तू आश्रमात कशी ?"

काहीसा रोषाचा कटाक्ष त्याच्याकडे टाकत कुमुद्वती म्हणाली.

"का बरं ? मित्रदर्शनालाही काळवेळ लागतो की काय ?"

तिच्या बोलण्यातील भावार्थ त्याच्या लक्षात आला. काहीसा हसून तो म्हणाला, "काहीतरी महत्त्वाची वार्ता सांगायची दिसते. राजकुमारासंबंधीच आहे; होय ना !"

"हो. राजकुमारासंबंधीचाच एक विचित्र आदेश !"

विचित्र आदेश !" विक्रमाने भुकुटि वक्र करीत म्हटले.

"विचित्रच नाही तर काय ? राजकुमार चंद्रादित्य जेथे असतील तेथून त्यांना पकडून आणण्याचा महाराजांचा आदेश आहे."

"म्हणतेस तरी काय ?"

'होय, कुवलय राजधानीतून आला त्यानं सांगितलं."

"आणि त्यामुळं घरात आलेल्या पाहुण्याची दशा शोचनीय झाली, असंच ना !"

कुमुद्वती थोडीशी गडबडली; पण लगेच रोषपूर्ण स्वरात म्हणाली, "पाहुणा घरात येऊन बसला त्याला हाकलून तर देता येत नाही ना ? त्यातच हे आदेशाचं नवं संकट !"

"चंद्रादित्याला माझ्याकडे घेऊन का आली नाहीस ?"

"महाराजांच्या आदेशानं त्यांची गाळण उडालेली दिसते. ते म्हणाले, कुमुद्वती, तूच विक्रमाला भेटून माझी वार्ता सांग."

"पण महाराजांनी असा आदेश का काढला ते तू सांगतच नाहीस !"

"मला कळलं तेवढं सांगितलं. राहिल्या गोष्टी आपणच येऊन विचाराव्या."

विक्रम यावर उत्तर देणार तोच आश्रमाच्या द्वारात कसली तरी गडबड दिसली. आश्रमातील सारा छात्रगण दाराशी

दाटी करून उभा होता. त्यातच काही अश्वारोही राजसेव. चेहरे मधूनमधून दिसत होते.

तो आश्रमद्वाराशी आला तेवढ्यात आचार्यांचा खणखणीत स्वर त्याला ऐकायला आला.

"महाराजांची आज्ञा आम्हाला मान्य आहे. पण राजपुत्र चंद्रादित्य येथे आश्रमात नाही. तुम्हाला हवं असल्यास आश्रमीय छात्र त्यांचा शोध लावण्यास तुम्हाला साह्य देतील."

ते शब्द ऐकले आणि विक्रमाचे मन दचकले.

त्याने मागे वळून पाहिले. कुमुद्वती निघून गेली होती. आचार्यही आपल्या कुटीकडे परतले होते.

विक्रम तेवढ्यात संधि साधून त्या आश्वारोहकाजवळ गेला आणि तो त्यांच्याशी बोलू लागणार,

तोच सुव्रत त्यांच्याकडे धावत आला आणि म्हणाला, "आचार्यदेव तुमचं स्मरण करीत आहेत."

सुव्रताच्या मागोमाग तो आचार्यांच्या कुटीत गेला आणि चरणवंदना करीत उभा राहिला.

आचार्य म्हणाले, "महाराणींचा तुला संदेश आला आहे. तुझ्या कुटीत तो तुला समजेल."

त्या आज्ञेप्रमाणे तो आपल्या कुटीत शिरला. त्याला पाहताच तेथे बसलेला राजसेवक उठून उभा राहिला.

नम्रपणे अभिवादन करीत तो म्हणाला, "महादेवींचा आदेश घेऊन आलो आहे."

"सांगा."

"आदेश असा की 'असाल तेथून त्वरित या आणि मला भेटा.' "

"आणखी काही आदेश ?"

"युवराज तेथे असतील तर त्यांची काळजी घ्या. त्यांना धीर द्या."

"युवराजांवर महाराजांचा एवढा कोप का ?"

"आम्हा सेवकांच्या तोंडून त्याविषयी काही बोलणं योग्य होणार नाही. ते सांगणारी माणसं वेगळी. तो अधिकार आम्हाला नाही."

राजदूताच्या बोलण्यातील सावधता विक्रमाला जाणवली पण तो काही बोलला नाही. त्याच्या श्रांत चर्येकडे पाहत तो म्हणाला, "आपण लवकरच निघू. मी आचार्यांचा निरोप घेऊन येतो. तोपर्यंत या कुटीतच विश्रांती घ्यावी."

तो आचार्यांच्या कुटीत आला तेव्हा ते आतल्याआत येरझारा करीत होते. विक्रमाला पाहून ते चालताचालता थबकले आणि म्हणाले, "राजपुत्र चंद्रादित्य या प्रदेशात आलेला दिसतो. आपल्या छात्रांना घेऊन तू त्याचा शोध घ्यायला हवा."

"पण महाराणीचा आदेश काही वेगळाच आहे."

"काय म्हणतात महादेवी !"

"काही कळत नाही. 'त्वरित निघून ये' एवढाच आदेश आहे."

तशाही उद्विग्न स्थितीत आचार्य एकाएकी हसले आणि म्हणाले, "हे काम तुला सांगावं असं वाटलं होतं. पण योगायोग काही वेगळाच दिसतो."

विक्रमाला त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ कळला नाही. तो चाचरत म्हणाला, "आपला आदेश असेल तसं करीन."

आचार्य काही वेळ स्तब्ध राहिले. कसलीतरी विलक्षण

गुंतागुंत ते मनातल्या मनात उकलत असावे.

त्या क्षणभरात विक्रमाचे मन विलक्षण गुदमरल्यागत झाले.

तपस्तेजाने उग्र वाटणाऱ्या आचार्यांच्या मुद्रेवर क्षणभर सावधता खेळत असल्याचा भास विक्रमाला झाला. पण ती सावधता हळुहळु अभ्राप्रमाणे विरत गेली आणि त्यांच्या चर्येवर पुन: एकदा हास्य उमटले. कसल्यातरी मृदु पाशातून सुटका करून घेणारे एक ठराविक अस्त्र !

"हा भार तुझ्यावर टाकणं योग्य होणार नाही. तू राजधानीसच जा."

पुन: एकदा त्यांच्या येरझारा सुरू झाल्या. विक्रम जायला निघाला तेव्हा ते म्हणाले, "सुव्रताला माझ्याकडे पाठवून दे."

आचार्यांच्या पर्णकुटीतून विक्रम बाहेर पडला तो आपल्या कुटीकडे गेला नाही. त्याने आवतीभोवती नजर टाकली आणि होमशाळेच्या मागील छायापथाकडे आपली पावले वळवली.

दुतर्फा वृक्षांच्या रांगेतून जाणाऱ्या त्या अरुंद पथावर वृक्षांची नेहमीच छाया असायची. त्या छायापथाने वाट काढत तो नदीच्या पात्रापाशी आला आणि पात्र ओलांडून पलीकडल्या एका गर्द कुंजातील शिलातलावर जाऊन बसला.

कुमुद्वती तेथे त्याचीच वाट पाहत असावी. तिला पाहून त्याने स्मित केले आणि म्हटले, "अशी जवळ येऊन बैस."

आपल्या अंत:करणातील कसला तरी गूढ अभिप्राय तो तिच्या कानात सांगू इच्छित होता काय ?

तसल्या त्या विश्रब्ध वातावरणातही कुमुद्वतीचे मन काही वेगळाच विचार करीत होते. तेवढ्यात त्याचे स्वर ऐकू आले, "ऐकतेस ना कुमुद्वती मी काय म्हणत आहे ते."

कुमुद्वती गोंधळली आणि म्हणाली, "होय. ऐकते आहे."

"कुमुद्वती, माझी अवस्था मोठी विचित्र झाली आहे. चंद्रादित्याची भेट घ्यायला मन कसं उत्सुक आहे. पण त्यात केवढा अडथळा आला आहे ते तू पाहतेसच. युवराज इथे आला आहे हे या सैनिकांना माहीत असावं आणि आचार्यांनीही आश्रमाचं साह्य त्याना देऊ केलं आहे आज ना उद्या तुमच्या वस्तीत त्याचा शोध घ्यायला ते येतील मी असतो तर काय वाटेल ते करून युवराजांना त्यांच्या दृष्टीआड केलं असतं. पण मला आजच राजधानीकडे येण्याचा आदेश आला आहे."

चंद्रादित्याच्या भेटीसाठी त्याचे मन उत्सुक होते आणि त्याच्यावर आलेल्या संकटामुळे ते गडबडले होते. ते संकट कोणत्या स्वरूपाचे आहे ते समजून घेतल्याशियाय त्याचा जीव थाऱ्यावर राहणारा नव्हता.

आणि हे सारे तो केवळ कुमुद्वतीजवळ प्रकट करू पाहत होता.

या विचाराने कुमुद्वती मनातल्या मनात सुखावली.

"कुमुद्वती, मी काय करावं हेच मला कळत नाही," तो अगतिक स्वरात म्हणाला.

"तुम्ही युवारजांना भेटू नये हेच बरं !"

तिच्या स्वरातील विश्रब्धता त्याला जाणवली. तिच्याकडे पाहून तो उत्सुकतेने म्हणाला.

"हे तूं त्याला समजावून सांगशील ?"

कुमुद्वतीने उत्तरादाखल मान हालविली. विक्रमाला संतोष झाल्यासारखा दिसला. त्याची चर्या काहीशी उजळली. त्या चर्येकडे पाहत कुमुद्वती म्हणाली, "पण त्यापलीकडचं कार्य मोठं

अवघड आहे."

"होय ! ते मी जाणतो. युवराज भलता चंचल आणि स्वैर आहे आणि त्याच्या स्वैरपणाचे चटके शत्रूपेक्षा त्याच्या मित्रांनाच जाणवतात. पण कुमुद्वती, ते आपण सहन करायला हवे."

या गंभीर चर्येच्या तरुणाच्या मनाचा फार मोठा भाग युवराजाच्या चिंतेने व्यापला होता. त्यात इतरांना यत्किंचितही स्थान नव्हते. पण त्याच्या चर्येवरील ते औदास्य तिला पाहवले नाही.

त्या उदास चर्येकडे पाहतापाहता तिला एक विचार सुचला. तिने चटकन मान वर करून हसतहसत त्याच्याकडे पाहिले आणि म्हटले, "राजधानीतून आपण इकडं परत येणार ना ?"

"हो शक्य तितक्या लवकरच येईन. बहुधा चारपाच दिवसांच्या आतच."

"तितकी वाट मी पाहायला तयार आहे. तेवढ्या अवधीत युवराजांचा भार मी सांभाळीन."

ते शब्द ऐकले आणि आभाळातील छाया एकाएकी नष्ट व्हावी तशी त्याच्या चर्येवरील उदासपणाची छटा पाहतापाहता मावळली.

कुमुद्वतीकडे सहास्य मुद्रेने पाहत तो म्हणाला, "कुमुद्वती, हे कार्य करण्यात तू मला केवढं साह्य करीत आहेस म्हणून सांगू !"

कुमुद्वतीच्या अंत:करणातील आनंद जणु मावेनासा झाला. तिचे मन म्हणत होते, "तुमचे हे मधुर शब्द ऐकण्यासाठी मी काय वाटेल ते करीन."

पण तिला तसे बोलवले नाही. ती कसेबसे म्हणाली, "तुम्ही चिंता करू नका. तुम्हाला जे प्रिय ते मलाही प्रिय आहे."

ते उद्गार ऐकले आणि विक्रमाच्या मनातील आनंद ओसंडून बाहेर आला. कृतज्ञतेने भारावलेला एक कटाक्ष तिच्याकडे टाकत तो म्हणाला, "कुमुद्वती, जेव्हा वडील माणसं रुष्ट होतात हितचिंतक दुरावतात आणि मित्रजनही दुःष्प्राप्य होतात तेव्हा तशा स्थितीत जे माणूस विश्वास देतं ते मनाला किती प्रिय होतं म्हणून सांगू !"

यानंतर लवकरच दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला.

कुमुद्वती एकटीच आपल्या वस्तीकडे वळली.

एकटी ! छे, एकटी कशी ?

विक्रमाचे ते मृदुमधुर शब्द यावेळी तिच्या सोबतीला होते ना !

# ९

दीड दिवसाच्या सततच्या प्रवासाने शिणलेला विक्रम सायंकाळच्या प्रहरी राजधानीत पोचला. तो थेट राजवाड्याकडे वळला. महाराणीच्या महालापाशी त्याने आपला अश्व थांबविला आणि सेवकाकडून आत वर्दी दिली.

महाराणी त्याचीच वाट पाहात होत्या. विक्रमाने त्यांच्या पायाशी वाकून अभिवादन केले.

सद्‌गद स्वराने त्या म्हणाल्या, "वत्सा, तुझे कल्याण असो." आणि असे बोलताबोलता त्यांचे नेत्र अश्रूंनी भरून आले.

"हे काय, देवी ! डोळ्यात असे अश्रू का ? असं कोणतं संकट आपल्यावर ओढवलं आहे ?"

."कसं सांगू ? विक्रम, युवराजांनी प्रजेचा फार मोठा अपराध केला आहे आणि महाराज त्याच्यावर अतिशय क्रुद्ध आहेत. त्याला पकडून आणण्यासाठी साऱ्या राज्यात आदेश गेले आहेत."

"असा कोणता अपराध युवराजाकडून घडला ?"

"अपराध ! तो सांगायला स्त्रीजातीला लाज वाटावी. कुणाही शीलवंताने करू नये तो अपराध युवराजांनी केला. कसं सांगू ? विक्रम, मला तो नीट सांगताही यायचा नाही."

भल्या पहाटे उठून राजपुरोहित आपल्या हातातील दंड

मोठमोठ्याने वाजवीत राजगृहापाशी आले आणि क्रुद्ध मुद्रेने त्यांनी महाराजांना विचारले, "महाराज, तुमच्या राज्यात न्याय आहे का ?"

"असं का विचारता, भूदेव ! कुणाचा केवढाही मोठा अपराध असो, प्रतापादित्याकडून त्याला शासन मिळाले आहे."

"अपराध तसाच महान् आहे. म्हणून सांगायला आलो."

"सांगा."

त्यानंतर त्या राजपुरोहिताने सांगितले ते खरोखरच भयानक होते.

आदल्या दिवशी सायंकाळी राजपुरोहिताच्या घरापुढे एक शकट उभा राहिला. त्यातून एक तरुण स्त्री बाहेर आली. राजपुरोहिताची तरुण स्नुषा आंगणात आली. तिला पाहून त्या तरुण स्त्रीने तिचे पाय धरले आणि आक्रोश करण्यास सुरवात केली.

"मला एक रात्र इथं राहायला जागा हवी." ती दीनवाण्या स्वरात म्हणाली. तिचे नेत्र भयभीत झाल्यासारखे दिसले.

"काय झालं ते नीट सांगा ना ?" पुरोहितस्नुषेने म्हटले.

"काय सांगू ? मी एकटी आहे. मोठ्या संकटात आहे. माहेरी जायला निघाले. सोबतीला कुणीसुद्धा नाही असं पाहून.... काय सांगू, या पुरुषांची जात. मेल्यांनी इथवर माझा पाठलाग केला. मला एकटीला पाहून सारे माझ्या मागे लागले. माझ्यावर दया करा हो ! मला नीट पोचविण्याची व्यवस्था करा. नाहीतर निदान रात्रभर इथं आपल्याकडे राहू द्या."

पुरोहितांच्या स्नुषेचे मन ती वार्ता ऐकून द्रवले. तिने त्या तरुण स्त्रीच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हटले, "घाबरू नका. घरी पुरुष येतील आणि तुमची व्यवस्था करतील. तोवर

तुम्ही आत चला."

असे म्हणत पुरोहितस्नुषेने तिला अंतर्गृहात नेले.

घरात कोणीच नव्हते. पुरोहित आणि त्यांची वृद्ध पत्नी बाहेर गेलेली. पुत्र कधीचाच परागंदा. त्याच्या विरहाने आर्त झालेली आणि त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली ही तरुण सूनच काय ती त्या घरात एकटी होती.

ही वार्ता सांगून राजपुरोहित म्हणाले, "काय सांगू राजन्, ती स्त्री नव्हती. स्त्रीच्या छद्मवेशातील एक तरुण पुरुष होता. त्यानं माझ्या स्नुषेची त्या एकांतात नको ती विटंबना केली."

"कुठं आहे तुमची स्नुषा ?"

"आपली लाजिरवाणी कथा सांगायला सुद्धा तिनं आपलं मुख आम्हाला दाखविलं नाही. दुःखाच्या भरात रड रड रडली आणि जवळच्या विहिरीत जीव दिला."

"आणि त्या पुरुषाचं काय झालं ?"

"त्याला कोण काय करणार ? आमच्या शेजारच्या लोकांच्या समक्ष तो अगदी हसतहसत बाहेर पडला."

"त्यांला कुणीच कसं पकडलं नाही ?"

"कोण पकडणार ? त्याच्यासारख्या राज्यातील एका महान अधिकारी व्यक्तीला पकडण्याचं साहस कुणी करावं ?"

"अशी महान व्यक्ति आहे तरी कोण ? तुम्ही तिला ओळखता ?"

"होय, राजन् !"

"त्याचं नाव सांगा."

"त्याचा काही उपयोग आहे का ?"

"आमच्या न्यायाबद्दल तुमच्या मनात कसली शंका आहे, भूदेव ?"

"शंका एवढीच की आपल्या पोटच्या पोराला शासन देणारा कठोर शासक कधी कुठं झाला आहे काय ?"

"म्हणता तरी काय ? भूदेव ?"

महाराजांच्या डोळ्यापुढे सारे विश्व गरगरत राहिले. त्यांनी दोन्ही हातांनी आपले मस्तक गच्च दाबून धरले.

त्यांच्याकडे पाहात काहीशा खिन्नतेने हसत राजपुरोहित उठले आणि म्हणाले, "माझी शंका खरी ठरली. जातो मी."

"जाऊ नका, भूदेव. तुम्हाला योग्य तो न्याय मिळेल !"

आणि ब्राह्मणाला वचन दिल्याप्रमाणे महाराजांनी न्याय-सभा बोलावण्याची आज्ञा दिली.

ही कथा सांगून महाराणी म्हणाल्या, "विक्रम, ती न्याय-सभा राजधानीत उद्या भरणार आहे."

"भिक्षा मागायला का आला आहेस ?"

अश्वत्थाच्या पारावर बसलेल्या त्या वृद्ध स्त्रीने विचारले आणि ती चटदिशी आत गेली. कुणाला तरी ती सांगू लागली, "बाहेर कुणी याचक आला आहे."

विक्रम दचकला. तो कुणा याचकासारखा का दिसत होता ? काही वेळाने त्याच्या लक्षात आले. ती स्त्री वेडी होती. राज-पुरोहित केशवाचार्यांची पत्नी. पुत्राच्या विरहाने वेडी झालेली माता.

पण तिचे तरी काय चुकले ?

आपण एकाप्रकारे भिक्षा मागायलाच आलो नाही काय ?

आत कोणा पुरुषाचे स्तोत्रपठण चालू होते. बहुधा केशवाचार्यच असावेत. त्यांचे ते शब्द किती स्पष्ट ऐकू येत होते.

अपराधसहस्राणि क्रियतेऽहर्निशं मया
दासोहमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर ।।

"क्षमस्व परमेश्वर' 'क्षमस्व परमेश्वर' असे श्लोकाचे शेवटचे चरण ओष्ठावर घोळवीत केशवाचार्य दाराशी आले आणि म्हणाले, 'थांबरे बाबा भिक्षा वाढतो'.

बाहेर येताच त्यांचे विक्रमाकडे लक्ष गेले आणि ते दचकले.

"कोण विक्रम, इतक्या पहाटेच्या प्रहरी कुणीकडं आलास बाबा ?"

"आईचे म्हणणे खरे आहे. याचक म्हणूनच आलो आहे."

काहीशी शुद्धीवर आल्यासारखी केशवाचार्यांची मुद्रा दिसली.

"तू त्या राजपुत्राचा मित्र, होय ना ! वाटलंच होतं, आज ना उद्या येशील."

त्यांच्या स्वरात एक प्रकारचा कंप होता.

"नाही, भूदेव. मी राजपुत्राकरता आलो नाही. अवंती राष्ट्राचा एक प्रजाजन म्हणून आलो आहे. अवंतीची प्रजा माझ्यारूपाने आपल्या दाराशी क्षमेची याचना करायला उभी आहे. बोला भूदेव. हवी ती भिक्षा आम्हाला मिळेल का ?"

"महाराजांच्या तर्फे का आला आहेस तू ?"

"नाही. महाराजांच्या तर्फे नाही पण महाराजांसाठी."

त्याला मध्येच अडवीत केशवाचार्य म्हणाले, "महाराजांना न्याय द्यायचा नसेल तर तो त्यानी देऊ नये."

त्यांच्या स्वरात कमालीचा कठोरपणा होता. पण लगेच कासवीने अवयव लपवावे तसे त्यानी आपले बोलणे आवरते घेतले.

"आपला समज बरोबर नाही. महाराज तर न्याय द्यायला बद्धपरिकर आहेत. प्रसंग आला तर पोटच्या पोरावर सुरी चालवायला ते कमी करणार नाहीत. पण भूदेव, आपणच सांगा या न्यायाची पुढची कोणती फळे आपणास चाखायला मिळतील याचा विचार आपल्यासारख्या प्रज्ञावंतांनी करायला नको का ?"

काही वेळ थांबून तो केशवाचार्यांकडे वळून म्हणाला, "भूदेव, ही अवंतीची प्रजा दुर्योधनाकरिता रडत नाही, ती धृतराष्ट्राकरिता शोक करीत आहे !"

आपले मिटलेले डोळे अर्धवट उघडत केशवाचार्यांनी त्याच्याकडे पाहिले आणि म्हटले, "मी महाराजांजवळ न्याय मागितला तर त्यात चुकलं कुठं ?"

"तो न्याय महाराज आपणाला देतीलही. युवराजांना जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी असा त्यांचा न्यायाधिकाऱ्यांना आदेश गेला आहे आणि उद्या देहान्तशासनाची शिक्षा युवराजांना सुनावली गेली तर तीही अमलात आणायला महाराज मागे सरणार नाहीत. पण भूदेव, माझं अंतःकरण तुटतं ते त्या स्वैर मनाच्या चंद्रादित्यासाठी नव्हे, फार काय, पुत्रनाशाच्या कल्पनेने दीन झालेल्या त्याच्या मातेसाठीही नव्हे, तर भविष्यकाळी अनाथवत् होणाऱ्या अवंतीच्या प्रजेसाठी ! ज्या घरट्यात आज आपण सुखाने दिवस काढत आहोत त्या घरट्यांना आश्रय देणारा महान्वृक्ष उद्यापरवा हादरला तर या राष्ट्राची काय स्थिति होईल ?"

केशवाचार्य चाचरले असावेत. त्यांनी तुटकपणे विचारले, "मी काय करायला हवं असं तुला वाटतं ?"

"ते सांगण्याचा अधिकार माझा नाही. ते आपणच ठरवायचं आहे आणि ते ठरविण्यास आपण स्वत: समर्थ आहात. चंद्रादित्य स्वैर असेल, दुर्वर्तनी असेल पण त्याला प्राणदंड झालाच तर महाराज प्रतापादित्यांची काय स्थिति होईल याची कल्पना करा. नवसासायासाने लाभलेला तो एकुलता एक पुत्र ! त्याच्या विनाशाने त्या वृद्ध पित्यावर–आणि क्षमा करा भूदेव, त्याबरोबर आपल्या अवंती राष्ट्रावर जो अनर्थ ओढविण्याचा संभव आहे त्याची नुसती कल्पना केली तरी माझं मन हादरून जातं. ज्या वृक्षावर आमची घरटी विसावली आहेत तो वृक्ष तुटून पडेल वा कोसळेल असं कृपाकरून काही करू नका. अवंती राज्याचा एक सामान्य प्रजाजन म्हणून ही विनंती मी आपणास करीत आहे."

राजपुरोहित क्षणभर तसेच स्तब्ध राहिले. बोलताबोलता विक्रम केव्हा गेला ते त्यांना कळले नाही.

काय म्हणत होता हा विक्रम !

अवंतीराष्ट्राचा नाश होण्याचा संभव आहे ? –– तो आपल्यामुळे होणार आहे ?

होय, गांधारी सुद्धा असेच नव्हती का म्हणाली ! 'ममैव ह्यपराधेन कुलमग्र्यं विनाशितम्'. होय, अपराधच क्षमा करणे हे जर ब्राह्मणाचे कुलभूषण आहे तर क्षमा न करणं हा अपराधच नव्हे का ?

या ब्राह्मणामुळे राष्ट्राचा विनाश जवळ आला असेच लोक म्हणत राहतील. याच्यामुळे राजपुत्रच गेला नाही तर राष्ट्राला आधारभूत असलेला प्रतापादित्यही उन्मळून पडला. . . .शरपंजरी

पडलेल्या भीष्माला पाहून त्या कुरुकुलाची एक जन्मदात्री असेच नव्हती का म्हणाली ?

त्या जुनाट अश्वत्थाची पर्णे कापून उठली आणि त्यातून एक जीर्ण पर्ण त्यांच्याजवळ येऊन पडले . . . जणु एका जुन्या श्लोकाचे स्मरण करून देण्यासाठी !

एष तस्वा रणे राजन् शस्त्रतापेन वीर्यवान्
नरसूर्योस्तमभ्येति सूर्योस्तमिव केशव ।।

"केशवा ! आपल्या शस्त्राच्या प्रतापाने रणामध्ये शत्रूंना थरारून सोडणारा मानवसूर्य आकाशातील सूर्याप्रमाणे अस्ताला जात आहे."

केशवाचार्यांना उद्देशून अवंतिका नगरी हेच उद्‌गार काढत नव्हती काय ?

छे: ! असे होता उपयोगी नाही.
अवंती राष्ट्राचा सूर्य अस्तास जाणार नाही.
तो आम्ही जाऊ देणार नाही !

न्यायसभेचा तिसरा दिवस उजाडला. युवराजांच्या अपराधाचा पाढा वाचून झाला पण दिलेल्या अवधीपर्यंत अपराधी न्यायासनासमोर आला नव्हता. प्रजाजनांचे औत्सुक्य शिगेला पोचले होते, त्यांच्यातही पितापुत्रांचा पक्ष घेणारे दोन तट पडले होते. त्यातच घटकाभरापूर्वी एक नवीच गोष्ट गुप्त हेरांकडून कानावर आली होती आणि ती विक्रमाला संचित करणारी होती.

त्या दिवशीची सभा सुरू होताच न्यायसभेच्या अध्यक्षांनी अपराध्याची चौकशी केली. महाराजांतर्फे अमात्यांनी उठून

सांगितले की ज्या अर्थी दिलेल्या अवधीत अपराधी न्यायसनासमोर आलेला नाही त्याअर्थी त्याच्यासंबंधीची शिक्षा सुनावण्यास आता अडचण नसावी. उलट न्यायासन सांगेल ती शिक्षा अपराध्याला दिली जाईल.

न्यायाध्यक्ष आपला निर्णय सांगताना म्हणाले–

"या प्रकरणी जे कृत्य उद्‌भवले आहे त्याला धर्मशास्त्रात निरनिराळ्या शिक्षा दिलेल्या आहेत. पण स्त्रीजातीवरील बलात्कार आणि तिची अप्रत्यक्ष हत्या या दोन्हीकडे अवंतीचे राज्यकर्ते नेहमीच कडक दृष्टीने पाहात आले आहेत."

"रूढीचा विचार करता याप्रकरणी मागेही जी शिक्षा दिली आहे ती म्हणजे देहान्तशासन."

ते शब्द ऐकले आणि साऱ्या सभेत खळबळ उडाली.

अमात्य आपल्या आसनावरून उठून पुढे आले आणि म्हणाले, "मला न्यायासनासमोर काही निवेदन द्यायचे आहे. अनुज्ञा असावी."

'युवराज चंद्रादित्याच्या वतीने आपणास काही सांगायचं आहे काय ?"

"नाही. न्यायसभेने अपराध्याला शिक्षा सुनावण्यापूर्वी नव्याने उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचा विचार करावा असं मला म्हणायचं आहे. घटकाभरापूर्वीच वार्ता आली आहे की काशिराजांचं सैन्य सीमेवरच्या जंगलात येऊन उभे आहे आणि त्यांनी सीमेवरील गांवाना त्रास द्यायला आरंभ केलेला दिसतो. यामुळं कोणत्या क्षणी युद्ध उद्‌भवेल हे सांगणं कठिण आहे. अशावेळी न्यायाचं धोरण शत्रुपक्षाला अनुकूल ठरणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे."

"आपले म्हणणे जरा स्पष्ट करा." न्यायाध्यक्ष म्हणाले.

"काशिराजाचं सैन्य सीमेच्या प्रांतात घुसत आहे आणि समजा, युवराज त्याच प्रांतात असले तर आपल्या निर्णयानं हाय खाऊन ते शत्रुपक्षाला जाऊन न मिळोत."

अमात्य निवेदन करून खाली बसतात तोच शब्द आले

"युवराजांना प्राणदंड देण्याची मुळीच जरूरी नाही."

अवघ्या न्यायसभेला विस्मित करणारे ते शब्द राजपुरोहितांचे होते.

न्यायाध्यक्षाकडे वळून ते म्हणाले, "सभापति महाराज, मी केशवाचार्यच आपल्यापुढे नव्यानं उभा आहे. चंद्रादित्याकडून अपराध झाला असेल. नव्हे, झालाच आहे आणि तरीही आपण सर्वांनी तो क्षम्य मानावा असं माझं मत आहे."

"भूदेव, न्यायाची मागणी आपणच केली होती ना ?"

"होय. मीच ती मागणी केली. ज्या क्षणाला ती न्यायप्रविष्ट झाली त्याच क्षणी मला न्याय मिळाला आहे. तेवढ्याने मी कृतार्थ आहे. त्याहून जास्तीची अपेक्षा मला नाही."

न्यायाध्यक्ष यावर उठून काही बोलणार तोच एक घनगंभीर आवाज आला, 'ऐका.'

साऱ्यांच्या नजरा त्या आवाजाच्या दिशेने वळल्या.

खुद्द प्रतापादित्य महाराज उठून उभे राहिले होते. न्यायाध्यक्षाकडे वळून ते म्हणाले–

"जगातल्या साऱ्या श्रेष्ठ कर्तव्याहून न्याय हे पवित्रतम कर्तव्य आहे. त्याची प्रतिष्ठा म्हणजे राज्याची प्रतिष्ठा. या राज्यात माझ्या समस्त प्रजाजनांना न्याय मिळाला पाहिजे. या राज्यातील लेकीबाळीच्या आणि पुत्रवधूंच्या नेत्रातून गळणारे

अश्रू या राज्याने कधी सहन केले नाही. ही या राज्याची परंपरा आहे---आणि या परंपरेचा गर्व मी वाहत आलो आहे."

थोडावेळ थांबून त्यांनी समस्त सभेकडे नजर टाकली आणि पुन: न्यायासनाकडे दृष्टिक्षेप करीत ते म्हणाले–

"आतापावेतो न्यायसभेसमोर झालेली सारी निवेदने यथा-योग्यच आहेत. राज्यावरील संकट जाणवून देणे हे अमात्यांचं कर्तव्य होतं ते त्यानी केलं आहे तर क्षमाशीलता हे आपलं कर्तव्य आहे हे या ब्राम्हणोत्तमाने जाणवून दिले आहे. पण न्याय देणं हे या सभेचं कर्तव्य आहे. माझी आपणास विनंति आहे की न्याया-सनाला योग्य वाटेल तो दंड आपण द्यावा. तो अमलात आपण्यास आम्ही बद्धपरिकर आहोत. न्याय हाच कोणत्याही राज्याचा आधार आहे. छाया देणं हा वृक्षाचा, तर न्याय हा राजांचा धर्म आहे. छाया देत नाही तो वृक्ष कसला आणि न्याय देत नाही ते राज्य कसलं !"

त्या घनगंभीर आवाजाने सारी सभा क्षणभर दिङ्मूढ झाली.

'न्याय देत नाही ते राज्य कसलं ?'

सभेतील प्रत्येकाच्या हृदयापर्यंत त्या शब्दांचा निनाद जाऊन पोचला होता. अंत:करणाच्या आवेगातून उठलेले ते करारी शब्द ! सारी सभा त्या शब्दांनी जणु ढवळून निघाली.

तेवढ्यात न्यायसभेच्या कोपऱ्यात बसलेला एक तरुण मुलगा उठून महाराजांच्या आसनापाशी गेला आणि नम्रपणे अभिवादन करून म्हणाला, 'अवंतीचा एक प्रजाजन या नात्याने मला न्यायसभेपुढं काही सांगायचं आहे.'

अवंतीचा एक प्रजाजन !

खरंच ! या न्यायसभेत त्याच्या मताची दखल कुणी घेतलीच नव्हती.

महाराजांच्या चर्येवर क्षणभर एक असंतोषाची छटा उमटली. पण त्यांनी स्वत:ला सावरून घेतले आणि ते शांतपणे म्हणाले, "अवंतीच्या प्रजेलाही तो अधिकार निश्चितच आहे. विक्रम, तुझं जे मत असेल ते तू न्यायासनासमोर प्रकट कर. माझी अनुमति आहे."

महाराजांची अनुज्ञा घेऊन विक्रम न्यायासनाकडे वळला आणि म्हणाला, "अवंतीचा एक नागरिक म्हणून मी न्यायसभेपुढे एक विनंति करू इच्छितो. सभापतींनी अनुज्ञा द्यावी."

न्यायाध्यक्षानी मान हालविली आणि म्हटले, "बोला".

'अवंती राष्ट्राचा जेणे करून विनाश संभवेल असं कोणतंही कृत्य–न्यायाचं कृत्य देखील प्रजेच्या दृष्टीने अनर्थकारक ठरतं. युवराजांना देहान्त शिक्षा देणं हे राजाधिराजांना आपलं कर्तव्य वाटत असेल पण प्रजेला तसं वाटत नाही. आपल्या राज्यातील सर्वश्रेष्ठ नागरिकाने, या ब्राम्हणोत्तमाने आपल्याला ते विशद केलंच आहे. न्यायाध्यक्षांनी प्रजेच्या मनाचा कौल लक्षात घ्यावा अशी आमची नम्र विनंति आहे."

"तुमची ही विनंती आजपर्यंतच्या रूढ परंपरेला आड येत असली तरीही ती मान्य करावी असा तुमचा आग्रह दिसतो."

"नाही. देहांतशासनाची शिक्षा ही परंपरेनं अटळ मानली असली तरी धर्मशास्त्राप्रमाणे त्या शिक्षेतही पर्याय निघू शकतो हे आपणही यापूर्वी मान्य केलं आहे."

"तसा एखादा पर्याय प्रजाजनांपैकी कुणाला सुचवायचा असेल तर त्यांनी सुचवावा आम्ही त्याचा विचार करू."

न्यायाध्यक्षांच्या त्या शब्दात त्याला निश्चितच एकप्रकारचे आव्हान होते !

पण विक्रम गडबडला नाही, न्यायाध्यक्षांकडे निर्भय नजर टाकीत तो म्हणाला, "युवराजांना शिक्षा होईल आणि प्रजेचीही विनंति मान्य होईल असा एखादा उपाय सुचविण्याचं धाष्टर्य कुणी दाखविलं तर न्यायासनाला ते संमत होईल काय ?"

साऱ्यांच्या नजरा आता न्यायाध्यक्षाकडे वळल्या. अनुज्ञेदाखल न्यायाध्यक्षांची मान हलली.

"हा उपाय सुचविण्यात प्रजेला आणखी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. वधास पात्र ठरलेल्या व्यक्तीला योग्य दंड मिळावा पण ज्यानं जन्मात कधी पापकर्म केलं नाही अशा उदार व्यक्तीला त्याची अणुमात्र झळ लागू नये. युवराजांना देहान्त शासन तर व्हावं पण महाराजांना त्याचं दुःख भोगायला लागू नये अशी आम्हा प्रजाजनांची उत्कट इच्छा आहे."

होय ! खरोखरच साऱ्या प्रजाजनांची ही इच्छा होती. आपले मनोगत नीट शब्दात निर्भयपणे मांडणारा कुशल अधिवक्ता मात्र त्यांना या क्षणापर्यंत गवसला नव्हता तो आता गवसला. न्यायाध्यक्षांनाही ते उमगले असावे. ते म्हणाले, "महाराजांबद्दल प्रजेनं व्यक्त केलेली मनाची धारणा यथायोग्यच आहे. त्यांच्या मनाला दुःख न देता युवराजांना योग्य ते शासन व्हायला हवं अशीच न्यायदेवतेची धारणा आहे."

विक्रमाकडे वळून ते म्हणाले, "आता अविलंबेकरून आपला उपाय सांगा. आम्ही तो ऐकायला उत्सुक आहोत."

"ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. न्यायासनासारख्या श्रेष्ठ पवित्रतम व्यक्तीनं जी परंपरा उचलून धरली तिच्याबद्दल

आम्हा सामान्य प्रजेलाही संतोषच वाटतो. झालेल्या अपराधा-बद्दल युवराजांना प्राणदंडाची सजा मिळायलाच हवी याबद्दल प्रजेच्या मनात दुमत नाही. त्याबरोबरच त्यातून उद्भवणारे सारे अनर्थ शक्य तो टाळता यावेत अशी आमची इच्छा आहे आणि त्या इच्छेला अनुसरून आमचा हा उपाय आम्ही न्याय-देवतेपुढं व्यक्त करतो."

सभेची उत्कंठा आता परमावधीला पोचली होती. साऱ्यांचे नेत्र विक्रमाकडे लागलेले, कान टवकारले गेलेले. तिकडे पाहात विक्रम म्हणाला –

"युवराज चंद्रादित्याऐवजी त्याचा काष्ठपुतळा अपराधाचे प्रतीक म्हणून अग्नीत जाळला जावा असं मला वाटतं."

विक्रमाचे ते शब्द ऐकले मात्र, साऱ्या सभेने एकमुखाने गर्जना केली, 'साधु ! साधु !'

महाराजांचे नेत्र प्रथमच इतक्या प्रसन्न मनाने वर उंचावले आणि न्यायासनाजवळ उभ्या असलेल्या विक्रमावर स्थिरावले.

शांत आणि प्रसन्न असे ते नेत्र.

त्या प्रसन्न किरणांनी विक्रम सर्वांगांनी न्हाऊन निघाला.

# १०

समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगत असलेली नौका एकाएकी छिद्रान्वित व्हावी आणि जवळपास कोठेच किनारा दिसू नये तशी कुमुद्वतीची अवस्था झाली.

चंद्रादित्याचा भार तिने आपल्या इच्छेने स्वत:वर घेतला खरा, पण तो तिला चिंतेचा विषय होऊन राहिला.

ज्या दिवशी प्रात:काळी ती विक्रमाला भेटून परत आली त्यावेळी राजपुत्र झोपडीत नव्हता. प्रहराभराने राजसेवक वस्तीत आले आणि त्यांनी प्रत्येक झोपडी शोधून काढली. सारा दिवस-भर त्यांनी चंद्रादित्याचा शोध घेत भिल्लांच्या वाडीतच वस्ती केली होती. तिच्याही झोपडीवर त्यांचा पहारा होता.

तेवढ्यातच सायंकाळच्या सुमारास पांढुरक्या केसांची, गालावर सुरकुत्या पडलेली आणि सारे अंग वाकलेली एक म्हातारी लंगडत, काठी टेकीत तिच्या झोपडीत शिरली.

आपल्या लुकलुकत्या डोळ्यांनी सारीकडे तिने नजर टाकली आणि कुमुद्वतीकडे पहात म्हटले, "गर्दभिल्ल महाराजांचं पोरगं इथंच राहते काय वो ?"

"हो. पण सध्या गावी नाही."

"तू कोण हायेस ?"

"मी आहे त्याची बहीण, कुमुद्वती."

ते नाव ऐकताच म्हातारी विस्मयाने ओरडली, "तू कुमुद्वती ? बरीच मोठी झालीस वो बाये !"

आणि जवळ येऊन तिच्या पाठीवर हात ठेवीत म्हटले, "मला वळखलं नाहीस ?"

कुमुद्वती गोंधळली होती. ती म्हणाली, "नाही बाई. कोण तू ?"

"अवो बाय, मी तुझ्या मायची बहीण, तुझी मावशी. तुझ्या मामाच्या घरी तुला पाह्यलं तवा भलती लहान व्हतीस."

कुमुद्वतीला ते काही स्मरत नव्हते. पण म्हातारीने तिला सोडले नाही. बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या आपल्या बहिणीच्या मुलीला पाहून तिला अपरंपार प्रेमाचे भरते आले.

झोपडीत शिरलेले राजसेवक ते दृश्य पाहतच होते.

काही वेळाने ते निघून दूरवर गेले आणि म्हातारी खदखदून हसली.

तो स्वर ऐकला आणि कुमुद्वती आश्चर्यचकित झाली.

तिच्यापुढे उभा होता तो राजपुत्र चंद्रादित्य.

"आता दोन दिवस ही म्हातारी मावशी इथंच वस्तीला राहणार आहे." राजपुत्र हसून म्हणाला.

कुमुद्वतीची एक काळजी मिटली पण त्यातूनच दुसरी सुरू झाली. दोन दिवस राजसेवक पुन: पुन: भिल्लांच्या वस्तीस येत पण राजपुत्र दिवसभर जंगलात दडून असे. सायंकाळी तो कुमुद्वतीकडे वस्तीला येई.

एक दिवस राजपुत्राने एक नवीनच वार्ता तिला सांगितली.

काशिराजांचे सैन्य सीमेवर येऊन ठेपले होते आणि ते कधी सीमा पार करून राज्यात शिरेल याचा नेम नव्हता.

एवढेच सांगून राजपुत्र स्वस्थ बसला नव्हता. आणखी बऱ्याच गोष्टी तो कुमुद्वतीजवळ सांगत राहिला.

काशिराजांच्या सैन्याची यावेळी बऱ्याच मोठ्या प्रमाणात तयारी दिसत होती. पण त्यांना अवंती राज्यावर आक्रमण करण्याची फारशी इच्छा नव्हती. चंद्रादित्यावरील पित्याचा रोष त्यांना माहित झाला होता आणि तो शक्य तर स्वत: येऊन मिटवावा असा त्यांचा विचार होता.

चंद्रादित्याने या गोष्टीचा लाभ का घेऊ नये ?

आपल्या पित्याकडे परत जाऊन स्वत:ला बंदिवान करून घेण्यापलीकडे त्याला तरी दुसरा कोणता लाभ होता ? त्यापेक्षा काशिराजांच्या साह्याने अवंतीला थाटामाटाने जाऊन पित्याशी सख्य करून घेणेच जास्त योग्य नव्हते काय ?

दरदिवसाला राजपुत्र अशा गोष्टी कुमुद्वतीला ऐकवत होता आणि त्यातच एक दिवस ती भयंकर वार्ता आली.

न्यायसभेत युवराजांना प्राणदंडाची शिक्षा सांगण्यात आली होती. त्याला पकडून आणण्याची आज्ञाही झाली होती आणि खुद्द युवराजांचा मित्र म्हणविणारा विक्रम जातीने या कामावर नेमला गेला होता.

ती वार्ता ऐकून युवराजाची मुद्रा म्लान झाली. कुमुद्वतीला ती पाहवेना. सारीकडची संगत सुटलेली आणि कुणाचा तरी आधार शोधत असल्यासारखी ती नजर. . .

कुमुद्वतीने त्या नजरेत आपली नजर ओतली. जणु तिला म्हणायचे होते, "युवराज, असे व्यथित होऊ नका."

तिच्या त्या नजरेतला अभिप्राय त्याने ओळखला असावा. तिच्याजवळ येऊन तो म्हणाला, "कुमुद्वती, बिक्रमाविषयीची

वार्ता ऐकलीस ना !"

"मला ती खरी वाटत नाही, युवराज."

"म्हणजे मित्रानं इथं येऊन गळयाला फास लावीपर्यंत वाट पाहायची का ?"

"असं काय बोलता युवराज ?"

राजपुत्राने तिच्याकडे आर्त नजरेने पाहिलं आणि म्हटले, "कुमुद्वती, तू तरी माझी आहेस ना ?"

कुमुद्वती दचकून उठली. युवराजांना काय म्हणायचे होते ?

"आम्ही आपलेच आहोत, युवराज."

युवराजाने जवळ येऊन तिच्या नेत्रात पाहिले. जणु त्या तिच्या बोलण्यातील अर्थ तो समजून घेऊ पाहत होता.

"मला तू हवी आहेस कुमुद्वती !"

कुमुद्वती पुन: बावरली.

तेवढयात एक प्रचंड कोलाहल त्यांच्या कानावर आला. डोंगराच्या पलीकडून तो आवाज येत होता.

राजपुत्र उठला तशी कुमुद्वतीही उठली आणि म्हणाली, "मीही येते."

डोंगराच्या शिखरावर चढून ते एका वृक्षावर बसले. पाहतात तो मुंग्यांची रांग दिसावी तशी सशस्त्र सैनिकांची रांग डोंगराला वळसा देऊन पुढे आली होती. सैन्याच्या अग्रभागी एक भरजरी वस्त्राचे निशाण डौलाने फडकत होते: जणु कुणाला तरी ते निमंत्रण करीत होते.

तेवढयात पुन: आवाज ऐकू आला, "चंद्रादित्याचा विजय असो."

तो ऐकला आणि कुमुद्वतीकडे वळून म्हटले, "ऐकलास

हा नाद ?"

कुमुद्वतीने गोंधळलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहत विचारले, "हे सैन्य कुणाचं ?"

"ते आहे काशिराजाचं–माझ्या मित्राचं ! ते मला बोलवीत आहेत. मी आता तिकडे जाणार आहे."

क्षणाच्या अवकाशात कुमुद्वतीने सारे ओळखले.

"युवराज !" संभ्रमित स्वरात ती उद्गारली.

वृक्षावरून उतरलेला चंद्रादित्य क्षणभर मागे वळला.

"मला क्षणाचीही उसंत नाही. माझे मित्र मला हाक मारीत आहेत. तू वाटल्यास परत जाऊ शकतेस !"

नौका समुद्रात बुडावी आणि नाकातोंडात पाणी जावे तशी कुमुद्वतीची अवस्था झाली. भयाक्रांत स्वरात ती म्हणाली, "मला असंच सोडून जाणार आहात का युवराज ?"

तिच्याकडे पाहून युवराज प्रथमच प्रसन्नपणे हसला आणि म्हणाला, "तुझी इच्छा असेल तर तुलाही बरोबर घेऊन जायला मी सज्ज आहे."

विद्युल्लतेचा एक मोठा लोळ आला आणि आभाळाचे मडके फुटले. सारीकडे घनगर्जना आणि मागाहून तितकाच जोराचा मुसळधार पाऊस. एका बाजूने कानठळ्या बसतील असा घनघोर आणि कर्कश आवाज तर दुसऱ्या बाजूने गळ्यापर्यंत येऊन भिडलेला पाण्याचा अजस्त्र लोंढा.

बुडाले. . .सारे नगर बुडाले. राजवाडा बुडाला. वरच्या महालात कमरेपर्यंत पाणी आले. पण राणी कोठे आहे ?

"ही मी इथंच आहे, महाराज !"

खोल डोहातून वर यावे तसे प्रतापादित्य निद्रेतून जागे झाले. डोळे चोळत चोळत त्यांनी आजूबाजूला पाहिले.

छेः, जग बुडले नव्हते, नगर बुडले नव्हते. काहीसुद्धा बुडले नव्हते !

राणी सहास्य मुद्रेने विचारीत होती, "महाराज, काय झालं ! असे दचकला का ?"

महाराज प्रतापादित्यांनी निःश्वास टाकला आणि म्हटले, "ओहो, सारं स्वप्नच होतं तर !"

पण ते स्वप्न खरं ठरावं अशी भयानक वार्ता त्याच दिवशी त्यांच्या कानावर पडली.

काशिराजाचे सैन्य राजधानीवर चाल करून येत होते.

पुरातन वैरीच तो ! येऊ दे. कैकवेळा अंगावर चालून आला आणि मार खाऊन गेला. आताही कदाचित तीच पाळी त्याच्यावर येईल.

पण नाही, यावेळचा हल्ला जबर आहे.

काशिराजांच्या ठेवणीतले यावेळचे सर्वात भयंकर अस्त्र !

सामना कठिण तर खराच.

महाराजांचे मन विचार करता करता हतबुद्ध झाले. शरीराचे बळ जणु हरपले. मुखावरील कांति म्लान झाली.

क्षीण झालेल्या चंद्रप्रभेप्रमाणे राजर्षींच्या मुखमंडलावरील ती कांतिहीन चर्या राणीला पाहवली नाही. तिने विचारले, "महाराज, आपली मुद्रा अशी म्लान का ?"

प्रतापादित्य काही बोलले नाहीत. पण एक क्षीण हास्य त्यांच्या मुखावर उमटले.

राणीनं म्हटले, "कधी नव्हे ते हसायला काय झालं ?"

"माझ्या दैवाला हसतो आहे."

"दैवाच्या मनात काय असेल ते होईल. पण माणसानं धीर सोडून कसं चालेल ?"

"नाही. देवी, मी दैवाला हसतो आहे ते वेगळ्या अर्थाने. तुम्हाला विदितच आहे. पुत्रमुख पाहण्यासाठी आपण दोघंही किती अधीर झालो होतो. पुत्र कसाही असला तरी चालेल पण तो हवा म्हणून आपण दैवाला कौल लावीत होतो. दैवानं पुत्र-मुख पाहायला दिलं, पण –"

महाराजांच्या ओठातले शब्द तसेच अपुरे राहिले. त्यांना आठवले ते कितीतरी वर्षापूर्वीचे त्या योगिराजाचे उद्‌गार...

"पुत्रमुख पाहायला मिळेल, पण पुत्रसुख नाही !"

राणीचेही मुख महाराजांच्या त्या शब्दांनी कोमेजून गेले. काय बोलावे हे राणीला सुचेना. युवराज चंद्रादित्याच्या अलीकडील वर्तनामुळे महाराज त्याच्यावर असंतुष्ट होते हे त्यांना माहित होते. युवराजांची दर दिवसाची वागणूक उच्छृंखल होत चालली होती आणि मातेची माया त्याला आवर घालण्यास अपुरी ठरत होती. युवराज आपल्याबरोबर कोणते नवे संकट आणतील हे सांगणे कठिण झाले होते. आताही महाराजांच्या तुटक बोलण्यावरून त्यांना तीच भीति वाटली.

त्यांनी विचारले, "राज्यावर काही संकट आलं आहे का ?"

"राज्यावर संकटं नेहमीच येतात. पण येतात तशीच जातातही."

राजर्षींच्या दांडग्या पौरुषाचे आणि अप्रतिम धैर्याचे दर्शक असे ते उद्‌गार राणीच्या मनाला नेहमीच धीर देत.

त्या म्हणाल्या, "हे खरं ना ! मग स्वारीला एवढी भीति कसली ? काशीराजांनी आजवर थोडथोडके का हल्ले केले, पण ते सारे आपण परतवून लावलेच ना !"

राणी उत्साहाने बोलत होती. तिच्या मुद्रेकडे पाहत महाराज म्हणाले, "होय. वेढे परतवून लावले हे खरं."

"मग महाराज असे उद्विग्न का ?"

"काय सांगू देवी ! यावेळचं संकट अगदी वेगळं आहे. यावेळी काशीचे राजे एकटेच चाल करून येत नाहीत तर त्यांच्याबरोबर एक नवा शत्रु येत आहे."

"अगबाई ! हा कोण आणखी नवा शत्रु–"

"तो आहे युवराज चंद्रादित्य."

ते शब्द ऐकले आणि राणीचे अवसान गळाले.

हाय रे दैवा ! प्रत्यक्ष पुत्रच पित्याचा वैरी बनून समरांगणावर ठाकला आहे !

पण तसा विचार करता करता त्यांना एकदम कसलीशी आठवण झाल्याप्रमाणे त्यांची चर्या काहीशी उजळली.

महाराजाकडे वळून त्या म्हणाल्या, "विक्रमाला बोलावून घ्यावं. तो काहीतरी योग्य सल्ला सुचवील."

क्षीण हास्य करीत महाराजांनी त्यांच्याकडे पाहिले आणि म्हटले, "मीही तोच विचार करीत आहे."

"आपल्या गुप्त हेरांनी एक वार्ता आणली आहे, विक्रम."

"कोणती वार्ता ?"

"मोठी अद्‌भुत वार्ता आहे. आजवरच्या साऱ्या वार्तांवर कडी करणारी."

"महाराजांना कोणतीच गोष्ट आजवर अद्‌भुत वाटली नाही. पण आज ज्या अर्थी स्वतःच्या मुखानं ती अद्‌भुत म्हणत आहांत त्या अर्थी ती तशीच असणार."

"काशिराज युवराज चंद्रादित्याला घेऊन येत आहेत."

"म्हणजे ? रुसून गेलेले युवराज काशिराजाचं बोट धरून येत आहेत !"

"नाही. काशीचे राजे येत आहेत ते लढायला आणि त्यांच्याबरोबर आमचे युवराज आमच्याविरुद्ध उभे आहेत."

"महाराजांनी क्षमा करावी. पण युवराज महाराजांच्या विरुद्ध उभे राहतील असं मला वाटत नाही. आपली गेलेली पत सावरण्याचा युवराजांचा हा प्रयत्न दिसतो. युवराज थोडेसे तामसी आणि चिडखोर आहेत. मनाला आवर घालणं त्यांना कधी शक्य झालेलं नाही. उलट मनात येईल ते करण्याचा त्यांचा स्वभाव आहे."

"आणि अशा स्वभावाला औषध नाही."

"नाही महाराज. स्वभावालाही औषध आहे. तसं नसतं तर माणसाला जगायला आशाच उरली नसती."

"युवराजांचा स्वभाव कधीतरी बदलेल अशी तुझी अपेक्षा दिसते. असो. सांप्रत युद्धाचा विचार आपल्याला कर्तव्य आहे. हे युद्ध मागल्या युद्धाप्रमाणं सोपं नाही."

"महाराजांचं हे म्हणणं खरं आहे. प्रस्तुतचं युद्ध काशि-राजांच्या विरुद्ध नाही. ते युवराजांच्या विरुद्ध आहे."

महाराजांच्या चर्येवर हास्याची छटा उमटली. ते म्हणाले, "तुझं म्हणणं योग्य आहे. प्रश्न आहे तो असा की हे युद्ध कसं लढायचं ?"

"हे युद्ध लढायचं नाहीच!"

"म्हणतोस तरी काय विक्रम! शत्रु राजधानीस वेढा देणार आणि अवंतीचे सैन्य नुसते माशा मारीत बसणार?"

"तसं नाही महाराज. पण या युद्धाची व्यूहरचना काहीशी वेगळी करावी लागेल. हा सामना शस्त्रांचा नसून बुद्धीचा आहे आणि तो आपल्याला जिंकायलाच हवा."

"विक्रम, तुझी भाषा मोठी अद्भुत आहे! पण तुझं म्हणणं मला नीटसं उमगलं नाही. काशीराज आपल्या नगरीला वेढा देणार, प्रत्यक्ष युवराजांच्या हातात शस्त्र देऊन त्यांना आपल्या विरुद्ध लढायला लावणार आणि अवंतीचा सैनिक मात्र ते दृश्य नुसतं पाहत राहणार?"

"होय महाराज. गोष्ट थोडीशी तशीच आहे. युवराजांना समोर पाहिलं की अवंतीचा सैनिक सामना करायला थोडातरी मागंपुढं पाहणारच युवराज कितीही चंचल असले तरी ते युवराज आहेत; उद्याचे राजे आहेत आणि भविष्यकाळात का होईना होऊ पाहणाऱ्या या राजाविरुद्ध शस्त्र उपसायला कोणताही राजनिष्ठ सैनिक कचरल्याशिवाय राहणार नाही."

"तुझं म्हणणं काहीसं विचार करण्यासारखं आहे."

"होय महाराज. ते एक क्रूर सत्य आहे. आपले आदेशही प्रसंगी अमान्य करून सैनिक शस्त्र खाली न ठेवोत."

"तसं झालं तर खरोखर मोठाच अनर्थ होईल."

"आणि नेमकी हीच गोष्ट काशिराजाला साधायची आहे. आपणच सांगता की काशिराजाचं सैन्य आपल्यापुढे नेहमी हरलं आहे. त्या सैन्याचं बळही संख्येच्या दृष्टीने फारसं मोठं नाही आणि तरीहि ते सैन्य आपल्या सैनिकांच्या शस्त्राची धार बोथट

करण्यास पुरेसे समर्थ आहे."

महाराज प्रतापादित्य काही न बोलता स्तब्ध राहिले.

"पण महाराजांच्या आशीर्वादानं हेही संकट आम्ही तरून जाऊ असा मला विश्वास वाटतो."

विक्रमाच्या चर्येवर उत्साह आणि धैर्य यांचा एक अपूर्व संगम दाटून आला.

त्याकडे पाहता पाहता महाराजांची मुद्रा काहीशी उत्तेजित झाली.

"तुझा उत्साह अपूर्व दिसतो ठीक आहे. या युद्धाचा सर्वस्वी भार मी तुझ्यावर सोपवतो. सेनापति विष्वक्सेनांना तसं मी सांगतो."

विक्रमाने उत्तरादाखल मान हलवली.

"अमात्यपुत्र शीलभद्राला मात्र हे युद्ध खेळण्याची अनावर इच्छा दिसते. त्याला तू नीट समजावून सांग आणि उभयता मिळून युद्धाची योजना ठरवा."

विक्रमाने पुन: एकदा मान डोलावली.

अमात्यपुत्र शीलभद्र विक्रमाच्याजवळ येऊन उभा राहिला. त्याच्याकडे पाहून विक्रमाने विचारले, "मित्रा, काय वार्ता आहे?"

"राजवाड्याबाहेर टेहळणी करताना एका माणसाला पकडलं आहे. तो स्वत:ला भिल्लराज म्हणवतो."

"घेऊन ये त्याला."

हातापायात साखळदंड घातलेला तो बंदी पुढे आला. त्याच्याबरोबर दोन राजसेवक होते. त्यांना उद्देशून विक्रम म्हणाला,

"याच्या हातापायातील बेड्या काढा आणि तुम्ही जा."

शीलभद्राकडे वळून त्याने म्हटले, "अमात्यपुत्र, तुम्ही इथंच राहा."

नंतर पुढे उभ्या राहिलेल्या त्या भिल्लाकडे त्याने सस्मित नजरेने पाहिले आणि म्हटले, "कुवलय, तू इथं कसा ?"

कुवलय काहीच बोलला नाही.

"युवराजांची भेट तुला हवी होती का ?"

"मला युवराजांशी काय कर्तव्य आहे !" तो मान वर करून तीव्र स्वरात म्हणाला, "मला हवी आहे कुमुद्वती "

"ती राजधानीत नाही. पण कुठं असेल ते मात्र मी तुला निश्चितपणं सांगू शकतो."

"तेवढ्यासाठीच मी इथवर आलो. कुमुद्वती कुठंही असली तरी मी तिला घेऊन येईन."

विक्रमाच्या चर्येवर काहीशी कौतुकाची छटा दिसली. तो म्हणाला, "तुझं भगिनीप्रेम अपूर्व दिसते. पण तेवढं बळ तिला सोडवून आणण्यास पुरेसं पडणारं नाही "

"मी तिला वाटेल ते करून सोडवून आणीन."

"ती काशिराजाच्या बंदीत असली तरी ? "

विक्रम संथपणे बोलता बोलता थांबला आणि कुवलयाच्या चर्येकडे पाहत राहिला त्याची चर्या काहीशी गोंधळल्यागत दिसत होती.

"कुवलय, माझ्यावर विश्वास ठेव. कुमुद्वतीला सोडवून आणणं हे मी माझंही कर्तव्य समजतो. मी तुझ्याबरोबर आलो असतो, पण सध्या माझे हात गुंतलेले आहेत. मला राजधानी सोडून जाता येत नाही पण तू मला साह्य करशील तर बसल्या

जागी मी कुमुद्वतीला सोडवून आणू शकेनही."

पाहतापाहता कुवलयाची चर्या पालटली त्याच्या चर्येवरील उग्र छटा कोठल्याकोठे मावळली आणि एकप्रकारची मृदुता तेथे दिसू लागली. विक्रमाच्या पायाशी वाकून तो म्हणाला, "तसं करशील तर मी तुझा फार ऋणी होईन. तू म्हणशील ते साह्य तुला करीन."

"ऊठ, कुवलय," त्याला उठवीत विक्रम म्हणाला, "तू कुमुद्वतीचा खरा बंधु शोभतोस! कुमुद्वतीनं युवराजाविषयीच्या प्रेमानं हे संकट आपल्यावर ओढवून घेतलं आहेसं दिसतं. म्हणून तिची सुटका करणं हे माझंही काम आहे."

"माझा तुझ्यावर विश्वास आहे," कुवलय म्हणाला.

"मित्रा कुवलया, आपलं दोघाचंही ध्येय एकच आहे. युवराजांच्या सुटकेवरच कुमुद्वतीची सुटका अवलंबून आहे एवढं लक्षात घे."

"मी वचन देतो की युवराजांची सुटका करण्यास मी तुला हवं ते साह्य करीन."

# ११

काशिराजाचे सैन्य अवंतीच्या राजधानीला आले ते एखाद्या क्षुब्ध महासागराप्रमाणे गर्जना करीत पण तटावर उभ्या असलेल्या सैनिकांनी हातात धनुष्य असूनही त्याच्यावर आपल्या बाणांचा वर्षाव मात्र केला नाही; एकाही धनुष्यातून बाण सुटला नाही हे केवढे आश्चर्य !

त्याहून आश्चर्यकारक वार्ता त्यांना पुढील दीड-दोन दिवसात ऐकायला मिळाल्या.

अमात्यपुत्र शीलभद्र आणि सेनापतिपुत्र वीरभद्र हा लढा लढण्यास सज्ज नव्हते. आपल्या युवराजांविरुद्ध लढा देण्याची भाषाच त्यांना मान्य नव्हती.

अवंतीच्या सैन्यातही अशीच दुफळी पडली होती आणि बहुधा म्हणूनच तटावरचे धनुर्धारी पुरुष बाण सोडण्याऐवजी स्वस्थ उभे होते. जणु युवराजांच्या स्वागतार्थ उभे असलेले पाषाणपुतळेच !

तिसऱ्या दिवशी तर एक अद्‌भुत चमत्कारच घडला.

काशिराज आपल्या शिबिरात उच्चासनावर बसले होते. त्यांच्या शेजारच्या आसनावर युवराज चंद्रादित्य होते. अमात्य युद्धाविषयीची आपली योजना सांगत होते तोच सरसर करीत एक बाण चंद्रादित्याच्या कानापाशी आला. बाणाला जोडून एक भूर्जपत्र होते. चंद्रादित्याने ते उचलून काशिराजाजवळ दिले.

"आपणच ते पाहा," काशिराज म्हणाले.

युवराजांनी पत्र उलगडले. त्यावर लिहिले होते –

"युवराज चंद्रादित्यास प्रणाम. आम्ही आपलेच आहोत."

ते वाचून युवराज काहीसे स्तम्भित झाल्यासारखे दिसले. काशिराजांनी विचारले, "काय प्रकार आहे ?"

त्यांच्या हातात पत्र देत युवराज म्हणाले, "काही कळत नाही. हे अक्षर मात्र अमात्यपुत्र शीलभद्राचं आहे."

पत्रातल्या अक्षरांकडे पाहत काशिराज संतुष्ट झालेले दिसले. ते म्हणाले, "मला तर वाटतं हा आपल्याला शुभशकुनच आहे."

तेवढ्यात जोराने शंखनाद झाला आणि पाठोपाठ आवाज आला, "महाराज चंद्रादित्यांचा जयजयकार असो."

पाहतापाहता हजार दीड-हजार सैनिकांचे एक पथक काशिराजांच्या सैन्यात प्रवेश करू लागले.

काशिराजाच्या सैन्यरक्षकांनी प्रथम त्यांना प्रतिबंध केला तेव्हा अमात्यपुत्र शीलभद्र पुढे आले आणि म्हणाले, "माझी युवराजांशी भेट करून द्या."

ते ऐकताच युवराज चंद्रादित्य आपल्या आसनावरून उठला आणि त्वरेने सैन्यापाशी गेला.

अमात्यपुत्र शीलभद्राने त्याला पाहताच पायाशी मिठी मारली आणि म्हटले, "महाराज, आम्ही आपली सेवा करायला आलो आहोत. सेवेची अनुज्ञा असावी."

तेवढ्यात काशिराज तेथे येऊन दाखल झाले होते. त्यांच्याकडे वळून युवराजाने म्हटले, "हे आमचे मित्र – काशिराज."

काशिराजांना नम्रपणे अभिवादन करीत शीलभद्र म्हणाला,

"महाराज चंद्रादित्यांच्या सल्ल्याने आपली योग्य ती सेवा सेवा करण्यास आमची सेना सन्निध आली आहे. तिला अनुज्ञा असावी."

त्याच्या अभिवादनाचा स्वीकार करीत काशिराज मान तुकवून म्हणाले, "तुम्ही युवराजांच्या सेवेसाठी आला हे ऐकून आम्हाला आनंद झाला. युवराजांची पाठराखण करण्यासाठी तुमच्यासारख्या मित्रांनी यावं हीच आमची अपेक्षा होती."

काशिराजांचे हे वाक्य कोणत्या मुहूर्तावर उच्चारले गेले होते कोण जाणे ! नियतीने मात्र ते दोन्ही हातांनी जणू झेलून धरले.

प्रहरा दीडप्रहराच्या अंतराने पुनः शंखाचे निनाद अंतराळात उमटू लागले. युवराजांना वार्ता आली, "सामंतपुत्र बलभद्र आपल्या भेटीस येत आहेत."

युवराज चंद्रादित्यांच्या नावाचा जयजयकार करीत टोळ्याटोळ्यांनी पथके जमा होऊ लागली–आणि चंद्रादित्याच्या शिबिराजवळचा सारा आसमंत त्यांनी व्यापून टाकला.

सर्वांत शेवटी आला भिल्लराज कुवलय–आणि विक्रमाचा वडील बंधु सेनापतिपुत्र वीरभद्र.

रात्रभर जयजयकार चालला होता, "युवराज चंद्रादित्याचा जयजयकार असो."

"युवराजांना प्रणाम असो."

तो प्रणाम स्वीकारीत चंद्रादित्याने म्हटले, "कुवलय, गेले दोन दिवस कुठं दिसला नाहीस ?"

कुवलयाची चर्या म्लान दिसली. ओठ फुरफुरल्यागत वाटले.

"काही बोलायचं आहे ?"

"काय बोलायचं, युवराज ? आम्हाला वाटलं होतं, आम्ही युवराजांचे सेवक. त्यांची सेवा करण्यात देहाचं सार्थक होईल. पण आमचा भ्रम मिटला."

आश्चर्यचकित नजरेने त्याच्याकडे पाहत चंद्रादित्याने विचारले, "असं दीन होण्यासारखं झालं तरी काय ?"

"चुकीची क्षमा असावी. युवराजांना वाईट वाटेल ते बोलण्यास जीभ धजत नाही."

युवराज स्तब्ध बसला.

काही वेळाने मान वर करून कुवलयाने म्हटले, "युवराज, एक गोष्ट विचारावीशी वाटते."

"अगदी अवश्य विचारा."

"रागावणार तर नाही ना !"

"मुळीच नाही. तुमच्यासारख्या निष्ठावंत सेवकावर आम्ही रागावूच शकत नाही. सांगा तुमचा प्रश्न."

"प्रश्न असा पडला आहे की – "

पुन: कुवलय अडखळला. नुसताच युवराजाकडे पाहत राहिला.

"बोल ना ! थांबलास का ?"

"प्रश्न असा की – आम्ही सेवक कुणाचे ?"

युवराजांची भृकुटि वक्र झाली. ते म्हणाले, "कुणाचे-म्हणजे ?"

"आम्ही समजत होतो की आम्ही युवराजांचे सेवक. वाटेल त्याचे शब्द आम्ही ऐकून घेणार नाही आणि युवराजाविरुद्ध तर

कधीच ऐकणार नाही."

"अरे, पण असं झालं आहे तरी काय ?"

एखाद्या दूरच्या माणसाकडे रोखून पहावे तशी कुठेतरी नजर वळवीत कुवलय म्हणाला, "हा दीडदमडीचा माणूस एवढी गुर्मी कशासाठी दाखवीत आहे ? त्याला काय वाटतं की आम्ही त्याची थुंकी झेलण्यासाठी इथं आलो आहोत !"

"कुणाबद्दल बोलतोस तू हे ?"

एक सुस्कारा टाकत कुवलय म्हणाला, "आमचंच नशीब खोटं. आम्ही आलों युद्धासाठी. पण ते युवराजांच्या हाताखाली आम्ही लढणार. इतरांच्या आज्ञा आम्ही जुमानणार नाही. आणि युवराजांचा कुणी अधिक्षेप केला तर तो मुळीच सहन करणार नाही."

"असं कुणी बोललं ?"

"होय. बोलू नये ते बोललं. पण ते सांगायला आमची जीभ धजत नाही."

"तुमची कुरकूर कुणाविरुद्ध आहे ?"

कुवलय पुन: भडकून उठला आणि म्हणाला, "युवराज, तुम्ही इथं या राजांच्या सेवेसाठी का आला आहात ? काय म्हणून या राजाच्या माणसांनी तुमचा असा उपमर्द करावा !

"उपमर्द तो कोणता ?"

"उपमर्दच नाही तर काय ? मला म्हणतो, तुमचे युवराज लढायला आले आहेत की विलास करायला ? उभ्या सैन्यात स्त्रीचे नावनिशाण नाही पण तुमच्या युवराजांचे मात्र त्या-शिवाय जणु पान हलत नाही आणि हे सारे एका दीडदमडीच्या स्त्रीसाठी !"

ते शब्द ऐकले आणि युवराजांची चर्या संतप्त झाली.

"कुवलय," काहीशा क्षुब्ध स्वरात तो म्हणाला, "मी हे शब्द ऐकून घेणार नाही. तुझ्या तोंडूनसुद्धा नाही. कुमुद्वती भिल्लपुत्री असेल पण ती माझी पत्नी आहे. उद्याच्या अवंतीची ती महाराणी आहे !"

कुवलयाची चर्या आश्चर्याने उजळून निघाली. तो म्हणाला, "आपण हे कुमुद्वतीला सांगितलं ?"

"होय," कांहीशा खालच्या सुरात चंद्रादित्य म्हणाला.

"बिचारी कुमुद्वती !"

"असं तू का म्हणतोस ?"

"यामुळं आपणावर येणारं संकट तिला जाणवलं नाही."

"कसलं संकट ?"

"दुसरं कसलं ? स्पर्धेचं, मत्सराचं."

"इथं तिच्याबद्दल कुणाला मत्सर वाटण्याचं कारणच काय ?"

"ते आपल्याला नाही समजायचं युवराज !"

"नीट समजावून तर सांगशील ?"

"युवराज, काशिराजांच्या कन्येचं पाणिग्रहण करण्याची ज्यांची योग्यता त्यांनी एका यःकश्चित भिल्लपुत्रीला युवराज्ञी-पदावर बसवावं हे कुणाला कसं खपेल ?"

"पण कुमुद्वतीला सध्या तर धोका नाही ना !"

"धोका ? तो केव्हाच होऊन चुकला ! कुमुद्वती आज तुमच्या दर्शनास आली होती काय ?"

"म्हणतोस काय कुवलय ?"

कुवलयाने मान खाली घातली आणि तो जमिनीकडे

न्याहाळत राहिला.

"तुला हे केव्हा माहित झालं ?"

कुवलयाने नुसतीच मान हालवली.

"मला वाटतं यासंबंधी काशिराजाकडे पृच्छा केली पाहिजे."

"काही नको. पुन: तेच शब्द ऐकून घ्यायचे आहेत का ?"

"कसले शब्द ?"

"अमात्यांचे शब्द. मी त्यांना कुमुद्वतीचा शोध घेण्यास विनंति केली तेव्हा ते म्हणाले, ती जशी स्वेच्छेने आली तशीच स्वेच्छेने गेली. त्याला आम्ही काय करणार ?"

"ती स्वेच्छेने माझ्या मागोमाग आली हे खरं आहे. तिने माझ्या सेवेचा भार स्वेच्छेने आपल्या अंगावर घेतला. पण मला सोडून स्वेच्छेने निघून जाणारी ती नव्हे ! अमात्यांना हे तुम्ही समजावून सांगायला हवं."

"अमात्यांना पुन:पुन: सांगितलं. पण ते म्हणाले युद्धाच्या धामधुमीत शोध घ्यायला आम्हाला सवड नाही. आपल्याला वाटल्यास आपण तो करावा."

"मग तू काय योजना केली आहेस ?"

"चिंता करू नका. युवराज, मी तिचा शोध घ्यायला आजूबाजूला सेवक पाठविले आहेत."

"योग्य केलेस. शोध लागला की मला शीघ्रातिशीघ्र कळव."

"युवराजांची आज्ञा मान्य आहे."

निघतानिघता कुवलय थांबला आणि हात जोडून म्हणाला, "युवराजांनी माझ्या बोलण्याची क्षमा करावी. कुमुद्वतीविषयीच्या काळजीमुळंच मी तसं बोललो."

"मी ते जाणून आहे. तुमच्यासारख्या निष्ठावंत सेवकांवर मी राग धरूच शकत नाही."

सद्गदित स्वरात कुवलय म्हणाला, "युवराजांचे वचन ऐकून कृतार्थ झालो. स्वामींचा विश्वास हेच आम्हा सेवकांचं घन आहे."

सायंकाळचा अंधार हळूहळू रात्रीत विलीन होत होता. युवराज चंद्रादित्य एकटाच आपल्या शिबिरात उद्विग्न मनाने कुणाची तरी वाट पाहत होता.

तेवढ्यात सामंतपुत्र बलभद्र क्रुद्ध मुद्रा करून त्याच्यापुढे उभा राहिला आणि म्हणाला, "युवराज, हे लोक आपले मित्र आहेत की शत्रू ?"

"बलभद्र, तू असा क्षुब्ध का ?"

"क्षुब्ध न होऊन कसं चालेल, युवराज. आपल्यासाठीच आमचा जीव तगमगतो. युवराज इथं आले ते काशिराजांचे स्नेही म्हणून. पण इथं पाहावं तो पदोपदी त्यांची मानखंडना होत आहे आणि आम्ही निमूटपणे पाहात आहोत. कां तर, काशिराज पडले आमचे मित्र !"

"होय. काशिराज आमचे मित्र आहेतच."

"तसं आपण समजू शकता. मी मात्र त्या भ्रमात राहू इच्छित नाही."

"इतकं क्षुब्ध व्हायला काय झालं ?"

"युवराजांच्या कानापर्यंत अद्याप ती वार्ता येऊन पोचलेली दिसत नाही."

"कसली वार्ता ?"

"वार्ता देवी कुमुद्वतींची ! युवराज, देवी कुठं आहेत ?"

"कुमुद्वती इथं नाही हे खरं आहे" चंद्रादित्याने चाचरत म्हटले, "पण मी कुवलयाला तिचा शोध घ्यायला सांगितलं आहे."

"तो शोध केव्हाच लागला, युवराज ! देवी कुमुद्वती आता परलोकाच्या दारापर्यंत जाऊन पोचलीही असेल."

"म्हणतोस काय, बलभद्र, कुमुद्वती मेली ?"

"मेली कसली, मारली ?"

"कुमुद्वतीला मारलं ?"

"होय महाराज, तिचे प्रेत अमात्यांच्या शिबिराजवळ कोल्ह्याकुत्र्यांना 'भक्ष्य' म्हणून पडलं होतं. आम्हाला राहवेना. म्हणून आम्ही तिचा अग्निसंस्कार करून आताच आलो. ही आहे आमच्या कुमुद्वतीची गत. तिचा अपराध एकच. युवराजांची सेवा हेच तिने एकमेव व्रत मानलं आणि शेवटपर्यंत निभावलं."

"कुवलय कुठं आहे ?"

"हा मी इथंच आहे, युवराज." खिन्नपणे मान खाली घालून कुवलय आत आला. त्याच्या नेत्रातून पाणी झरत होते.

चंद्रादित्याचे मस्तक भणाणून गेले. दोन्ही हातांनी ते गच्च दाबून धरीत तो नुसताच उभा राहिला.

तेवढ्यात सेनापतिपुत्र वीरभद्र तेथे आला.

"युवराज, आमचं सैन्य काशिराजांना साह्य करायला तयार नाही. आम्ही निघालो."

"हे काय, सेनापतिपुत्र. मी तुमच्यावर भार ठेवून आहे. असं रागावून कसं चालेल ?"

"भलत्यांची दुरुत्तरं ऐकायला आम्ही आलेलो नाही. आम्ही स्वतःच अवंती सर करायला तयार आहोत. युवराजांनी

फक्त सैन्याच्या अग्रभागी राहावं की आम्ही निघालोच.''

"वीरभद्र, असे हातघाईवर येऊ नका. थोडा धीर धरा."

"युवराजांना असं दीनवाणं बोलताना पाहून आम्हाला वाईट वाटतं. असा एकाएकी धीर सोडायला काय झालं ?"

कुवलय पुढे आला आणि वीरभद्राचा हात धरून त्याला त्याने एकीकडे नेले.

गुणभद्र आणि शीलभद्र याच संधीस तेथे येऊन पोचले. गुणभद्राने नम्रपणे युवराजांना अभिवादन केले आणि म्हटले, "युवराज, काशिराजांच्या बरोबरीनं माझी सेना लढायला तयार नाही.''

"असं काय करता, गुणभद्र. आपण ज्या कार्यासाठी आलो–''

"ते कार्य करायला आम्ही सज्ज आहोत. युवराजांनी आमची परीक्षा पाहावी."

शीलभद्र एका बाजूला स्तब्ध उभा होता. त्याच्याकडे वळून युवराजांनी म्हटले, "तुम्ही असे स्तब्ध का शीलभद्र ! तुम्हाला काय म्हणायचं आहे ?"

"युवराज, जरा इकडे या. एक वेगळीच वार्ता आपल्या-साठी मी घेऊन आलो आहे."

त्याला एका बाजूला नेत शीलभद्राने म्हटले, "आपणाला माझे प्रयत्न कोणत्या दिशेनं चालले आहेत ते विदितच आहे. त्या प्रयत्नांना सफलता मिळण्याची वेळ आलेली दिसते. पण त्यासाठी आपण त्वरा करायला हवी.''

"पुढे बोला. मी ऐकतो आहे."

"राजधानीतले सैनिक विक्रमाच्या विरुद्ध बंड करायला निघाले आहेत. फक्त एक ठिणगी उडण्याचा अवकाश. आजच

तटाचे दरवाजे फोडून कदाचित ते बाहेर येतील. पण त्यांनी येऊन पोचण्यापूर्वीच आपण आपल्या सैन्याच्या साह्यानं राजधानी सर करावी हे बरं. आपण फक्त तशी आज्ञा करावी."

अर्ध्या प्रहराच्या आत चंद्रादित्याच्या शिबिरात जमलेल्या मित्रमंडळाने एक वेगळीच योजना ठरविली.

अवंतीच्या सैन्याचे एकेक पथक सज्ज झाले आणि राजधानीच्या दिशेने चालू लागले.

काशिराजांच्या सैन्यातून ते असे वेगळे पडले की जणु बांध फोडून बाहेर पडलेला अजस्त्र पाण्याचा लोंढाच !

तटापाशी ते जाऊन पोचतात तोच तटाचा मोठा दरवाजा उघडला गेला आणि चंद्रादित्याचे सैन्य आत शिरले. कुवलयाचे पथक समोर होते. गुणभद्र-बलभद्राने मधली जागा व्यापली होती. युवराज चंद्रादित्य अश्वावर बसून अमात्यपुत्र शीलभद्राच्या बरोबर मिरवत येत होता. सर्वात शेवटी होता विक्रमाचा बंधु वीरभद्र.

युवराज चंद्रादित्यांना पाहताच आतल्या सैन्याने गर्जना केली, "युवराज चंद्रादित्याचा जयजयकार असो."

त्याच्याच पाठोपाठ दुसरी गर्जना गगनाला भेदून बाहेर पडली, "विक्रमादित्याचा विजय असो."

युवराजाने पाहिले तो काय, अश्वारूढ विक्रम सामोरा येत होता. चंद्रादित्याला पाहताच त्याने अश्वावरून उतरून प्रणाम केला आणि म्हटले, "युवराजांची अनुज्ञा असावी."

चंद्रादित्याने मान हलविण्याच्या आतच विक्रम पुन: अश्वावर आरूढ झाला.

आणि हे काय ?

पाहतापांहता ते सारेच सैन्य पुन: दरवाजाच्या दिशेने वळले आणि तटाच्या बाहेर चालू लागले.

युवराज चंद्रादित्य आश्चर्यचकित मुद्रेने पाहतच राहिला.

त्याच क्षणी पुन: एकदा त्याच्या कर्णपथावर शब्द आले.

"सेनापति विक्रमादित्याचा विजय असो !"

त्या रात्री तारकांच्या लुकलुकत्या प्रकाशात विक्रमाचे खड्ग विजेसारखे तळपत राहिले. जणु वीरश्रीच्या मुखावरचे तेजच त्या खड्गाच्या धारेवर उमटून आले होते.

अवंतीच्या परतलेल्या पथकांनी काशिराजाच्या सैन्याला पुरता वेढा दिला. शत्रु कोण आणि मित्र कोण हे कळायला वाव उरला नाही. चंद्रादित्याचा जयजयकार करीत अवंतीचे सैनिक त्या परक्या सैन्याच्या दलात एखाद्या शतघ्नीसारखे जाऊन पडले. काशिराजाला काही कळण्याच्या आतच हाणामारीला सुरवात झाली. सहस्रावधि शिरकमले रणभूमीवर पडली. कितीतरी कवचे विछिन्न झाली. शिबिराचे तंबू फाटले. हत्ती साखळदंड सोडून अस्ताव्यस्त सुटले. 'कुठे आहे देवी कुमुद्वती' 'कुठे आहे तो काशिराज' अशा गर्जना प्रक्षुब्ध लाटेसारख्या उफाळत राहिल्या.

बिचारे काशिराज तो देखावा पाहून भयचकित झाले आणि अश्वारूढ होऊन दिसेनासे झाले.

मग शिराविरहित धड राहावे तशी त्या सैन्याची अवस्था झाली. विस्कळित झालेले ते सैन्य शेतातल्या कणसाप्रमाणे कापले जाऊ लागले. एकां बाजूने वीरांच्या गर्जना तर दुसरीकडे 'पळा' 'धावा' अशा हाका ऐकू येऊ लागल्या.

# १२

काशिराजाच्या सैन्यास पळवून लावण्यात पुढाकार घेतलेला विक्रम आता सैन्यानिशी तटाकडे परत येत होता.

तोच पुन: एकदा सैन्याने घोषणा केली,

'सेनापति विक्रमादित्याचा विजय असो.'

ते ऐकले आणि अमात्यपुत्र शीलभद्र म्हणाला, "ऐकलंस ना मित्रा, अवंतीच्या सैनिकांनी स्वयंस्फूर्तीने दिलेली ही पदवी. आदित्यवंशाच्या राजांशी निष्ठावंत असलेल्यांनाच ही लाभत असते. महाराजांना ही निश्चितच आवडेल."

विक्रमाला बालपणातले महाराजांचे शब्द आठवले. 'राजे विक्रमादित्य !'

होय, महाराजांना निश्चितच मान्य होईल. पित्याप्रमाणे वत्सलतेचा वर्षाव करणारे महाराज त्याच्या सुदैवाने त्याला लाभले होते. त्याच्या कर्तृत्वाला योग्य तो अवसर त्यांनीच मिळवून दिला होता. त्यांची ती नजर म्हणजे संतप्तालाही निववणारी आणि प्रेमळांना सदैव हवीहवीशी वाटणारी वात्सल्याची जणु पाणपोईच...

पण त्याचक्षणी त्याला आठवली चंद्रादित्याची नजर. नगरद्वाराशी आपल्याकडे असूयेने पाहणारी काहीशी विषाक्त नजर ती आठवून तो म्हणाला, "पण नेमकी हीच गोष्ट काही लोकांना रुचणार नाही."

"त्याला फारसा अर्थ नाही. ते संकट आता संपलं आहे. तुझ्या यशाने त्या संकटाचा पुरता निकाल लागला आहे."

"नाही, शीलभद्र. युद्ध संपलं तरी तेवढ्याने संकट संपलं नाही. पितापुत्रातील द्वैत एवढ्याने मिटेल असं मला वाटत नाही. उलट या गृहकलहाच्या वातावरणात यापुढं काय काय भस्मसात होईल याचा नेम नाही."

"मित्रा, तू आज असा उद्‌विग्न का ? या विजयाने तर तू उलट संतुष्ट व्हायला हवं."

"मी फारसा संतुष्ट नाही याचं कारण उद्याचं भविष्य मला स्पष्ट दिसत आहे. आदित्यवंशातील गृहकलह यापुढे केव्हा पेट घेईल आणि कुणाकुणाची त्यात आहुति पडेल हेच मला कळत नाही. कदाचित् यापुढची पहिली आहुति माझीच असणार !"

"असं भलतंच बोलू नकोस, मित्रा"

"तुला माहित नाही शीलभद्र, मी युवराजांना नकोसा झालो आहे. आजच्या माझ्या विजयाचे दुंदुभी त्यांच्या मनातल्या मत्सराला प्रज्वलित करणारे ठरतील. परक्यांच्या सैन्यावर मात करणारा आजचा विजय आपणाला फार महाग पडणार आहे."

"त्याला आपण काय करणार ?" काहीशा हताश स्वरात शीलभद्र म्हणाला.

"माझ्या हातून जे होण्यासारखे आहे ते मी करीन. उद्याच्या राजकारणात माझी आहुति पडणारच असली तर ती आजच स्वेच्छेने मी का पत्करू नये ? त्यामुळे कदाचित तुमच्यासारख्या राजनिष्ठ वीरांच्या आहुती तरी टळतील."

"मित्रा विक्रमा, तुझा हा विचार उदात्त पण तितकाच भयंकर आहे. असा जिवावर उठल्यासारखा करू नकोस. मित्रा,

आमची निष्ठा आदित्यवंशाला वाहिली असली तरी आम्हाला तुझं नेतृत्व हवं आहे. तुझ्या आधिपत्याखाली आमची सेना वाटेल ते साहस करायला सज्ज आहे. हा आततायी विचार मनातून काढून टाक."

"हा विचार तुला वाटतो तितका आततायीपणाचा खचित नाही. माझ्या बुद्धीच्या प्रकाशात हे राज्य तगविण्याचा मी शोधून काढलेला तो एकमेव उपाय आहे. मित्रा, मी जगाला कंटाळलेलो नाही. पण हातात खड्‌ग असावे आणि ते चालवायला संधि नसावी ही गोष्ट अतिशय क्लेशकारक आहे. तुमची आमची साऱ्यांची निष्ठा एका माणसाच्या आततायीपणाखाली चिरडून जाणार आहे."

"विक्रम, तू हे काय बोलत आहेस ? हे बोलणं तुला शोभत नाही. युवराज चंद्रादित्य आततायी असेल पण तो आदित्य-वंशाची एकमेव धुरा आहे हे लक्षात ठेव."

"माझं बोलणं तुला पटणार नाही हे मला माहित आहे. शीलभद्र, माझं हे बोलणं तुला राजद्रोहाचं वाटतं का ? तसं असेल तर तूच आपल्या खड्‌गाने माझे हे मस्तक विदीर्ण कर. एका आततायी राजपुत्राच्या वेडापायी केव्हातरी नष्ट होण्या-ऐवजी तुझ्यासारख्या राजनिष्ठ सेवकाच्या हातून आलेलं मरण मला जास्त आवडेल. वाटल्यास माझं हे खड्ग घे."

विक्रम घोड्यावरून उतरून शीलभद्रापुढे उभा राहिला आणि त्याने आपली मान त्याच्यापुढे वाकविली.

शीलभद्राला ते पाहवले नाही. घोड्यावरून उडी टाकून त्याने त्याच्या पाठीवर हात ठेवला आणि म्हटले, "विक्रम, मला क्षमा कर. पण असं कृपाकरून काही बोलू नकोस. मित्रा, तुझ्या-

विषयी कुणाला काही वाटो, माझं तुझ्याविषयीचं प्रेम कधीच नष्ट होणार नाही. कधीकधी तर असं वाटतं की तूच या आदित्य-वंशातील राजपुत्र असतास तर किती बरं झालं असतं ! न्याय-दक्षता, मंत्रणा आणि शौर्य हे राजपुरुषाला हवे असलेले सारे गुण तुझ्याठिकाणी आहेत. अवंती देशाचा राजा होण्यास तू सर्वस्वी पात्र आहेस. तुझ्या गुणानं आणि कर्तृत्वानं अवंतीची प्रजा तुझ्यावर प्रेम करू लागली आहे. वाटतं आज ना उद्या यशाचा व मानाचा मुकुट तुझ्या मस्तकावर चढणार आहे. पण काय करू, विक्रम, माझी राजनिष्ठा मला हे बोलू देत नाही."

"मी तुझ्या निष्ठेला दोष देत नाही. पण अशी आंधळी निष्ठा अवंतीचा नाश थांबविण्यास असमर्थ आहे असं माझं मन मला सांगतं. हा उद्याचा सर्वनाश थांबेल असं काहीतरी केलं पाहिजे. आणि मी ते करणार आहे."

युवराज चंद्रादित्य राजमहालाच्या सौधावर एकटाच उभा होता.

चंद्रादित्याच्या विजयाची घोषणा साऱ्या नगरात गर्जून उठली होती पण ती ऐकताऐकता चंद्रादित्याचे मन कावरे बावरे झाले होते. सारे नगर त्याच्या विजयाची द्वाही मिरवीत असले तरी तो खऱ्या अर्थाने त्याचा विजय होता काय ? हा प्रश्न त्याच्या मनात सारखा उठत होता आणि त्या प्रश्नाचे समाधान-कारक उत्तर त्याला मिळत नव्हते.

गेल्या महिन्यातील साऱ्या घटना त्याच्या नजरेसमोर येत होत्या आणि त्याला पृच्छा करीत होत्या, हे सारे कसे घडलं ?

वडिलांच्या रागावर तो गृहत्याग करून निघाला त्यावेळी त्याने आपल्या मनाशी कोणती प्रतिज्ञा केली होती ? ती खऱ्या अर्थाने फलद्रूप झाली होती काय ? काशिराजांशी आपण संगनमत केलं पण आपल्या मित्रांनी मात्र त्याला न जुमानता राजधानीवर हल्ला केला. तो करताना आपल्याला त्यांनी पुढाकारही दिला पण त्या विजयाचा खरा लाभ आपल्याला कितपत मिळाला ?

गेल्या दोनतीन दिवसाच्या घटना त्याच्या मनश्चक्षपुढे घोळत होत्या. एखाद्या झंझावाताप्रमाणे त्याला त्या आपल्याबरोबर ओढून नेत होत्या. काशिराजांना मदत करायला आलेले त्याचे ते सारे मित्र, कुमुद्वतीचा मृत्यू आणि काशिराजावरील आपल्या मित्रमंडळींचा रोष या साऱ्याच घटना कशा अनाकलनीय ! पण कुणा अदृश्य नियतीने स्वतःला अनुकूल असे फासे टाकावे आणि ते एकामागोमाग एक जिंकत जावे . . .

नेमक्या याचवेळी त्याच्या स्मृतिपथावर एक व्यक्ती येऊन उभी राहिली. जसजसा तो विचार करू लागला तसतसा त्याच्या मनातील संदेह मावळत चालला.

अश्वारोही विक्रम ! युद्धासाठी सज्ज झालेला विक्रम.

तटाच्या आत आलेले सैन्य परत तटाबाहेर घेऊन जाणारा आणि त्या सैन्याचा पुढाकार घेऊन अग्रभागी मिरविणारा विक्रम !

आजच्या विजयाचा अग्रवाटा त्याचा होता. खऱ्या अर्थाने रणांगण गाजविले असेल तर ते त्याने. आपण तर केवळ त्याच्या फासातले एक सावज. त्याला हव्या असलेल्या मार्गाने आत आलो आणि नेमक्या कसल्या तरी जुन्याच पाशात अडकलो.

विक्रमाची ती अश्वारोही प्रतिमा नजरेपुढे येताच चंद्रा-

दित्याला त्या अंधारात जणु खरे सत्य गवसले.

हा विजय खराखुरा आपला नव्हे. आपल्या मित्रमंडळीचाही नव्हे. हेच मित्र आपणास नगरीत पोचवून पुनः लढा द्यायला विक्रमाबरोबर निघाले. त्यानी युद्ध केले ते काशिराजाशी नव्हे, आपल्याशीच ! आपले सारे व्यूह त्यानी ढासळून टाकले. त्यांची यंत्रणा सह्य करण्यासाठी नव्हती तर आपल्याला वश करून राजधानीत परत आणण्यासाठी होती.

कुणाच्या तरी हातातील खेळणे होऊन राहावे तशीच आपली या प्रकरणात अवस्था झाली नाही काय ?

जे आपणाला नको होते तेच नेमके घडून आले नव्हते काय ?

तो विचार मनात येताच चंद्रादित्य विलक्षण क्षुब्ध झाला.

तेवढ्यात मंजुळ आवाज आला, 'युवराज !'

तो चिरपरिचित आवाज ऐकला आणि चंद्रादित्याचे मन आश्चर्याने दिङमूढ झाले

आपण स्वप्न तर पाहत नाही ना !

गुदमरल्या स्वरात त्याच्या मुखातून शब्द आले,

"कुमुद्वती !"

"होय, युवराज मी आपली दासी !"

"तू–तू इथं कशी आलीस ? तुझी काही इच्छा तर अतृप्त तर नाही ना राहिली ?"

"युवराज, असं आश्चर्याच्या नजरेनं काय पाहता ?"

तिच्याकडे पाहतापाहता युवराजांनी काहीशा भयकंपित स्वरात विचारले, 'तू स्वर्लोकातून इथं कशी आलीस !"

"मी अजून मृत्युलोकीच आहे युवराज ! माझ्याकडे नीट

पाहा ना ! आपल्या पायधूळीची प्रतीक्षा करण्यासाठी जिवंत राहिलेली दासी. असं काय पाहता ? अजून ओळख पटली नाही !"

"तू मृत्यु पावलीस असं कुवलय सांगत होता."

"ते काहीसं खरं होतं आपणापासून मला कुणी तरी पळवलं आणि हातपाय बांधून कैदेत कुठंतरी नेऊन टाकलं. मला वाटलं होतं, आता मी आपल्याला कायमची अंतरले".

"पण तू आलीस कशी ?"

"युद्धाचा डंका वाजला. आपल्या नावाचा घोष होत होता. माझा उत्साह दाटून आला जवळ कुणी नव्हतं असं पाहून मी माझे बंध तटातट तोडले. युद्धाच्या धुमश्चक्रीत सापडले. तिथंच मी विक्रमादित्यांना पाहिलं आणि--"

"म्हणतेस तरी काय ? विक्रमादित्य !"

त्याच्या स्वरातला रोष तिला कळला नाही.

"होय युवराज. विक्रमादित्य मला भेटले आणि त्यांच्याच सोबतीने-".

"आणि त्याच्या सोबतीनं तू इथं आलीस ?" त्याच्या रोषाचा पारा स्वरालाही भेदून गेला होता.

कुमुद्वतीचे मन त्या स्वराने काहीसे कंपित झाले. पण स्वतःला सावरून ती म्हणाली, "युवराज, विक्रमादित्य आपल्या भेटीची वाट पाहात बाहेर उभे आहेत."

ते शब्द ऐकले आणि पुढल्या दाराशी येण्याऐवजी चंद्रादित्य झपाट्याने मागे वळला आणि अंतर्गृहाच्या दिशेने चालता झाला.

मागोमाग येणाऱ्या कुमुद्वतीकडेही त्याने वळून पाहिले नाही.

पहाटेचा थंड वारा आत आला. चंद्रादित्याची निद्रा भंग पावली. डोळे चोळत तो महालाच्या दाराशी आला.

पाहतो तो काय, खड्ग धारण केलेला विक्रम दाराशी उभा. त्याने आश्चर्याच्या स्वरात विचारलं, 'हे काय, विक्रम, अद्याप घरी गेला नाहीस ?"

"युवराजांची अनुज्ञा घेऊन जाणार होतो.'

आपल्या अनुज्ञेसाठी रात्रभर तिष्ठत राहण्याचे हे अघटित कृत्य पाहून युवराज एकदम आतल्याआत गडबडून गेला. जणु त्याच्या विचाराचे सारे मनोरे ढासळून पडले काहीशा अस्वस्थतेने तो उद्गारला, "माझ्या अनुज्ञेचं काय प्रयोजन ?"

"अनुज्ञा घ्यायची आहे ती खड्ग विसर्जनाची !"

असे म्हणत विक्रमाने आपल्या हातातील खड्ग युवराजांच्या पुढे ठेवले आणि म्हटले, "याचा स्वीकार व्हावा.

"हे काय ? हे खड्ग माझ्यापाशी कशाला ?"

"युवराज, आपल्या पश्चात् युद्धाचा भार आपल्या तातांनी माझ्यावर सोपवला होता. आपण आलात तेव्हा आता हा भार ज्याचा त्याला स्वाधीन करणं योग्य होईल."

"आपल्याला ज्यानी भार दिला त्यांच्याकडेच तो सोपवलेला बरा !"

"पण युवराज मी आपणात व महाराजात भेद मानत नाही. उद्याचे राज्यकर्ते आपणच आहात. महाराज आपले पिता. त्यांच्यात व आपणात प्रसंगी मतभेद होणारच. पण त्यामुळे अवंतीराज्याचे आपणही स्वामी आहात हे आम्हा सेवकांना विसरता येत नाही.

"मी-आणि अवंतीचा स्वामी ?" काहीशा उपरोधिक

स्वरात युवराज उद्गारले.

त्यांच्याकडे पाहत शांत स्वरात विक्रम म्हणाला, "होय. स्वामीच ! आणि भविष्यकाळातले नव्हेत तर आजही. ते पद नियतीच्या कृपेनं आणि परंपरेच्या पुण्याईनं तुम्हाला लाभलं आहे. त्यासाठी कुणा भलत्याच्या साह्याची अपेक्षा तुम्ही तरी करायला नको आहे."

"ते सारं खरं पण हे खड्ग माझ्याजवळ कशाला ?"

"आपण पृच्छा करीत आहा म्हणून सांगतो. प्रजेच्या कल्याणाची चिंता वाहणं हा राजांचा धर्म तर प्रजासंरक्षणासाठी त्यांना साह्य करणं हा आम्हा सेवकांचा धर्म. पण तो यापुढं नीट परिपालन करता येईल असं मला वाटत नाही. आपणा पिता-पुत्रातील मतभेद लक्षात घेता यापुढे राज्याची सूत्रं सुरक्षितपणे चालवणं आम्हा सेवकांना अशक्य होणार आहे. राज्याचा भविष्यकाळ मला तरी यापुढं सुरक्षित वाटत नाही आणि तो स्वत:च्या नजरेनं पाहणंही मला शक्य नाही म्हणून हा खड्ग-संन्यास प्राप्त आहे."

"खड्गसंन्यास !" काहीशा आश्चर्याने विक्रमाकडे पाहत युवराज उद्गारला. "पण जातिवंत क्षत्रियानं खड्ग कधीच खाली ठेवू नये; मरेपर्यंत खाली ठेवू नये."

"म्हणूनच कालच्या युद्धात खड्ग हातात घेऊन लढायला गेलो होतो. आशा होती की युद्ध करताकरता आपणाला वीर-मरण येईल. पण नियतीला ते मान्य नव्हतं. क्षत्रियांनी एक तर वीरमरण पत्करावं किंवा सूर्यमंडळाचा भेद करून जाणारे योग्याचं मरण. ते दुसरं मरणच मी आता पत्करणार आहे."

"म्हणजे आत्मघात करणार ?"

"स्वेच्छेनं शत्रूला आपलं राज्य विसर्जित करणाऱ्या आत्मघाताहून हा आत्मघात वाईट नाही ! आपल्याच पित्याचं शिरकमल शत्रूसाठी आपल्या हाताने छाटण्याइतकं ते अधम नाही. आपल्याच प्रजेचं धन परक्यांच्या हातानं लुटवण्याइतकं ते नीचही नाही. ऐका चंद्रादित्य महाराज, हे खड्ग आपण स्वीकारा आणि माझा मरणाचा मार्ग मोकळा करा."

"पण हे खड्ग आपण तातांनाच द्यावं हे बरं."

"आपणात व आपल्या तातांत मी भेद मानीत नाही. पुत्र हा पित्याचाच अंश असतो म्हणतात. त्या राजर्षीच्या पुण्याचा वारसा आपल्याला लाभला आहे आणि तो युवराजांच्या शतसहस्र दुष्कर्मांकडं डोळेझाक करावी इतका प्रभावी आहे. पण मला स्वत:ला युवराजांची दुष्कर्मं डोळ्यांनी पाहणं अशक्य आहे."

"विक्रम !"

"पुरतं ऐकून घ्या, युवराज. मरणाच्या मार्गाने जाणाऱ्या तुमच्या दुर्दैवी मित्राचे अंत:करण जरा समजून घ्या. तुमच्या पित्याच्या कृपेने माजलेला आणि तुमच्या उत्कर्षाच्या आड येणारा विक्रम यापुढं तुमचा मार्ग अडविणार नाही. तो स्वेच्छेने क्षिप्रेच्या जलात आत्मविसर्जन करणार आहे. पण जाण्यापूर्वी तो तुम्हाला काही हिताच्या गोष्टी सांगू इच्छितो. युवराज, माणसाची उच्छृंखलता मी ओळखू शकतो, तारुण्यातली स्वैर उपभोगप्रियताही मी जाणतो. पण आपल्याच हातानं आपल्या हितावर गदा आणणारा माणूस मात्र माझ्या नजरेला असह्य होतो. मला वाटलं होतं, आज ना उद्या तुमच्या बुद्धीत फरक पडेल, वयपरत्वे तुम्ही सुजाण व्हाल आणि म्हणूनच माझ्यापरीने मी तुमचं रक्षण करीत आलो. अवंतीची सारी प्रजा तुमच्या-

विरुद्ध खवळली होती, मित्रमंडळ उदास होतं आणि पित्याच्या न्यायबुद्धीत तुमची आहुति पडण्याचा संभव होता. त्यापासून मी तुम्हाला वाचवलं. युवराज साहसी असेल तर त्याच्याबरोबरीने वाटेल ते साहस करायला मी सज्ज होतो, वाटेल ती संकटे झेलायला, काटेरी मार्गाला न जुमानता पुढं जायला मी सज्ज होतो. पण माझ्या लक्षात आलं की युवराजांना मीच नकोसा आहे. तरीही मित्रधर्म म्हणून मी आपल्यापरीने कर्तव्य करीत राहिलो; पण यापलीकडे ते शक्य दिसत नाही. राज्यकर्त्यांच्या अध:पातामुळे होऊ पाहणारा राज्याचा नाश मला पाहवणार नाही. परक्यांच्या साह्याने आपले पितृदत्त राज्य जो स्वत:च बुडवायला निघाला आहे तो राजा प्रजेचे कितपत पालन करू शकेल याबद्दल मी साशंक आहे. ही साशंकता मिटविण्याचा माझ्यापुरता प्रयत्न मी करणार आहे. हा निर्णय मी स्वेच्छेने माझ्या मनाशी घेतला आहे. हा विक्रम यापलीकडे तुमच्या सुखाच्या आड येणार नाही."

"नको, विक्रम, असं बोलू नकोस." गहिवरल्या स्वरात चंद्रादित्य म्हणाला, "असं काही करू नकोस. तुझा कालचा पराक्रम अतिशय अद्‌भुत होता हे साऱ्या नगरीला आता विदित झालं आहे. अशा पराक्रमी सेनापतीला सोडून हे राज्य चालणार नाही हे माझ्याही लक्षात आलं आहे. खोटं कशाला सांगू. मी तुझा मत्सर करू लागलो होतो. या घटकेपर्यंत तुझ्या फसवणुकीची मला चीड येत होती पण आता माझ्या सारं लक्षात आलं आहे. तू जे जे केलंस ते ते माझ्या हिताकरताच केलंस !"

"युवराज, आपण जे बोललात त्यातला भाव मला कळला.

आत्मसमर्पणाच्या या शेवटच्या क्षणी मी अतिशय संतुष्ट आहे. मला आता जाऊ द्या."

"नाही, विक्रम. मी तुला जाऊ देणार नाही. तुला कोणतीही अनुज्ञा करण्याची पात्रता माझ्या अंगी नाही. माझा तो अधिकार नाही. पण विक्रम, आपण एकमेकांचे मित्र आहोत हे तर खरं ना ! मी युवराज आणि तू सेवक असं नातं आपलं पूर्वी नव्हतं आणि पुढंही राहणार नाही. मी स्वैर असेन, उच्छृंखल असेन, पण मित्रत्वाच्या नात्यानं मला मार्गावर आणण्याचा तुझा अधिकार आहे मित्रा, चंद्रादित्य युवराज म्हणून नव्हे तर एक मित्र म्हणून हे खड्ग तुला परत देत आहे त्याचा स्वीकार कर."

असे म्हणत युवराज चंद्रादित्याने विक्रमाच्या हातातील खड्ग त्याच्या कमरेला बांधले आणि म्हटले,

"अवंतीच्या सैनिकांनी स्वयंस्फूर्तीने तुझा जो गौरव केला तो मी ऐकला आणि तुझं मोठेपण मला खरं कळलं. मित्रा, मी जन्मजात चंद्रादित्य असलो तर तू स्वतःच्या तेजाने तळपणारा विक्रमादित्य आहेस. मी स्वतः मोठ्या आनंदाने तुझी ही पदवी मान्य करतो– नव्हे उद्याच्या सभेत तुला ही पदवी मिळावी अशी मी स्वतः तातांना प्रार्थना करणार आहे."

## १३

अंतःपुरवधूच्या नव्या वेषात कुमुद्वती पुढे उभी होती. अवंतीच्या राजमहालातील विलासमय वातावरण त्या लावण्यवती नववधूच्या आगमनाने जणु उजळून निघाले होते.

तिच्याकडे काहीशा संभ्रमित नजरेने पाहत विक्रमाने म्हटले, "युवराज्ञींचे कुशल आहे ना ?"

"तुमच्या मित्रांच्या कुशलातच आमचे कुशल आहे."

तो स्वर काहीसा रोषपूर्ण होता. विक्रमाच्या मनात आले, विवाह होऊन महिनासुद्धा उलटला नसेल तोच हा रोष... त्याला काहीसे विचित्र वाटले. कुमुद्वतीने आपल्याला कशाला बोलावणं पाठवले असेल ते त्याला कळेना.

त्याने विचारले, 'युवराजांचे कुशल आहे ना ?"

"ते सुद्धा माझ्यापेक्षा आपल्यालाच विदित असणार !"

"होय, पण ते सारे वरवरचे. अंतरंगातील वार्ता सांगावी ते प्रियजन वेगळेच असतात."

"इतकं हिणवायला नको मंत्रिवर, तुमच्या आशीर्वादाची ही फळे आहेत हे कुमुद्वती विसरलेली नाही."

"प्रशंसा करण्यात वेळ व्यर्थ जात आहे."

"मंत्रिवरांना विनय फारच खुलतो. स्त्रियांची सारी अस्त्रे बोथट ठरावीत असं कोणतं बळ विधात्याने तुम्हाला दिलं आहे, नकळे !"

"का ? देशोदेशीच्या राजकन्यांकडून मागण्या येत आहेत आणि त्या नाकारल्या जात आहेत असं काही माझ्यासंबंधी अजून घडलेलं नाही, खरं ना !"

"मंत्रिवर मनात घेतील त्याक्षणी त्यांचे स्वयंवरकार्य संपन्न होईल. पण सांप्रत त्यांना दुसऱ्यांची स्वयंवरे तडीस लावायला हवीत."

"आता कुणाच्या स्वयंवरास उपस्थित राहण्याचा आदेश आहे ?"

"काशिराजांच्या कन्येच्या."

"ओहो ! येथपर्यंत ती वार्ता येऊन पोचली की काय ? तरीच इतक्या लगबगीचं बोलावणं आले. स्त्रियांच्या मत्सराचा अनल केव्हा पेट घेईल याचा नेम नाही."

"मत्सर नाही हं मला ! माझी पायरी मी चांगली ओळखून आहे. पण तुम्हीच सांगा मंत्रिवर, हे विवाहाचं आमंत्रण तसं खरं मनापासून आहे का ? नुकताच पराभव पावून गेलेला शत्रु या विवाहाच्या निमित्ताने नवा फासा तर टाकत नाही ना!"

"तुला देखील असं वाटतं ? पण फासा कितीही नवा असला तरी त्यातून सुटण्याचा काहीतरी उपाय असतोच. एक गोष्ट विचारू ? काशीची राजकन्या अवंतीच्या राजमहालात शोभून दिसेल का ? राजकन्येचं चित्र युवराज्ञींनी पाहिलं आहे ना ?"

"आम्हा स्त्रियांच्या नजरेला त्यातलं काही कळत नाही."

"युवराजांचा विचार काय दिसतो ?"

"तुमचे मित्र त्या चित्रावर भलतेच भाळलेले दिसतात."

"आणि त्याचा युवराज्ञींना मत्सर वाटतो ?"

"नाही हो मंत्रिवर, असा मत्सर करण्याइतकी मी वेडी नाही उद्याची जी कोणी युवराज्ञी येणार ती सौंदर्यसम्राज्ञीच असणार ! राजहंसाच्या पावलांनी ती पदक्षेप करीत येणार. कोकिळांच्या कलरवानं महालाचा कोनाकोपरा भारून टाकणार आणि ती मृगनयना आपल्या कटाक्षाने हा महाल उजळून सोडणार ! ते भाग्य ज्या कुणा देवतेचं असेल तिला ते अवश्य मिळो. माझी त्याविषयी कुरकूर नाही. त्या सौंदर्यसम्राज्ञीची आज्ञापालन करणारी एक दासी म्हणून मी सेवेत असेन. तिच्या केवळ दृष्टिक्षेपानं मी स्वतःला धन्य समजेन. काशिराजांची कन्या तशी असली तर ती मला नको का आहे ? जे युवराजांना प्रिय तेच मलाही प्रिय !"

"मग अशा दुपारच्या वेळेला हे कोकिलकूजित कशाला ?"

"का कोण जाणे, हे विवाहाचं आमंत्रण मला फसवं वाटतं. तुमचे मित्र कसे आहेत ते तुम्हालाच माहितच आहे. तीच एक काळजी आहे."

"तुझ्याजवळ ते काही बोलले !"

"चित्र पाहिलं तेव्हा मी जवळच होते. मला म्हणाले, कुमुद्वती, चित्रातील स्त्री तुझ्याइतकी सुंदर नाही."

"एवढंच ना !"

"तेवढंच बोलते तर मी स्तब्ध राहिले असते. पण स्वारींच्या मनात हे आव्हान स्वीकारावं असं दिसते. मला म्हणाले, राजकन्या सुंदर नसेल पण विवाहाचं आमंत्रण आलं आहे हे खरं ना ! असं आव्हान अमान्य करणं जातिवंत क्षत्रियाला तरी योग्य ठरणार नाही."

"बरोबर आहे त्याचं म्हणणं."

"तुम्हाला सुद्धा पटलं का ? आता दुसरं तिसरं बोलण्याची काही सोयच उरली राहिली नाही."

"युवराज्ञींनी नीट समजून घ्यावं. युवराजांचं म्हणणं क्षत्रियाला साजेसं आहे एवढंच माझं म्हणणं. पण तेवढ्यानं भागत नसतं. शिवाय हा एकट्या युवराजांच्या संमतीचा प्रश्न नाही."

कुमुद्वतीच्या चर्येवरील विषाद तेवढ्याने मावळला नाही. ती रोषपूर्ण स्वरात म्हणाली, "पण त्यांना माहीत आहे की आपण हट्ट घेतला तर कुणाचं काही चालणार नाही."

"हो. पण त्यांच्या हट्टाला नेहमी चांगलीच फळं येत नाहीत हे त्यांना माहीत आहे. नसेल तर ते माहीत होईल"

कुमुद्वती काही वेळ स्तब्ध बसली. बोलू की नको असे भाव तिच्या मुद्रेवर उमटले. आपल्या मनगटावरील कंकण वर सारीत तिने विक्रमाकडे पाहिले आणि हळूच म्हटले, "बाकी एका बाबतीत ते अतिशय सावध आहेत, बरं का ?"

"कशावरून ?"

"मी त्यांना म्हटलं, मग काशीच्या राज्यात लवकरच प्रयाण व्हायचं असेल. त्यावर म्हणाले, या बाबतीत एका माणसाचा विचार घेतल्याशिवाय मी जाणार नाही."

काहीसे थबकून कुमुद्वती पुढे म्हणाली, "ते माणूस कोण हे तुम्ही ओळखलंत का ?"

विक्रमादित्य उत्तर देण्याऐवजी नुसताच हसला.

कुमुद्वतीही हसली आणि म्हणाली, "मंत्रिवर त्यांना योग्य तोच सल्ला देतील अशी आशा करते."

कुमुद्वतीचे म्हणणे खरे ठरले. त्याच दिवशी सायंकाळी राजभवनाच्या उद्यानात सहल करीत असताना युवराजाने आपले मनोगत विक्रमाजवळ प्रकट केले.

"पण प्रथम हे सांग की महाराजांना हे कळवलंस का ?"

"नाही. हे प्रथम तुझ्याजवळच बोलत आहे. तातांजवळ बोलण्याचा धीर होत नाही. पुन: याबाबतीत त्यांचा कौल काय राहणार ते स्पष्टच आहे."

"ते नकार देतील असं का तुला वाटतं ?"

"काय म्हणतील ते सांगवत नाही. एवढं मात्र खरं की या बाबतीत तुझा सल्ला घेतल्याशिवाय ते राहणार नाहीत. म्हणून विचार केला की तुझं म्हणणं काय ते समजून घ्यावं."

"काशीची राजकन्या पसंतीस उतरली म्हणायची !"

"राजकन्येची माळ गळयात पडली तर ते कुणाला नको आहे ?"

"पण ती माळ गळफास पडू नये हेही पाहायला हवं."

"तुम्हा साऱ्यांना असं वाटतं की यात काशिराजांचं काही कपट असावं. मला तसं वाटत नाही. थोडे दिवस का होईना, त्यांचं सान्निध्य मला लाभलं आहे आणि खरं सांगायचं तर कधी नव्हे ते प्रेम माझ्या वाटचाला आलं असेल तर ते त्यांच्याच सान्निध्यात !"

"काशिराज इतके प्रेमळ असतील हे मला माहित नव्हते."

"आहेतच. त्याविषयी कुणी काही सांगो, माझं मन निश्चित आहे."

विक्रमादित्य यावर काही बोलला नाही.

राजपुत्र म्हणाला, "मित्रा, तुला आणखी एक गोष्ट

सांगतो "

"ऐकतो आहे मी."

"मी शिबिरात असतानाच महाराजांनी आपल्या कन्येच्या विवाहाबद्दल मला गळ घातली होती पण त्यावेळी मी ते मनावर घेतले नाही. कारण तुझ्या लक्षात आलं असेलच. मला वाटतं आपलं ते अभिवचन पार पाडण्याचा काशिराजांचा विचार असावा."

"काशिराज वचनाचे एवढे सच्चे असतील तर चांगली गोष्ट आहे."

"आणि नसलं तरी काय झालं ? आपण आंधळेपणानं तर त्यांच्या पाशात अडकत नाही ना ! त्यांचा हेतु शुद्ध असला तर चांगलंच, पण नसला तर."

"थांबलात का युवराज ?"

"नसला तरी एका राजकन्येच्या विवाहाचं हे आव्हान. आपण काय म्हणून त्याला नकार द्यावा ?"

थोडेसे थांबून विक्रमाकडे पाहत चंद्रादित्य म्हणाला, "मित्रा, तुझी इच्छा असेल तरच काशिराजाच्या कन्येची पावलं अवंतीच्या राजमहालात पडतील."

विक्रम प्रत्युत्तरादाखल काहीच बोलला नाही.

युवराजाने विचारले, "मित्रा, तुला हे मान्य नाही का !"

"पण या बाबतीत घाई उपयोगाची नाही. अवंतीच्या राजपुत्राला साजेशा वैभवानेच सारा सोहळा व्हायला हवा. त्यासाठी तुझी इच्छा असेल तर–"

बोलताबोलता विक्रम थांबला. युवराजाने आतुरतेने म्हटले, "बोल, मित्रा काय म्हणतोस ?"

"तुझा प्रतिनिधि म्हणून मी प्रथम काशीराजाकडे जातो. तू त्यांना माझ्याजवळ तसा संदेश दे"

"अवश्य. आणि मी काय करायचं ?"

"मी निरोप पाठवीन त्यावेळी निघून ये. मधल्या काळात मात्र कोणत्याही तऱ्हेची गडबड करायची नाही."

"अगदी मान्य."

"महाराजांच्या कानावर ही गोष्ट घालून मी लवकरच काशीला प्रयाण करतो."

"तातांची समजूत तू घालणार ? ठीक ! माझ्या शिरावरचा अर्धा भार कमी झाला म्हणायचा !"

"एकच गोष्ट पुन्हा सांगतो. काही झालं तरी माझा निरोप येईपर्यंत येथून मुळीच हलायचं नाही. ही तुझ्या बोटातली मुद्रा मला दे. ती आपल्या निरोपाची खूण राहील."

युवराजाने तात्काळ आपल्या बोटातले रत्नजडित अंगुलीयक विक्रमाच्या पुढे केले.

काशिराजांनी विक्रमाचे अतिशय आनंदाने स्वागत केले.

"युवराजांचा संदेश आला. मोठा आनंद झाला."

एवढे बोलून ते थांबले नाहीत. खरोखरच आनंदाचा प्रचंड वेग त्यांच्या अंतःकरणात दाटून आला—जो त्यातही मावेनासा झाला होता. विक्रमाच्या मुखाकडे पाहतापाहता त्यांचे नेत्र क्षणभर विलक्षण चमकून उठले.

आनंदाचा गहिवर थांबवीत ते म्हणाले, "युवराज थोडेच दिवस आमच्याबरोबर होते. पण मनुष्य फार प्रेमळ. पित्याशी

एवढा कलह झाला ना, पण थोरल्या महाराजांबद्दल एक अनादराचा शब्द तोंडातून निघाला असेल तर शपथ ? उलट त्यांना नेहमी भीति वाटे, महाराज काय म्हणतील ! आम्ही म्हटलं की आपण मित्रत्वाच्या नात्याने जात आहोत."

"सैन्य बरोबर नसते तर बरं झालं असतं. ते असल्यामुळे बिचकलो आम्ही."

काशिराजांची नजर क्षुब्ध झाल्याप्रमाणे विक्रमावर स्थिरावली. पण क्षणभरच. लगेच सावरून म्हणाले, "होय, तेही खरंच !"

पण तसे म्हणताम्हणता शब्द घोगरे झाले. जणु पहिलाच वार फुकट गेला होता.

नंतर युवराजांच्या संदेशावरून त्यांनी नजर फिरविली आणि म्हणाले. "पत्रावरूनही युवराज विचारी व समंजस वाटतात."

विक्रमाने नजरेला नजर भिडविली आणि म्हटले, "आपल्या सान्निध्याचा नाही म्हटला तरी थोडा प्रभाव पडणारच."

पुन: म्हातारा बावरला.

हा दुसराही वार वाया गेला म्हणायचा !

काही वेळाने स्वत:ला सावरून घेत काशिराजांनी विचारले, "थोरल्या महाराजांची प्रकृति बरी आहे ना ?"

"भगवान् महाकाळेश्वराच्या कृपेनं सध्यातरी कुशल आहे."

"त्यांच्या भेटीची आम्हाला फार उत्कंठा आहे. आपण आमची विनंती मान्य करून इथं आला याबद्दल आम्हाला अतिशय आनंद झाला आहे."

"आपली इच्छा जाणूनच त्यांनी आम्हाला पुढं पाठविलं आहे."

म्हाताऱ्याने गलमिशावर हात फिरवीत म्हटले, "जसं अवंतीस महाकालेश्वर, तसं येथे विश्वेश्वर. आपल्या भक्तांच्या मनकामना पूर्ण करणारे ईश्वर."

"हे मात्र खरं. भक्तांची जशी इच्छा तसं फळ."

काही क्षण म्हातारा थांबला आणि पुन: एकदा गलमिशावर हात फिरवीत म्हणाला, "हा सोहळा मोठा चिरस्मरणीय होईल."

"आम्ही त्याच इच्छेने आलो आहोत. एक विनंती करायची आहे."

"बोला, कसली इच्छा आहे ?"

"विवाहाचा हा सोहळा सामान्य नव्हे. अवंतीचा नागरिकही येथे दाटी करणार. त्या साऱ्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हायला हवी."

"कशातऱ्हेची व्यवस्था हवी ती सांगा. आमचे कारागीर ती करतील."

"तसं नको अवंतीचे कारागीर आमच्याबरोबर आहेत. काशीक्षेत्री प्रति अवंती उभी करू. पण त्यासाठी भूमी हवी.

"चांगली गोष्ट आहे. आपणास हवी ती भूमि आपण पाहा."

उज्जयिनीहून युवराज चंद्रादित्याची स्वारी विवाहाप्रीत्यर्थ डौलाने वाजतगाजत निघाली पण काशीनगरीत तिचे तितकेसे स्वागत झाले नाही. सहस्त्रावधि नगरवधू आपल्या नेत्रांच्या नीरांजनाने ओवाळताना दिसतील आणि कुसुमवर्षावाने सारा राजपथ भरून जाईल असे चंद्रादित्याला वाटले होते पण युवराजाने नगरप्रवेश केला तरी एकही पुरवधू त्याच्या दृष्टीस

पडली नाही; नागरिकांचा हर्षानी ओथंबून येणारा जयशब्द कानांवर पडला नाही. नाही म्हणायला काशिराजांचे विशाल सैन्य पुरप्रवेशापासून त्यांच्याबरोबर मिरवत होते आणि त्या दाटीत अवंतीचा लवाजमा जणु गारठून गेल्यासारखा दिसत होता.

ते सारे दृश्य पाहून युवराजाचे मन आतल्याआत कोमेजून गेले. मनाच्या त्या संभ्रमित अवस्थेतच त्याने आपल्यासाठी तयार केलेल्या आदित्यपुरीमध्ये प्रवेश केला.

आणि दुसऱ्याच दिवशी उजाडण्यापूर्वीच वार्ता आली की आदित्यपुरीचा तट काशिराजांच्या सैन्याने वेढला आहे.

स्वतः युवराजाने सौधावरून तो देखावा पाहिला. साऱ्या बाजूंनी तटाला विळखा पडला होता.

तो पाहून त्याची अवस्था एखाद्या विकलांग माणसाप्रमाणे झाली. तो कसाबसा शून्य मनाने आपल्या मंदिरात आला आणि तेथेच उभ्याने धरणीवर कोसळला.

कुमुद्वतीने धावत येऊन त्याचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले

पण त्याची अवस्था पाहून तिच्याही नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या टपटप पडणाऱ्या अश्रूंनी युवराजाचे कपोल भिजून गेले आणि त्याने डोळे उघडले

कुमुद्वतीला पाहताच त्याच्या स्वरात गहिवर दाटून आला.

"कुमुद्वती !"

"काय म्हणता युवराज !"

"काही म्हणण्यासारखं उरलं नाही ग !"

"असा धीर सोडून कसं चालेल, युवराज ?"

"कुणाचं न ऐकता मी इथं आलो आणि जाळ्यात फसलो. तेही एकटाच नव्हे तर तुम्हा साऱ्यांना घेऊन–"

त्याच्या ओठावर हात ठेवत कुमुद्वती म्हणाली, "झाल्या गेल्या गोष्टी बोलण्यात लाभ नाही. आता यातून बाहेर कसं पडायचं याचा विचार करायला हवा घाबरू नका तुम्ही इथं एकटे नाही. जिवाला जीव देणारे मित्र तुमच्याबरोबर आहेत. काहीतरी मार्ग निघेलच."

"मला तर मरणावाचून दुसरा मार्गच दिसत नाही. शत्रूच्या हातात जिवंत सापडण्यापेक्षा विषप्राशन करून मेलेलं काय वाईट !"

"छी: काय हे बोलणं ! तुमच्यासारख्या क्षत्रियाला हे शोभत नाही. हे बघा, तुमचे मित्र आले. मला उठू द्या."

असे म्हणून कुमुद्वतीने त्याचा हात धरून मंचकावर बसविले आणि ती बाहेर पडली.

अवंतीच्या चतुरंग दलाचे तरुण सेनापती आत आले आणि युवराजाच्या पायाशी वाकत त्यांनी अभिवंदन केले आणि म्हटले, "युवराजांचे कुशल आहे ना !"

आपले ताम्रवर्ण कटाक्ष त्यांच्याकडे टाकत चंद्रादित्याने विचारले, "कुशल विचारण्यापूर्वीच तटाच्या बाहेरची हालहवाल पाहिलीत का ?"

मणिभद्राने लवून म्हटले, "म्हणून तर इकडे धावत आलो. आपली आज्ञा असेल तर अवंतीचा सैनिक याही स्थितीत प्राण-पणानं लढायला सज्ज होईल."

अगदी त्याच क्षणाला कोपऱ्यातून हास्यध्वनि प्रकट झाला.

"कोण, शीलभद्र ! तुम्ही आणि अशा भलत्यावेळी आमचा

उपहास करीत आहात ?"

"नाही. युवराज, आपला उपहास मी कसा करीन ? पण या मणिभद्राचे उद्‌गार ऐकून मला हसू आवरेनासं झालं !"

मग तो मणिभद्राकडे वळून म्हणाला,

"मणिभद्र, तुम्ही युद्ध करायचं म्हणता आहात ते कशाच्या बळावर ?"

"असं का विचारता, अमात्यपुत्र ?"

"सेनापति, तुम्ही युद्ध करायचं ठरविलं खरं पण तळावर तर एकही सैनिक नाही."

ते शब्द ऐकले आणि युवराज चमकून उठला.

"काय म्हणता ? एकही सैनिक तळावर नाही !"

"होय युवराज, पण आपण घाबरू नका. विक्रमाचा संदेश आहे की–"

"पण विक्रम आहे कुठं ?"

"ते मलाही सांगता यायचं नाही. मध्यरात्रीपासून मी त्याच्या शोधात आहे. पण अद्याप भेटला नाही. त्याच्या सेवकाने आपणासाठी निरोप दिला आहे."

"कोणता निरोप ?

"युवराजांना म्हणावं, भय बाळगू नका. दिवसाचा राहू चंद्राला ग्रासू शकत नाही."

"विक्रमाला म्हणायचं आहे तरी काय ?"

"ऐका. युवराज, राहु चंद्राला तर ग्रासणार नाहीच पण वेळ आली तर चंद्रच राहूचा ग्रास घेऊ शकेल !"

ते शब्द ऐकताच युवराजाने आनंदित मुद्रेनं वर पाहिले आणि म्हटले, "विक्रम !"

विक्रमाचे नेत्र जागरण केल्याप्रमाणे टोकाला रक्तवर्ण दिसत होते. त्याजकडे पाहत युवराजांनी विचारले, "रात्रभर तू कुठं होतास ?"

"आपलं सारं सैन्य गंगेच्या पलिकडे सुरक्षितपणे पोचवून आलो."

"सैन्य दिसलं नाही तेव्हा मला तशी शंका आलीच होती." शीलभद्र हसून म्हणाला

"शीलभद्रं, आता बोलायला अवकाश नाही. तुम्ही युवराजांबरोबर अवंतीला प्रस्थान करायचं आहे."

आणि चंद्रादित्याकडे वळून त्याने म्हटले, "युवराज, अंतःपुरात युवराज्ञींना आदेश कळवा. प्रस्थानाची सर्व सिद्धता झाली आहे."

क्षुब्ध झालेला चंद्रादित्य आता काहीसा भानावर आला होता. विक्रमाला आपल्या बाहूंनी आलिंगन देत त्याने म्हटले, "विक्रम, तू आहेस म्हणून आमचं कुशल आहे. पण हे सारं घडलं कसं ?"

"सांगतो."

असे म्हणत विक्रमाने त्याच्या आलिंगनातून मुक्तता करून घेतली आणि मग समोरच्या भिंतीवरील हस्तिणीची शुंडा जोराने पिरगळली.

पाहतापाहता हस्तिणीच्या पोटातून एक द्वार खुले झाले.

आतल्या बाजूने पायऱ्या दिसत होत्या.

त्या ओलांडून ते पुढे झाले आणि आपल्या समोरच त्या भुयाराच्या मार्गावर युवराजांचा आवडता हत्ती अलंकरणाने सज्ज झालेला त्यांनी पाहिला.

भुयाराचा मार्ग बराच प्रशस्त आणि लांबरुंद होता. मणिमय भितींनी प्रकाशमान झाला होता.

युवराज आणि त्यांचे मित्र आश्चर्यचकित नजरेने तिकडे पाहत राहिले.

त्यांच्या मुद्रेकडे पाहत विक्रम म्हणाला, "युवराज, मी इथं आलो तेव्हाच या पुढल्या भविष्याची जाणीव मला होती. त्याच्याशी प्रसंग आलाच तर तोंड देता यावे म्हणून ही व्यवस्था मी केली. हे भुयार गंगेच्या तीरापर्यंत तुम्हाला सुरक्षित नेऊन पोचवील. तेथे गंगेच्या तीरावर नौकांचीही व्यवस्था आहे. गंगा ओलांडून पलीकडे कुवलयाच्या आधिपत्याखाली आपले सैन्य तुमची वाट पाहात सज्ज आहे. अमात्यपुत्र पुढे व्हा आणि युवराजांना वाट दाखवा."

आश्चर्याच्या मुद्रेने पुन: एकदा त्याच्याकडे पाहत युवराजांनी म्हटले, "पण हे काय, आमच्याबरोबर प्रस्थान ठेवायची तुझी तयारी दिसत नाही."

"तुमचं म्हणणं खरं आहे. पण मला क्षमा करा. अद्याप थोडसं कार्य अवशिष्ट राहिलं आहे. ते उरकून घेतल्याशिवाय निघणं मला योग्य वाटत नाही."

जशी तुझी इच्छा. पण कार्य शक्य तितक्या शीघ्र उरकून ये. आम्ही तुझी वाट पाहत राहू."

प्रभातकालचा रमणीय देखावा आपल्या नेत्रसंपुटात वेचून घ्यायला राजकन्या नेहमीच जणू अधीर असे.

अशा अधीर अवस्थेतच आज तिची पावले राजगृहाच्या अट्टालिकेकडे वळली.

पण हे काय, तिचा मार्ग एकाएकी अवरुद्ध झाला होता. सौधाकडे जाणाऱ्या पहिल्याच पायरीवर एक तरुण पुरुष उभा होता.

भयचकित मुद्रेने तिने विचारले, "तुम्ही कोण ?"

त्या तरुण पुरुषाने तिच्याकडे सहास्य मुद्रेने पाहिले आणि म्हटले, "भय बाळगू नका. आम्ही कोणी वैरी नाही. आपले तात आम्हाला ओळखतात."

"पण मी आपणाला पूर्वी पाहिलेलं स्मरत नाही."

"म्हणूनच भेटायला आलो. अवंतीस परण्यापूर्वी आपले दर्शन व्हावं म्हणून आलो."

काहीशा आश्वस्त नजरेने त्याने राजकन्येकडे पाहत हे शब्द उच्चारले. पण राजकन्येचा संभ्रम उलट वाढलेला दिसला. काहीशा त्रासिक चर्येने तिने म्हटले, "पण आपण कोण, ते सांगितलंच नाही."

"मी अवंतीचा विक्रमादित्य."

"विक्रमादित्य !"

"का, नाव ऐकताच दचकलात ?

"तातांच्या मुखानं आपलं नाव ऐकलं आहे"

"आणि त्या त्या वेळी आपण अशाच दचकल्या आहात. होय ना !"

राजकन्या काही बोलली नाही.

"मी कुणी क्रूरकर्मा राक्षस नाही. हे आता आपण जाणलंच असेल."

प्रत्युत्तर देण्याऐवजी राजकन्येने मान बाजूला वळवली. तिकडे पाहत विक्रम म्हणाला, "राजकन्या चतुर आहेत म्हणून

ऐकतो. तेव्हा अवंतीला परतण्यापूर्वी आमच्या एका प्रश्नाचं उत्तर मिळावं अशी इच्छा आहे."

"कोणता प्रश्न ?"

"एखाद्यानं विवाहाचं आमंत्रण द्यावं आणि आमंत्रणाप्रमाणं आलेल्या माणसाला कारावासात टाकावं या गोष्टीला आपण काय म्हणाल ?"

"याचं उत्तर मी काय देणार ? हा ज्याच्या त्याच्या सामर्थ्याचा प्रश्न आहे."

"योग्य बोललात ! अशा स्थितीत म्हणजे कारावासात पडलेल्या व्यक्तीने स्वत: मुक्त होऊन त्या स्वयंवर वधूचं अपहरण केल्यास ते न्याय्यच ठरेल, नाही का ?"

राजकन्या काहीशी अस्वस्थ झाली. तिने सभय स्वरात प्रश्न केला, "आपण हे माझ्याजवळ काय म्हणून सांगत आहात ?"

बोलताबोलता वर उचलल्या गेलेल्या भारावलेल्या पापण्यांची जी हालचाल झाली ती रमणीय होती. नेत्रांच्या पापण्याही कधीकधी जी गूढ क्रीडा करतात ती नयनरम्य असते तर !

"आपण क्रोध करू नका. पण आम्ही अवंतीहून येथे कशाला आलों हे आपणाला विदित आहे ना !"

"नाही" रोषपूर्ण स्वरात शब्द आले, "आणि ते विदित करून घेण्याची इच्छाही नाही. पण आपण आता येथून जाणं उचित होईल. एखाद्या कुलीन कन्यकेशी अंत:पुरात आणि तेहि तिच्या तातांच्या पश्चात बोलणं आपणाला शोभणारं नाही."

विक्रम हसला आणि म्हणाला, "आपले तात यावेळी समोर असते तर आम्हालाही ते हवंच होतं."

थोडेसे थांबून तो पुढे म्हणाला, "आपले तात सध्या कुठं

आहेत ?"

"ते मला माहित नाही"

"मी सांगतो ! आपले तात यावेळी आमच्या महालाला वेढा देऊन बसले आहेत."

त्याच्या स्वरातला रोष तिला जाणवला. त्याला छेद देण्यासाठीच जणु छद्मी उपहासाच्या स्वरानं तिने म्हटले, "आणि तरीही तुम्ही इथं आलात !"

उत्तरादाखल विक्रमादित्य खदखदून हसला आणि म्हणाला, 'ग्रहणाप्रमाणे मोक्षाचेही मंत्र आम्ही जाणतो. पण इथं आलो ते मात्र एका वेगळ्या कारणाने आलो. सुंदर राजकन्यांचं स्वयंवर व्हावे हा जुनाच संकेत आहे. तुमच्या तातांनीही त्यासाठीच आम्हाला बोलावलं. पण"–

त्याला मध्येच थांबवून राजकन्या गडबडीने म्हणाली, "पण आता आपण जाऊ शकता."

"आमचं म्हणणं आपण पूर्णपणे ऐकलं नाही. स्वयंवरासाठी बोलावलेली माणसं अशी मुकाट्याने परत जात नसतात."

"मग आपण काय करणार आहात ?" राजकन्येने भयचकित स्वरात प्रश्न केला.

"अशा भयभीत होऊ नका सुंदर राजकन्यांचे अपहरण करावे हा क्षत्रियांचा जुनाच धर्म आहे. पण आम्ही तसे करणार नाही."

प्रश्नार्थक मुद्रेने राजकन्येने त्याच्याकडे पाहिले.

"आम्ही राजकन्येला एक विनंति करणार आहोत !"

अस्फुट आवाजात राजकन्येने म्हटले, "कसली ?"

"आपण आमच्यासह अवंतीला यावं."

त्या स्वरात कमालीचा अनुनय भरलेला होता.

"महादेवींना विचारल्याशिवाय मी या संबंधात काही करू शकणार नाही."

"आपलं म्हणणं कुलीन कन्यकेला उचित असंच आहे. पण त्यासाठी आपणाला आमच्या शिबिरात यावं लागेल."

राजकन्येने आश्चर्यचकित स्वरात विचारले, "आपण काय म्हणता आहात ?"

किंचित मान लवविल्याप्रमाणे करीत उत्तर आले, "होय. आपल्या मातोश्री सांप्रत आमच्या शिबिरात आहेत !"

"आपलं हे कृत्य अतिशय अधमपणाचं आहे."

"माणसाला निमंत्रण देऊन फाशात अडकवण्याइतकं अधमपणाचं तरी ते निश्चितच नाही."

उत्तरादाखल काही बोलण्याऐवजी राजकन्येने दोन्ही हातांनी टाळी पिटली.

महालातून दोन सेवक लगबगीने बाहेर आले. पण ते नित्याचे परिचयातले सेवक नव्हते.

राजकन्या दचकली आणि तिने म्हटले, "तुम्ही कोण ?"

विक्रमाने त्यांच्याकडे पाहिले आणि म्हटले, "जा आता. किंचित् बाजूला राहा."

मग राजकन्येकडे वळून तो म्हणाला, "आपण भयभीत होण्याचं कारण नाही. राजकन्येचं अपहरण करण्याचं सामर्थ्य या बाहूंत असलं तरी तसं काही होणार नाही. राजकन्येचा वर हा स्वयंवृतच असावा असं आम्हाला वाटतं."

काहीशा हताश स्वरात राजकन्येने विचारले, "पण आपण महादेवींना का नेलं ?"

"आम्हीही थोडा कुलीनांचा धर्म जाणतो. त्या आपल्या-जवळ असल्या म्हणजे आम्ही आपल्याला पळवले असं होणार नाही. अवंतीला असूनही आपण मातृगृही आहात असंच आपणालाही वाटेल. कदाचित् जामाताला पाहणं आणि मुलीचा लग्नसोहळा अवलोकन करणं त्यांनाही आवडेल. आपल्या एकुलत्या एक सौंदर्यशाली कन्येचं लग्न डोळ्यानं पाहणं कोणत्या मातेला आवडणार नाही ?"

ती नेत्रातील दीपकलिका क्षणभर उजळली असे वाटले. पण क्षणभरच ! लगेच स्वतःला सावरत राजकन्येने प्रश्न केला, "पण मी येणार नसले तर !"

मृदु स्मित करीत विक्रमादित्याने तिच्याकडे पाहिले आणि म्हटले, "राजकन्येवर आमचा जोरा नाही. राजमातेला सोडून देण्याची आताच व्यवस्था होईल."

थोडावेळ कुणीच काही बोलले नाही.

काही वेळाने विक्रमादित्यानेच क्षणभराने त्या मौनाचा भंग करीत म्हटले, "येतो मी. धृष्टतेची राजकन्येने क्षमा करावी. राजकन्या सुंदर आहेत म्हणून ऐकलं होतं ते प्रत्यक्षच प्रत्ययाला आलं. राजकन्या प्रणयाच्या खेळातही धीट असतील अशा कल्पनेनंच इथवर येण्याचं साहस केलं होतं."

राजकन्येच्या भारावलेल्या पापण्याआड कसली तरी गूढ हालचाल झाल्यासारखी वाटली.

"राजकन्येने दुःख करून घेऊ नये. त्या आल्या तर आम्हाला आनंदच होईल. सारं काही त्यांच्या मनाप्रमाणे होईल."

"मला एक वचन हवं."

"बोला."

"आपल्या या वचनावर मी कायमची विसंवून राहू ना ?"

त्या स्वरात कधी नव्हे तो धीटपणा त्याला प्रथमच जाणवला. किती धीट पण मृदु मुलायम होते ते स्वर. त्या स्वरात जसे आर्जव होते तसेच एकप्रकारचे आश्वासनही नव्हते काय ?

त्या स्वराने सुखावल्याप्रमाणे हर्षित होऊन विक्रमाने म्हटले--

"राजकन्या माझ्या वचनाला पृथ्वीमोलाचं मानतात याचा मला संतोष वाटतो आणि म्हणूनच पुनः एकदा सांगतो की राजकन्येच्या सुखाची चिंता हा विक्रमादित्य अहर्निश वागवील."

"तर मग एक विनंति आहे."

"सांगा."

"महादेवींची आताच सुटका व्हावी. त्या येथेच राहतील."

"आपल्या म्हणण्याप्रमाणं होईल. मातोश्रींची सुटका झालीच म्हणून समजा."

आणि काहीसे थबकून मृदु आवाजात त्याने विचारले, "मग आपण आमच्या बरोबर चलता ना !"

मृदु मंजुळ स्वरात शब्द आले,

"स्वामींनी पुढं व्हावं. सेविका मागोमाग येत आहे."

# १४

राजधानीत पहाटेच्या प्रहरी दीर्घकाळपर्यंत गुंजत राहणारे सनईचे मंदमधुर स्वर आज एकाएकी थांबले.

एखाद्या सुगंधाप्रमाणे पसरत इंद्रियांना वेध लावून जागृतीस आणणारा तो चिरपरिचित आवाज बंद झाल्यामुळे की काय, विक्रम निद्रेतून दचकून उठला.

शय्येजवळ कुणीतरी उभे होते.

ती होती त्याची आई. लवंगलता. बऱ्याच दिवसांनी तिला आज शय्येजवळ पाहून त्याला थोडेसे आश्चर्य वाटले.

"आई, सनई एकाएकी विराम का पावली ?"

"मला काय माहीत बाबा ?"

आईचे ते त्रासिक सुरातले बोलणे त्याच्या अंगवळणी पडले होते.

पण आई आज सहज जवळ आली नव्हती. तिने विचारले, "युवराजांच्या विवाहाचा दिवस निश्चित ठरला ना ?"

"असं का विचारतेस ?" विक्रमाने आश्चर्यचकित मुद्रेने प्रश्न केला.

"माझ्या कानावर काही वेगळीच वार्ता आली आहे."

"कसली वार्ता ?"

"हा विवाह बहुधा व्हायचा नाही."

"म्हणतेस तरी काय, आई ?"

"होय. कानावर पडलं ते तुला सांगितलं."

आणि मध्येच त्याच्याकडे एक तीव्र कटाक्ष टाकत ती म्हणाली, ‘ तुला सांगून ठेवते विक्रम, जे होत आहे चांगलं नाही.”

“पण मला यातलं काहीसुद्धा माहीत नाही.”

“युवराजांचा तू मित्र-आणि तुला या गोष्टी माहीत नाहीत ?”

तिच्याकडे पाहत काहीशा संथ स्वरात तो म्हणाला, “मला माहित नाही एवढं खरं.”

लवंगलतेच्या मुद्रेवर आता आश्चर्य दिसू लागले. तिकडे पाहत विक्रमाने विचारले, “एवढ्यासाठी का आली होतीस ?”

रुक्ष स्वरात लवंगलता म्हणाली, “तुला राजवाड्यातून बोलावणं आलं आहे. महाराजांची प्रकृति स्वस्थ नाही म्हणून कळलं.”

विक्रम शय्येवरून ताडकन उठून बसला आणि म्हणाला, ‘आणि हे तू आता सांगत आहेस !”

त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आपल्या मनाशी बोलावे तसे लवंगलता म्हणाली, “का कोण जाणे, आज उठल्यापासून मनाला उदास वाटत आहे. आभाळ सगळीकडून भरून यावं. कुठून सुद्धा वारं येऊ नये तसं झालंय. म्हणून तुला उठवलं तों तू सुद्धा असा बोलायला लागलास.”

कधी नव्हे ती आई जवळ आली–आणि गेलीही.

किती तरी दिवसानी तिच्या स्वरात आज प्रथमच कसला तरी कंप त्याला अनुभवायला आला होता. तिला आपल्याजवळ काही सांगायचं होतं काय ?

पण ते सारे विचार मनातल्या मनात मावळले.

महाराजांची प्रकृति अस्वस्थ दिसते. त्यांना आधी

भेटायला हवं.

बऱ्याच दिवसानी अशी वार्ता त्याच्या कानावर आली होती तसे पाहिले तर महाराजांचे वय झाले होते पण ते कधी थकलेले दिसत नसत. सहस्त्रावधि सरितांना जीवनदान देणाऱ्या एखाद्या उंच पहाडाप्रमाणे त्यांचे जीवन होते.

महाराजाशी वार्तालाप करणे सुद्धा किती सुखाचे! बोलता बोलता ते आपल्याबरोबर श्रोत्यालाही एका वेगळ्या विशाल वातावरणात घेऊन जात.

तो राजवाड्यात आला तेव्हा उजाडत आले होते. द्वार-रक्षकाजवळ त्याने महाराजांची चौकशी केली तेव्हा कळले की महाराज पहाटे सौधावर गेले असता त्यांचा पाय निसटला आणि त्यांना भोवळ आली.

"पण आता महाराज स्वस्थ महालात पडून आहेत."

महाराजांच्याजवळ जाऊन वंदन करीत विक्रम उभा राहिला तेव्हा ते त्याच्याकडे प्रसन्न मुद्रेने पाहत म्हणाले, "ये विक्रम, असा जवळच्या सुखासनावर येऊन बस."

त्यांनी निर्दिष्ट केलेल्या आसनावर विक्रम बसला. पण त्याबरोबरच महाराजही शयनमंचकावरून उठून त्याच्याजवळच्या आसनावर येऊन बसले.

"हे काय महाराज, स्वस्थपणे पहुडायचं सोडून–"

"स्वस्थपणे पहुडायचं ते भाग्य आमच्या नशिबी नाही. विक्रम, प्रजेच्या कल्याणाचा हा भार मलाही दिवसेंदिवस असह्य होत आहे. पण तो उचलण्यावाचून सध्यातरी गत्यंतर नाही."

"आपला भार आम्हाला पेलणारा नाही हे तर खरंच. पण महाराजांनी मधून मधून आमचीही परीक्षा घ्यायला हवी."

"विक्रम, मला कधी कधी वाटतं या राज्याचा भार कुणावर तरी सोपवावा. पण चंद्रादित्यानं माझी फार निराशा केली. तेव्हा दुसरा विचार माझ्या मनात आला की या राज्याचं युवराजपद तुझ्या स्वाधीन करावं."

"महाराज !"

"पुरतं ऐकून घे. पण माझा हा विचार आमच्या सचिवांना मान्य नाही."

"छे छे: महाराज, हा भलताच विचार आपणही करू नये."

"मग, महामंडलेश्वर म्हणून राज्याच्या एखाद्या दूरच्या प्रांतावर पाठवलं तर जाशील ?"

"महाराजांना आपल्या पायापासून मला दूर का ठेवायचं आहे ?"

"म्हणजे हाही विचार तुला मान्य नाही ?"

महाराजांनी सौम्य स्मित केले आणि म्हटले, "खरं सांगायचं तर तू क्षणभरही दृष्टीआड व्हावास असं मला वाटत नाही. पण प्रजेच्या कल्याणाची चिंता वाहणं हे राजाचं कर्तव्य आहे आणि त्यापायी स्वतःचं सुखही त्यांनी बाजूला सारायला हवं. मला वाटतं राजांचीच नव्हे तर कोणत्याही राजसेवकाची तीच खरी कसोटी ठरेल."

बोलता बोलता महाराज थांबले. आणि मग स्वतःशी बोलल्याप्रमाणे ते म्हणाले, "बाकी आम्हीही या कसोटीला पूर्णपणे उतरलो आहों असं नाही. आमच्या राज्यात स्त्रियांना न्याय व सुरक्षितता मिळत राहील असं आम्हाला वाटत होतं."

महाराजांच्या मनाला बोचत असलेले शल्य कोणते होते ते विक्रमाने जाणले. काहीसा अस्वस्थचित्त होत तो म्हणाला,

"महाराजांनी मनाला एवढं लावून घेऊ नये. पुरोहितस्नुषेची नियति तीच होती म्हणून तसं घडलं."

"असं म्हणतोस ?" बोलताबोलता महाराजांनी एक तीव्र कटाक्ष त्याच्याकडे टाकत म्हटले, "तर मग युवराजांचं हे लग्न मोडलं तेही नियतीनेच केलं असं म्हणावं लागेल."

महाराजांना काय म्हणायचे होते ते विक्रमाला कळेना.

महाराज पुढे म्हणाले, "पुरोहितस्नुषेचा शाप केव्हा ना केव्हा तरी आम्हाला भोवणार आहे. त्यातून आमची सुटका नाही. पण निदान यापुढे तरी कोण्या अश्राप स्त्रीचे शाप आम्हाला भोवू नयेत याची दक्षता आम्हाला घ्यायला हवी."

विक्रम दचकला. आणखी कुणा अश्राप स्त्रीचा शाप...

"असा अपराध आता कोणाकडून घडला होता? "

तो अशा विचारात मग्न असतानाच महाराजांचा स्वर त्याला ऐकू आला. विक्रमाने मान वर केली तसे महाराज म्हणाले,

"विक्रम, काशिराजांच्या कन्येला तू कधी काही वचन दिलं आहेस का ?"

"वचन !" विक्रम गोंधळला.

"सावकाश स्मरण करून सांग. असा गोंधळून जाऊ नकोस. तू काही न्यायासनासमोर उभा नाहीस."

पण विक्रमाने काहीच प्रत्युत्तर दिले नाही.

"तर मग मी काय सांगतो ते ऐक. राजकन्येचं लग्न या दोन दिवसाच्या आत तडकाफडकीने उरकून घ्यायचं आहे. तुझ्याकडून कसली अडचण नाही ना !"

"माझी कसली अडचण असणार ?"

महाराजांची चिंताक्रांत झालेली चर्या काहीशी प्रसन्न झाली.

ते म्हणाले, "तुझ्याकडून हीच अपेक्षा होती. राजकन्येला दिलेले वचन तू पाळायला हवंस."

"महाराज !" विक्रम गोंधळल्या स्वरात म्हणाला,

'होय बेटा, राजकन्येचं तुझ्याशी होणारं लग्न हे नियतीनेच ठरविलं आहे असं मी समजतो. माझा त्या गोष्टीला पूर्णपणे पाठिंबा आहे."

"पण महाराज हे कसं शक्य आहे ?"

"असं का म्हणतोस ?"

"महाराजांनी राग मानू नये. महाराज प्रजेचं सुख ते आपलं सुख मानतात आणि ते त्यांच्यापरीने योग्यही असेल. पण आम्हा राजनिष्ठ सेवकांचा धर्म तो नाही."

"आणि दिलेल्या वचनाचा भंग मात्र होऊ शकेल ?"

"तसे वचन गेलंच असेल तर त्यातही युवराजांच्या सुखापलीकडे दुसरा विचार नव्हता."

"पण राजकन्येला युवराजाशी विवाह मान्य नसला तर ?"

विक्रम एकाएकी दचकला.

"ऐक विक्रम," त्याच्याकडे पाहत महाराज म्हणाले, "राजकन्येची जी इच्छा असेल ती पार पाडायला तुम्ही आम्ही वचनबद्ध आहोत. त्या वचनाच्या विरुद्ध जाणे हा अवंती राज्याच्या दृष्टीने फार मोठा अपराध आहे आणि त्याला देशांतर ही एकच शिक्षा आहे. ती मला तू द्यायला लावू नकोस !"

महाराजांचा स्वर काहीसा अवरुद्ध झाल्यासारखा दिसला. तिकडे पाहत विक्रम म्हणाला,

"मला ही शिक्षा मान्य आहे. देशांतरास जायला मी या क्षणी सज्ज आहे."

महाराज ताडकन उठून उभे राहिले. क्रोधा वेगाने त्यांचे सारे शरीर कापत होते. ते एकदम उद्गारले, "याक्षणी तू माझ्या डोळ्यापुढून चालता हो. अशा घोर अपराध्याचं मुखावलोकन मला नको आहे."

विष्वक्सेनांची नित्याची अबोल चर्या चिंताक्रांत दिसू लागली. त्यांना प्रश्न करण्याची फारशी सवय नव्हती. उत्तरेही ते मोजूनमापून देत. आज प्रथमच कसल्यातरी चिंतेने त्यांना बोलके केले.

विक्रमाने आपण महाराजांच्या आज्ञेने बाहेर प्रवासाला जात आहोत म्हणून त्यांना कळविले तेव्हा ते म्हणाले, ज्यावेळी तू सन्निध असायला हवं त्याचवेळी नेमका बाहेर जात आहेस !"

"अस का म्हणता तात ?"

"येणारा प्रत्येकक्षण यापलीकडे महत्वाचा आहे. पित्या-पुत्रांमधील गुप्त संघर्ष कदाचित काही क्षणाच्या आतच उघडयावर येण्याचा संभव आहे. राजपुत्राने काशिराज–कन्येच्या महालात शिरण्याचा अतिप्रसंग केला म्हणून महाराज त्याच्यावर अतिशय क्रुद्ध झाले आहेत. त्यासाठीच त्यांनी मला आज बोलावलं आणि राजपुत्राच्या महालावर सक्त पहारा ठेवण्याची मला आज्ञा केली आहे."

"म्हणजे हा एकप्रकारे कारावासच म्हणायचा !"

"होय. दुर्दैवाची गोष्ट अशी की त्याला कारावासात बद्ध करण्याची पाळी माझ्यावर आली आहे. ज्याला लहानपणापासून अंगाखांद्यावर खेळवलं त्याला या घटकेस अशा स्थितीत पाहणं हेही दुर्भाग्यच म्हणायचं"

काहीवेळ थांबून ते पुढे पुन्हा म्हणाले, "तुला माहितच आहे की राज्यात महाराजांचा जसा एक पक्ष आहे तसाच चंद्रादित्याचाही आहे. तो नागरिकांत आहे, सैनिकांत आहे, तसाच राजवाड्यातल्या परिजनांतही आहे. राजपुत्राला कारावासात टाकल्याची नुसती गुणगुण बाहेर पडली तर ठिणगी केव्हा पेट घेईल याचा नेम नाही. कदाचित ती महाराजांना अनर्थकारक ठरेल नेमका अशावेळी तू बाहेर जात आहेस !"

वडिलांचे ते बोलणे ऐकून विक्रम मनातल्या मनात हादरला.

अशा स्थितीत राजधानीतून आपले बाहेर जाणे खरेच कितपत योग्य ठरेल.

रात्री एका कोसावरच्या शिवमंदिरात त्याने आपला पहिला मुक्काम ठोकला तेव्हाही त्याच्या मनातील खळबळ शांत झाली नव्हती.

त्याच्या मनांत येत होते, आपण राजनिष्ठेची जी व्याख्या मनाशी केली ती बरोबर होती काय ? चंद्रादित्याच्या मैत्रीला महत्व देऊन आपण आजपर्यंत वागलो पण जेथे चंद्रादित्याची कृत्ये राज्याला अपायकारक ठरतात तेथेही आपण त्याला साथ देणे हे राज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरेल काय ?

आपले कुठेतरी चुकत आहे अशी आज प्रथमच विक्रमादित्याच्या मनाला जाणीव झाली.

या विचाराच्या कोलाहलात त्याने सबंध रात्र जागून काढली. पहाटेच्या सुमारास कसली तरी धावाधाव त्याच्या कानाला जाणवली म्हणून त्याने डोळे उघडले. पाहतो तो दहा-बारा स्वार आपल्याच दिशेने धावत येत आहेत.

विक्रमादित्य आश्चर्याने त्यांच्याकडे पाहत राहिला. ते

स्वार जवळ आले तसे त्याने त्यांना ओळखले. लहानपणाच्या खेळातील ते त्याचे सवंगडी आणि परवा काशिराजाशी झालेल्या युद्धातील त्याचे विश्वासु सहकारी होते. सर्वांच्या अग्रभागी अमात्यपुत्र शीलभद्र होता.

जवळ येताच अमात्यपुत्राने घोड्यावरून उडी घेतली आणि विक्रमाच्या पायाशी वाकून त्याने मुजरा केला.

"हे काय, अमात्यपुत्र ?"

"महाराजांच्या सेनापतीला अभिवादन आहे हे"—आणि लगेच तो पुढे म्हणाला, "महाराणींनी आपणाला शीघ्र राजधानीत बोलावलं आहे."

"महाराजांची प्रकृति कशी आहे ?" विक्रमाने आतुरतेने पृच्छा केली.

बोलावे की न बोलावे अशा संभ्रमात असल्याप्रमाणे त्याची चर्या दिसली. पण आपला संभ्रम क्षणार्धात सावरीत त्याने म्हटले, "महाराणी मोठ्या संकटात सापडल्या आहेत."

"काय म्हणतोस ?" आश्चर्यचकित स्वरात विक्रमाने विचारले, "महाराणींना असं कोणतं संकट प्राप्त झालं आहे ?"

"चंद्रादित्याने महाराजांना नजरकैदेत ठेवलं आहे."

विष्वक्सेनांच्या उद्गाराची यावेळी विक्रमाला आठवण झाली.

"ज्यावेळी तू सन्निध असायला हवं त्यावेळी तू बाहेर जात आहेस !"

## १५

राजधानीची वेस जवळ येताच अमात्यपुत्र शीलभद्राने विलक्षण आवेगाने शिंग फुंकले आणि त्याचवेळी साऱ्या बाराही अश्वारोहकांनी गर्जना केली, "युवराजांचा विजय असो."

ती घोषणा ऐकताच वेशीचे महाद्वार उघडले आणि सारे अश्वारोही आत आले.

आश्चर्याच्या मुद्रेने विक्रमाने म्हटले, "हा काय प्रकार आहे, शीलभद्र ?"

"चंद्रादित्याने राजधानीचा ताबा घेतला आहे हाच याचा अर्थ !"

ते असे बोलत आहेत तोच वेशीजवळच्या छोटचा शिव-मंदिरातून आचार्य वेतालभट्ट त्यांच्याच दिशेने लगबगीने बाहेर येताना दिसले.

विक्रमाने अश्वावरून उतरून त्यांना अभिवादन केले आणि म्हटले "आचार्यांचे आगमन इकडे कसे ?"

"महाराजांनी बोलावल्यावरून काल इथं आलो. पण महा-राजांच्या दर्शनाचा योग येईलसे दिसत नाही."

"असं का म्हणता, आचार्य ?"

"महाराज चंद्रादित्याच्या नजरकैदेत आहेत म्हणून ऐकतो."

"ते खरं आहे" शीलभद्र त्वेषपूर्ण स्वरात म्हणाला.

"म्हणजे तात विष्वक्सेनांचं म्हणणं खरं ठरलं तर ! पण सांप्रत तात कुठे असतील ?"

"नजरकैदेच्या झटापटीत चंद्रादित्याने त्यांचा पहिला बळि घेतला."

ते शब्द ऐकले आणि विक्रम क्षणभर सुन्न झाला. पाहता पाहता त्याची चर्या उदास झाली. नेत्रातून झरझर अश्रु वाहू लागले.

विष्वक्सेनांचे ते शेवटचे शब्द त्याला आठवले आणि त्याच्या तोंडून उद्‌गार आले, "हाय तात ! शेवटी आपलं म्हणणं खरं ठरलं. शेवटच्या घटकेस मी अंतर्वैरी ठरलो "

आचार्य पुढे झाले आणि त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरविला.

विक्रमाभोवती जमलेले ते बाराही मित्र क्षणभर शून्य-मनाने एकमेकाकडे पाहत राहिले.

येणारा प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता आणि तरीही काय करायला हवं याचा निर्णय अद्याप होत नव्हता.

त्यांनी शीलभद्राकडे नजर टाकली. त्या नजरेतील अभि-प्राय ओळखून शीलभद्र पुढे झाला. विक्रमाच्या पाठीवरून हात फिरवीत त्याने म्हटले, "मित्रा, तुझा शोकभार महान् असला तरी महाराजावरील संकट त्याहून महान आहे हे विसरू नकोस."

विक्रमाने आपले नेत्र पुसत म्हटले, "होय, तेही विसरता येत नाही. चला, आपण राजवाड्याकडे जाऊ या."

ते पुन: अश्वावर स्वार होणार तोच आचार्य पुढे झाले आणि म्हणाले, "अमात्यपुत्रा, थोडे थांब. जाण्यापूर्वी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. महाराजांची प्रकृति अत्यवस्थ आहे म्हणून ऐकतो. कदाचित या क्षणापर्यंत वेगळीच वाट लागली असण्याचा संभव आहे. तसं असेल तर हे राज्य चंद्रादित्याचं आहे. केवळ

महाराणीच्या आदेशावरून त्याच्याशी विनाकारण झगडा घेणं कितपत योग्य होईल याचाही विचार करायला हवा."

आचार्यांचे ते शब्द ऐकून विक्रमही दचकला. क्षणभर पुन: एकदा त्याची चर्या उदास झाली. विषण्ण स्वरात तो म्हणाला, "तसं असेल तर चंद्रादित्याचा डाव सफल झाला असं म्हणावं लागेल."

तोच शीलभद्राचे स्वर त्याच्या कानावर आले.

"नाही विक्रम ! नियतीने त्याचा डाव सफल होऊ दिलेला नाही. पितृघाताने कलंकित झालेल्या हातात या अवंतीने आपले दैव कधीच सोपविलेलं नाही आणि आताही ती तसे होऊ देणार नाही."

आचार्यांकडे वळून तो म्हणाला, "आचार्य, तुमच्या कानावर न पडलेली एक अद्‌भुत वार्ता तुम्हाला सांगतो."

"अद्‌भुत वार्ता !" आचार्य उद्‌गारले.

"होय. अद्‌भुतच. प्रत्यक्ष महाराणीने ही वार्ता विक्रमाला सांगण्यासाठी आम्हाला पाठविले होते ऐका आचार्य, तुमचा हा प्रिय शिष्य विक्रम या आपल्या अवंती देशाचा खरा युवराज आहे."

"मी आणि युवराज !" आश्चर्यचकित मुद्रेने विक्रमाने विचारले, "अमात्यपुत्रा, मित्रप्रेमाच्या भरात तू काही भलतंच बडबडत नाहीस ना ?"

"नाही. खरं तेच सांगतो " काहीशा उत्तेजित स्वरात शीलभद्र म्हणाला. "ऐक विक्रम, सेनापति विष्वक्सेनांचा बळी पडला ही गोष्ट वाईट तर खरीच पण त्या विषमय क्षणानेच आज हा अमृताचा दिवस दाखविला. विष्वक्सेनांच्या मरणाने चिडलेल्या

लवंगलतेने स्वतःच हे रहस्य महाराणींच्या समक्ष ओरडून प्रगट केलं. राजवाड्यात जमलेल्या कितीतरी लोकांदेखत 'पितृघातकी चांडाळ' या शब्दात तिने चंद्रादित्याचा धिःकार केला. ते रहस्य ऐकूनच चंद्रादित्य सावध झाला आणि त्याने आपल्या पक्षातील लोकांच्या साह्याने नवं षड्यंत्र उभारलं असून राजधानी आपल्या स्वाधीन करून घेतली. चौकाचौकावर पहारे ठेवले आणि महालात प्रत्यक्ष महाराजांची नाकेबंदी केली. या कारस्थानातील सर्वात नीचपणाची गोष्ट म्हणजे महाराजांचा वध करण्याचा प्रयत्न करून तू पळून गेलास असा तुझ्या नावाने डांगोरा पिटला जात आहे."

"म्हणतोस तरी काय ? माझ्या नावाला काळोखी फासण्याचा प्रयत्न चंद्रादित्य करीत आहे !"

"होय. चंद्रादित्यच. तुझा आजवरचा जिवलग मित्र. आपल्या स्वार्थासाठी ज्याने पित्याची प्रतिष्ठा कधी मानली नाही तो तुझा मित्र आज तुला कलंकित ठरवू पाहत आहे. ह्या योगाने अवंतीचे राज्य आपल्या हाती पडेल अशी त्याची कल्पना आहे."

"अशावेळी मी काय करावं असं तुम्हाला वाटतं ?"

"मित्रा, हे तू मला विचारतोस ? अवंती राज्याचा नव्हे, तुझ्या पित्याचा सर्वनाश करायला निघालेल्या वैऱ्याचं पारिपत्य तू करायला नको का ? 'पुत्रा आम्ही तुझी वाट पाहत आहोत' असा निर्वाणीचा संदेश पाठविणारी तुझी मातापितरे राजवाड्यात कोंडून पडली आहेत. नियतीने याचवेळी हे रहस्य उघड केलं त्यातच तुझ्या कर्तव्याची पुढची दिशा अचूक सांगून टाकलेली नाही काय ?"

आतापर्यंत कसल्यातरी विचारात मग्न असलेले आचार्य शीलभद्राच्या स्वरातल्या आर्ततेने जणु भानावर आले. विक्रम अद्याप गोंधळलेल्या स्थितीत अश्वाजवळ उभा होता. त्याच्याकडे जाऊन त्याच्या स्कंधावर हात ठेवीत ते म्हणाले, "विक्रम, महाराणी स्वतःच्या मुखाने सांगत आहेत त्याअर्थी हे सत्य आहे. या सत्याची तू अवहेलना करू नकोस. तूच या अवंतीचा खरा युवराज आहेस याबद्दल मला किमपिही शंका नाही. तुझ्या माता-पित्यावर यावेळी मोठं संकट कोसळलेलं दिसतं. त्याचं निवारण करणे हे या घटकेचं तुझं कर्तव्य आहे. नियतीनं तुझ्यावर सोपविलेला भार निःशंकपणे आपल्या शिरावर घे. माझा तुला या कार्यात पूर्ण आशीर्वाद आहे. तुझ्या पित्याची पुण्याई थोर आहे. त्याच्या बळावर आणि या मित्रांच्या साह्याने ही बंडाळी मोडून टाक. महाराणी अगतिकपणं राजमहालात तुझी वाट पाहत आहेत हे विसरू नकोस !"

आचार्यांचा तो एकेक शब्द म्हणजे जणु एका कवचाची प्रसिद्ध झालेली मंत्राक्षरेच होती. त्या शब्दांनी एक नवे विश्व त्याच्यापुढे साकार होऊ लागले. महाराजांच्या शब्दातले वात्सल्य आणि महाराणीच्या दृष्टीतून पाझरणारा स्नेह आता एक नवा अन्वयार्थ उलगडून सांगू लागला. लवंगलतेचे आपल्यावर प्रेम नसावे आणि महाराणींने लहानपणापासून प्रत्येक प्रसंगी आपली कड घ्यावी यातील ऋणानुबंधाचा न उलगडणारा धागा आता आपोआप उकलत होता.

महाराज आपले जन्मदाते. महाराणी आपली माता !

ती उभयता आज संकटात आहेत.

ते संकट निवारणे हे आपले कर्तव्य आहे—एक निकराचं

कर्तव्य !

त्या विचारासरशी त्याच्या मनातील संभ्रमाचे सारे पाश तटातट तुटून पडले. तो एकदम आचार्यांच्या चरणाशी वाकला आणि त्यांना नम्रपणे अभिवादन करीत म्हणाला, "आचार्य, आपला शब्द मला मान्य आहे आपल्या आशीर्वादाने मी अशक्यही शक्य करून दाखवीन."

अश्वावर आरूढ होताहोता त्याने आपले खड्ग कोशातून बाहेर काढले आणि ते वर उंचावत गर्जना केली, 'महाराज प्रतापादित्यांचा विजय असो.'

अश्वारूढ अवस्थेतील विक्रमादित्याचा तो वीरावेश अवंतीच्या नागरिकांना आणि सैनिकांनाही अपूर्व वाटला. चौकावरचे सैनिक आपापली जागा सोडून त्याच्या मागोमाग धावत आले आणि त्यांनी त्याच्या घोषणेला प्रतिसाद दिला.

महासागराच्या तुफान लाटेप्रमाणे क्षणाक्षणाला वाढत गेलेल्या गर्दीचा तो लोट राजमहालाच्या प्रमुख द्वारावर येऊन आदळला आणि त्याच क्षणी पुन: एकदा गर्जना झाली, "युवराज विक्रमादित्याचा जयजयकार असो,"

महाद्वारापाशी येताच विक्रमाने मागे वळून मोठ्याने म्हटले, "नागरिकहो, आपण महाराजांच्या दर्शनासाठी उत्सुक होऊन येथे जमला आहात हे मी जाणतो. परंतु महाराजांची प्रकृति चिंताजनक आहे. अशा स्थितीत त्यांच्या जिवाला अपाय होणार नाही या बेतानेच आपण शांततेने आपला मार्ग काढू या. यासाठी आम्ही काही निवडक मित्रांसह आत जाणार आहोत. आपण येथेच काहीकाळ प्रतीक्षा करावी. सारे काही शांततेने घडून यावे अशी माझी इच्छा आहे."

महाद्वारापाशी कुवलय सशस्त्र सैनिकासह उभा होता. त्याच्याजवळ जाऊन विक्रमाने समजुतीच्या स्वरात म्हटले, "कुवलय, आम्हाला विनाकारण रक्तपात करण्याची इच्छा नाही. बऱ्या बोलाने वाट दे."

प्रत्युत्तरादाखल कुवलयाने आपल्या हातातील खड्ग उंच केले आणि तो प्रहार करणार तेवढ्यात त्याच्यामागे उभ्या असलेल्या राजसेवकाने ते वरच्यावर झेलले. प्रत्येक पहाऱ्यावर अशीच गडबड होत राहिली. सातव्या पहाऱ्यावर प्रत्यक्ष चंद्रादित्य उभा असलेला दिसला. विक्रमाला पाहताच तो त्वेषाने ओरडून म्हणाला, "पकडा या विक्रमाला. या नीचाने महाराजांचा घोर अपराध केला आहे."

"कुणी कुणाचा अपराध केला आहे याचा हिशेब मागाहून करता येईल. तूर्त माझा मार्ग अडवू नकोस."

"म्हणजे पुन: एकदा महाराजांना मारण्याचा तुझा बेत मी सफल होऊ देऊ म्हणतोस ?"

ते शब्द ऐकले आणि विक्रमादित्याचा त्वेष उफाळून आला क्रोधावेशाने उसळून तो म्हणाला, "पितृघातकी चांडाळ तू ! तुला स्पर्श करून माझे खड्ग मी कलंकित करू इच्छित नाही. तू याक्षणी माझ्या दृष्टीआड हो. नाहीतर आजवरच्या मैत्रीची गय न करता तुझा सारा हिशेब क्षणार्धात मिटवून टाकावा लागेल."

"तू कोण मला आज्ञा करणार ?"

"ते माझ्या मुखाने तुला ऐकायचे आहे तर ! ऐक. मी आहे युवराज विक्रमादित्य."

त्याच्याकडे पाहात तुच्छतेच्या स्वरात चंद्रादित्य म्हणाला,

"हे नवे सोंग तू केव्हापासून घेतलंस ?"

"चंद्रादित्य !" विक्रम गर्जना करीत म्हणाला, "ते युवराजपद मला कुणी देण्याची आवश्यकता नाही. अवंतीच्या प्रजेला ते ज्ञात आहे."

आणि मागे वळून अमात्यपुत्राकडे पाहात तो म्हणाला, "शीलभद्र, हा अवंतीचा युवराज तुला आज्ञा देत आहे की या चंद्रादित्याला माझ्या दृष्टीआड घेऊन जा."

ते शब्द ऐकले आणि गलितगात्र झालेल्या चंद्रादित्याच्या हातातील शस्त्र गळून खाली पडले.

पण ते पाहायला विक्रमादित्य तेथे थांबला नव्हता. तो केव्हाच महाराणीच्या महालाकडे धावत गेला होता.

महाराणीच्या महालापाशी उभा असलेला दासीजन जणु त्याच्या आगमनाची वाटच पाहात होता.

द्वाराच्या पहिल्या पायरीवर त्याने पाऊल टाकताच त्याच्या पायावर पाणी घातले गेले. दहीभाताची मूद ओवाळण्यात आली. पाच सुवासिनी हातामध्ये नीरांजन घेऊन ओळीने उभ्या होत्या.

तितक्यातच आपल्या नूपुररवाने आसमंत निनादित करणारी एक नवकिशोरी पुढे आली आणि तिने विक्रमाच्या भालावर कुंकुमतिलक लावला.

क्षणभर विक्रमादित्याने वर पाहिले आणि दोन नजरा परस्परात गुंफल्या गेल्या.

काशिराज-कन्येच्या मुखमंडलावर आनंद जणु ओसंडत होता. काही क्षण त्याची दृष्टि तेथे स्थिरावली तोच मृदुमंजुळ स्वरात शब्द आले, "मातोश्री आपली वाट पाहात आहेत."

ते शब्द ऐकून विक्रमादित्य भानावर आला पण त्याने

अंतःपुराच्या दिशेने चार पावले आत टाकली नसतील तोच त्याच्या कंठाशी कुणीतरी येऊन बिलगले आणि मागोमाग स्वर आले, "माझं बाळ . . ."

त्या आलिंगनाने जन्मजन्मांतरीची आपली वात्सल्याची क्षुधा शांत होत आहे असे त्याला वाटले. वैराण वाट चालून आलेल्या पथिकाला जणु प्रथमच शीतल छायेचा लाभ होत होता. त्याच्या तोंडून गद्गद् शब्द आले, "आई, तात कुठं आहेत !"

गहिवरल्या शब्दाने महाराणी म्हणाल्या, "आत चल. तुझीच वाट पाहात आहेत ते. तू रागावून गेलास आणि इकडे त्यांनी हाय खाल्ली. ही नवी वार्ता कळल्यापासून तर ते सारखे विचारीत असतात, माझा विक्रम आला का ? मला तो केव्हा भेटेल ?"

ते ऐकता ऐकता विक्रमादित्याचे मन अधिकच दाटून आले.

सोनेरी मंचकावर पहुडलेले राजे प्रतापादित्य आपल्या दीर्घ निद्रेतून जागे झाले. कुणीतरी त्यांच्या मंचकाजवळ येऊन उभे राहिले होते. कोण हा पुरुष ? त्याचा वर्ण काळा पण देह बलिष्ठ व चर्या राकट होती. तो जवळ आला आणि त्याने आपला वज्रदंड उगारला. प्रतापादित्य अंगात होते नव्हते ते बळ खर्चून जोराने ओरडले.

पण दुसऱ्या क्षणी पाहतात तो जवळ कुणीच नाही. मग आला होता तो कोण ? की कुणीच आले नव्हते ? मग हा काय हा सारा भास ?

तेवढ्यात मोठा कोलाहल त्यांच्या कानावर पडला. त्या

कोलाहलातील ते शब्द... युवराज विक्रमादित्याचा जयजयकार गर्जणारे ते शब्द ? क्षणभर त्यांचे मन आश्चर्याने कावरेबावरे झाले. काहीतरी विलक्षण घडत आहे असे त्यांना वाटले. पण छे: ! पुन: जिकडेतिकडे शांत. हा कोलाहल आणि हा जयजयकार हा सुद्धा भासच होता काय ?

पण हे काय ? ही कुणाच्या तरी पावलांची चाहूल ऐकू येत आहे कुणीतरी महालात येत आहे हे निश्चित. त्या निष्ठुर आणि कोपिष्ट चंद्रादित्याशिवाय दुसरं कोण असणार ? आपल्या तीक्ष्ण शब्दाने हृदयाचे जिव्हार भेटू पाहणारा . . . नको ती भेट. ज्याला भेटायला मन तळमळत आहे तो विक्रम कुठेच दिसत नव्हता आणि ज्याचे दर्शन दु:सह वाटत होते तो पुन: पुन: नजरेस पडत होता. नकोच ते दर्शन ! महाराजांनी आपले नेत्र घट्ट मिटून घेतले.

पायांची चाहूल जवळजवळ येत होती. कुणीतरी अगदी निकट आलेले पायाशी वाकले आणि शब्द आले, "तात, मी आलो आहे ?"

तो चिरपरिचित स्वर त्यांच्या कर्णेंद्रियाना चाटून गेला. त्यांनी डोळे उघडले आणि पाहतात तो काय --

ओहो ! त्यांचे चिरवांछित स्वप्न त्यांच्या डोळ्यापुढे उभे होते. ज्याच्या दर्शनासाठी ते रात्रभर तळमळत होते तो त्यांचा पुत्र त्यांच्या पायाशी वाकला होता.

केवढा आनंदाचा हा क्षण !

त्यांची सारी गात्रे त्या आनंदाने थरथरली आणि मंचकावरून उठून त्यांनी आवेगाने त्याला जवळ घेतले.

'विक्रम, माझ्या पुत्रा, माझ्यावर रागावून कुठं गेला

होतास ?" त्यांच्याने पुढे बोलवेना ते त्याच्या पाठीवर आपल्या कृश हाताने थोपटीत राहिले.

"तात, मी आपला अतिशय अपराधी आहे. मला क्षमा ा. मी राजधानी सोडून गेलो म्हणूनच ही अनर्थ परंपरा त्यावर कोसळली."

विक्रमाच्या कपोलावरून अश्रु ओघळत होते. ते पुसत पुसत राज म्हणाले, "पुत्रा, त्याबद्दल खेद मानू नकोस. तू परत लास यातच मला आनंद झाला. जे दैवी असतं तेच होत राहतं. रवी आमच्या डोळ्यादेखत तू वावरत असताना याचक्षणी तू ाम्हाला दुर्लभ कशाला झाला असतास ? दुःखात सुख एवढंच की नियतीनं शेवटी तरी हे पुत्रसुख मला मिळवून दिले."

"पण तात, मी विनाकारण आपल्याशी धृष्टपणाने वागलो याचा खेद झाल्यावाचून राहत नाही."

"नाही, वेडया त्याबद्दल मला यत्किंचितही खेद नाही. उलट तुझ्या सत्यनिष्ठेबद्दल मला संतोषच वाटतो. कोणत्याही आपत्तीच्या काळात तुझी ही निष्ठा अशीच अभंग राहो. असाच राजा या अवंती देशाला हवा. आता तुला माझ्या डोळ्यादेखत केव्हा राज्याभिषेक करीन असं मला झालं आहे."

तेवढयात आचार्य वेताळभट्ट आणि शीलभद्र आत आले. आचार्यांकडे पाहून महाराजांनी स्मित केले आणि म्हटले, "आचार्य तुमचा प्रिय शिष्य कृतविद्य आणि कृतकार्य झाला आहे. त्याला राज्याभिषेक होईल अशी शीघ्र व्यवस्था व्हायला हवी."

"होय, राजन्. सारे काही आपल्या मनाप्रमाणे होईल. आता आपली प्रकृति चांगली होऊ द्या."

"छे: माझ्या प्रकृतीला काय झालं आहे !"

बोलताबोलता त्यांची दृष्टि शीलभद्राकडे गेली. त्या जवळ बोलावून त्यांनी त्याची पाठ प्रेमाने थोपटली आणि म्हटले, "अमात्यपुत्र, तू खऱ्या अर्थाने पुत्रदर्शनाचा आनंद म मिळवून दिलास. लहानपणापासून तुम्ही मित्रांनी विक्रमा साह्य दिलं आहे असंच साह्य देत राहा." आणि आचार्य वळून ते म्हणाले "या आमच्या नव्या राजाला हा नवा अ मोठा अनुरूप ठरेल. तुम्हाला काय वाटतं आचार्य !"

आचार्य हसून म्हणाले. "आपण एवढ्यातच निव होण्याची भाषा का बोलता ? या मुलांना आपल्यापासून अद्य बरंच काही मिळवायचं आहे."

महाराजांना मध्येच कसली तरी आठवण झाल्यासार दिसली ते विक्रमाकडे वळून म्हणाले, "चंद्रादित्य कुठं आहे ?

"ती काळजी करू नका, तात !"

"हे पाहा, ज्यांना कुणाला मला भेटायची इच्छा असेल त साऱ्यांना येऊ द्या. आजतरी कुणाला अडवू नका. माझ्या आनंदाचे वाटेकरी त्यांनाही होऊ द्या."

"पण तात, आपण निदान मंचकावर स्वस्थ बसावं."

"अरे. हा आनंद मला स्वस्थ बसू देत नाही. तू माझ चिंता करू नकोस शंभर वर्षे जगून जे मिळायचं नाही ते मल या क्षणी प्राप्त झालं आहे."

आचार्य जायला निघाले तेव्हा महाराजांना राहवले नाही ते मंचकावरून उठून उभे राहिले आणि आचार्यांना प्रणाम कर म्हणाले. "आचार्य, या घटकेला मला अतिशय आनंद होत आहे अवंती राज्याचा भार शिरावर घ्यायला योग्य राजा मिळाव एवढीच माझी इच्छा होती. ती इच्छा आज सफल झाली. मं

खऱ्या अर्थाने कृतकृत्य झालो आहे."

पण हे काय ? आनंदाने गहिवरलेले राजर्षि बोलता बोलता एकाएकी थांबले. पाहातापाहाता त्यांचे मुख विवर्ण झाले, रावले लटपटली आणि देह धरणीवर कोसळला.

विक्रमादित्य धावतच पुढे झाला आणि त्याने त्यांचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले.

पण ज्यावेळी देह धरणीवर कोसळला त्याच वेळी आत्म्याने आपले भव्य उड्डाण साधले होते.

अश्रुभरित नेत्रांनी राजर्षींचे शेवटचे मुखावलोकन करीत आचार्य म्हणाले, "केवढा महान् राजा हा ! अखेरच्या क्षणापर्यंत या राजर्षीने आपल्या प्रजेच्या कल्याणाचीच चिंता वाहिली."

रात्रीच्या अंधारात विक्रम विषण्णपणे सौधावर उभा होता. तितक्यात त्याला भास झाला की आपल्या अनुपम तेजाने दशदिशांना कांतिमान करणारी कुणी दिव्य वस्त्रधारिणी देवी आपल्या मस्तकावर राजमुकुट ठेवीत आहे आणि हास्यवदन करून म्हणत आहे, "राजे विक्रमादित्य, असे कष्टी होऊ नका. एका कर्तव्यतत्पर आणि प्रजावत्सल राजर्षींचा महान वारसा तुमच्याकडे चालत आला आहे. तो आपल्या स्कंधावर दृढपणे वागवा. माझा तुम्हाला पूर्ण आशीर्वाद आहे."

विक्रम भानावर येऊन आजूबाजूला पाहतो तो काय, जवळपास कुणीच नव्हते.

मग आली होती ती कोण ?

या राज्याची अधिष्ठात्री देवी अवंतिका तर नव्हे !

११४५५
०१·०५

IRBK-0116455